क्रांतिगाथा

Sanskruti Samvardhan Pratishthan
संस्कारेणैव हि संस्कृति

नैतिक शिक्षण योजना



ज्यांच्या अमोल सहकार्यामुळे नैतिक शिक्षण योजनेचा हा उपक्रम यशस्वी होत आहे आणि संस्कारक्षम वयात मुलांना रामायण, क्रांतिगाथा, महाभारताची गोडी लागत आहे. अशा सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळासंचालकांना... कृतज्ञतापूर्वक धन्यवाद!



लेखक :
श्रीमती कल्याणीरमण बेन्नुरवार

***

प्रकाशक :
श्री. मोहन सालेकर
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान
७२/२, खटाव टेरेस,
डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी - ०२२-२४७१७६८६

***

मुखपृष्ठ व सजावट :
श्री. चंद्रशेखर जोशी

संपादक मंडळ
डॉ. श्रीमती कीर्तिदा मेहता
श्री. बाळकृष्ण भागवत
डॉ. चारूशीला ओक,
श्रीमती अलका गोडबोले

दहावी आवृत्ती :
दि. १९ जुलै, २०१६
सहयोगी मूल्य : रु. १५०/-

मुद्रक :

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रस्तावना

श्रीमद् रामायण व **महाभारतातील** कथांच्या द्वारे संस्कारक्षम वयातील शालेय विद्यार्थ्यांच्या मनात सुसंस्काराचे बीजारोपण करण्याचे महान कार्य अनेक वर्षांपासून संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान निरलसपणे करीत आहे. या महान ग्रंथातील निवडक कथांमधून आदर्शाचा चिरंतन ठसा उगवत्या पिढीच्या मनात कोरीत असतानाच, ह्या महान ग्रंथामध्ये व्यक्त झालेली जीवनमूल्ये व आदर्श ज्यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष आचरणात आणली, जन्मभूमीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी, स्वातंत्र्यासाठी व देशबांधवांच्या भावी सुखासाठी ज्यांनी आपले संसारसुख, लौकिकसुख व प्राण मातृभूमीच्या बलिवेदीवर हसत हसत उधळले, त्या स्वातंत्र्य आंदोलनातील सशस्त्र चळवळीतील प्राणार्पण करणाऱ्या वीर हुतात्म्यांची चरित्रे मुलांसमोर ठेवली जात आहेत हे निःसंशय अभिनंदनीय आहे.

ज्या काळात **'क्रांतिगाथा'** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हातात येत आहे. तो काळ सुद्धा अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. सर्व जनतेचा सहभाग असणारी निःशस्त्र चळवळीची सुरुवात म्हणता येईल, अशी 'विलायती कापडांची होळी' लोकमान्य टिळकांच्या उपस्थितीत स्वा. सावरकरांनी सर्व प्रथम पुण्यात पेटवली. त्याला नुकतीच शंभर वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. तसेच देशाला 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत मिळवून देणारे, आसेतूहिमाचल हा देश एक आहे, आपण या देशाचे अंगभूत घटक आहोत, प्रत्येक देशवासियाचे सुखदुःख, आपले स्वतः चे सुखदुःख आहे ही भावना देशभरात पुन्हा एकदा उत्पन्न करणारे वंग-भंग विरोधी आंदोलन, त्याची सुद्धा शताब्दी नुकतीच झाली आहे. स्वतःचे जीवन समिधामय समजून राष्ट्रास अर्पण करणाऱ्या श्री. गुरुजींची जन्म शताब्दी काल-परवाच पार पडली. १८५७ च्या महान क्रांतियुद्धास १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा या पवित्र संधी काळात इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक उपलब्ध करून देण्यात संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान आगळेच औचित्य साधत आहे. त्यासाठी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

संस्कारहीनतेच्या या अंधाराशी आपल्या हातातील इवल्याशा पणतीने संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान आज झुंज देत आहे. भविष्यात याच पणतीने लक्ष कोटी दीप ज्योती उजळतील आणि सुसंस्कारांची दीपावली प्रगटेल आणि सारे राष्ट्र झळाळून उठेल, याबद्दल माझ्या मनात किंचितही संदेह नाही.

आपापल्या हातातील संस्कार दीप उजळवण्यात पुढे आलेल्या सर्व कार्यकर्ते, शिक्षक व विद्यार्थ्यांना माझ्या शुभेच्छा आणि अनंत कोटी आशीर्वाद.

- पूज्यश्री भूपेन्द्रभाई पण्ड्या
सुप्रसिद्ध कथाकार

अनुक्रमणिका

१.	विषय प्रवेश	१
२.	राणी लक्ष्मीबाई	३
३.	तात्या टोपे	१०
४.	वासुदेव बळवंत फडके	१५
५.	चाफेकर बंधू	२१
६.	अनंत कान्हेरे	२६
७.	मदनलाल धिंग्रा	३२
८.	खुदिराम बोस	३८
९.	आधुनिक अभिमन्यू	४१
१०.	वांछिनाथन अय्यर	४४
११.	व्हॉइसरॉयवर बॉम्बफेक	४९
१२.	हौतात्म्य	५४
१३.	विष्णु गणेश पिंगळे	५८
१४.	पं. राम प्रसाद बिस्मिल	६३
१५.	सरफरोशी की तमन्ना	६८
१६.	चंद्रशेखर आझाद	७२
१७.	आत्मार्पण	७६
१८.	सरदार भगतसिंग	८०
१९.	रंग दे बसंती चोला	८५
२०.	सरदार उधमसिंह	९०
२१.	नेताजी सुभाषचंद्र बोस	९४
२२.	समारोप	१००

१. विषय प्रवेश

'क्रांती' या शब्दाचा शब्दकोषातील अर्थ आहे अचानक झालेला बदल. हळू हळू होत जाणारा बदल म्हणजे 'उत्क्रांती.' पण सर्वसाधारणपणे व्यवहारात क्रांती हा शब्द वापरतो, तेव्हा आपल्या मनात जो अर्थ उमटतो, तो राज्य क्रांतीचाच. क्रांती या शब्दाला स्वतःचे असे वेगळेच सामर्थ्य आहे; शक्ती आहे, तेज आहे, ओज आहे, धाक आहे. तसेच त्या शब्दात आशा आहे, विश्वास आहे, स्वप्न आहे, आश्वासन आहे. हा शब्द कोणाच्या मनात दहशत उत्पन्न करतो, भीती उत्पन्न करतो. तर कोणाच्या धमन्यांमध्ये स्फूर्ती आणि चैतन्य जागृत करतो.

आपल्या समाजात असा एक गैरसमज रुजवला गेला आहे की आम्हा भारतीयांना राष्ट्रभावना इंग्रजांनी शिकविली. तसेच दुसरा असा सुद्धा गैरसमज रुजवला गेला आहे की या देशात क्रांती, राज्य-क्रांती झालीच नाही. क्रांतीचे बीज या भूमीत रुजवले ते मार्क्सच्या विचाराने प्रभावित झालेल्यांनी. अन्यथा भारतीय समाज म्हणजे कोडगा, दैववादी, निमूटपणे अत्याचार सहन करणारा, पराभूत मनोवृत्तीचा आणि न्यूनगंडाने पछाडलेला निष्क्रीय मुर्दाड समाज आहे. हे असे गैरसमज परकीय आणि त्यांचे स्वकीय बगलबच्चे सतत ठसवीत असतात. खरोखरच आम्ही असे आहोत का? नाही! त्रिवार नाही!!

वेद काळापासून अन्यायी स्वकीय वा परकीय राज्यकर्त्यांच्या विरोधात या मातीत क्रांत्या घडलेल्या आहेत. अन्यायी वेन राजाला ठार करून त्याचा मुलगा पृथु याला राजा करण्यात आले. अयोध्येचा सामर्थ्यशाली पण वनवासी युवराज श्रीराम याला मदतीची गरज असल्याची संधी साधून किष्किंधेचा विजनवासी राजा सुग्रीव व लंकेतील राजाचा असंतुष्ट भाऊ विभीषण यांनी आपापल्या देशात श्रीरामाच्या मदतीने राज्य क्रांती घडवून आणली. अन्यायी राजे दूर सारले आणि राज्ये मिळविली. श्रीकृष्णाने कंसाला ठार करून मथुरेत राज्य क्रांती केली. विक्रमादित्याने हूण, बार्बर, यवन इ. आक्रमकांचा निःपात केला. त्यांची या भूमीतील अपवित्र साम्राज्ये त्याने नष्ट केली. इतकेच नव्हे तर खुद्द त्यांच्याच प्रदेशात त्याने आपल्या राज्याच्या सीमा विस्तारल्या. शालिवाहनाने मातीतून सैनिक निर्माण करून शक साम्राज्य नष्ट केले. हरिहर व बुक्कराय या भावांनी बहमनी सुलतानांच्या छातीवर विजयनगरचे साम्राज्य उभे केले. तर आदिलशाही अन् मोंगली सल्तनतींच्या ऐन उरावर छत्रपती शिवरायांनी हिन्दुपतपातशाहीचे स्वतंत्र सिंहासन निर्माण केले. नानासाहेब पेशवे व राणी लक्ष्मी यांनी १८५७ चे यज्ञकुंड पेटविले.

या साऱ्या घटनांना राज्यक्रांत्या नाही तर दुसरे काय म्हणणार! भारतात घडून आलेल्या सर्वच राज्यक्रांत्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, या सर्व क्रांत्यांचे प्रेरक, प्रवर्तक, प्रचारक व मार्गदर्शक हे साधू, संन्यासी, बैरागी आणि तपस्वी राहिलेले आहेत.

या भूमीत घडलेल्या सर्व क्रांत्यांमधील सर्वच नररत्नांची नुसती ओळख जरी करून घ्यायची म्हटले, तरी हजारो पानांचे अनेक ग्रंथ लिहावे लागतील. ते येथे तरी शक्य नाही. म्हणून आपण येथे ओळख करून घेणार आहोत ते, इंग्रजी सत्तेविरूद्ध झुंजत असताना ज्यांनी आपल्या प्राणांचे मोल मातृभूमीच्या चरणी अर्पण केले अशा काही निवडक क्रांतिवीरांची. या थोड्या नररत्नांच्या चारित्र्यातून आणि चरित्रातून स्फूर्ती घेऊन तुमच्या मधून कोणीतरी पुढच्या आयुष्यात सर्वच्या सर्व प्राचीन तसेच अर्वाचीन आणि आधुनिक भारतीय क्रांत्यांचा व क्रांतिवीरांचा अभ्यास स्वतः करील इतकेच नव्हे तर जगाला उलगडून दाखवील. याच उद्देशाने सांगत आहोत क्रांतिकारकांच्या आत्मसमर्पणाच्या, स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात त्यांनी समर्पण केलेल्या त्यांच्या स्वतःच्या देहांच्या, संसाराच्या, सुखाच्या आणि सर्वस्वाच्या आहुत्यांच्या या क्रांतिकथा.

२. राणी लक्ष्मीबाई

रणरागिणी लक्ष्मीबाई नेवाळकर
जन्म - १९ नोव्हेंबर १८३५, काशी
वीरगती - १८ जून १८५८, कोटा

मराठेशाहीचे शेवटचे पेशवे श्रीमंत दुसरे बाजीराव साहेब गंगा किनारी ब्रह्मवर्तास इंग्रजांची पेन्शन खात दिवस कंठीत होते. मोरोपंत तांबे त्यांच्या विशेष मर्जीतील आश्रित होते. त्यांची चिमुरडी कन्या मनू. तिच्यावर श्रीमंत पोटच्या मुलीप्रमाणे माया करीत. मनू सदैव श्रीमंतांचे दत्तक पुत्र नानासाहेब यांच्या सोबत असे. त्यांच्याच सोबत घोडेस्वारी, तलवारबाजी असे मर्दानी व मैदानी खेळ खेळे. झाशीचे राजे श्रीमंत गंगाधरराव नेवाळकर यांना मूलबाळ नव्हते. त्यांच्या राणीसाहेब नुकत्याच वारल्या होत्या. पेशव्यांनी स्वतः जातीने लक्ष घालून मनूचे लग्न श्रीमंत गंगाधररावांबरोबर लावून दिले. एका आश्रिताची लेक झाशीची राजलक्ष्मी, राणी लक्ष्मीबाई म्हणून सोन्या रुप्यांची फुले उधळीत, साखर वाटीत, हत्तीवरून मिरवीत, झाशीमध्ये आली. श्रीमंत गंगाधरराव उतारवयाकडेच झुकलेले होते. प्रजेवर त्यांचे पुत्रवत प्रेम होते. प्रजेची पण त्यांच्यावर नितांत श्रद्धा आणि अत्यंतिक निष्ठा असे. आपल्या रुपा-गुणाने आणि प्रेमळ वर्तनाने राणी लक्ष्मीबाई थोड्याच अवधीत झाशीच्या प्रजेच्या गळ्यातील ताईत बनली. ज्या काळी राजघराण्यातील स्त्रियांचे दर्शन सूर्याला सुद्धा दुर्मिळ असे आणि ब्राह्मण स्त्रियांवर अनेक बंधने असत त्या काळात सुद्धा राणी प्रजाजनांच्या सुखदुःखात सहज सामील होत असे. तिने आपली मर्दानी खेळांची आवड हौसेने जोपासली. इतकेच नव्हे तर झाशीच्या सैन्यात स्त्री सैनिकांची एक तुकडी तयार केली.

राणीने एका गोंडस पुत्राला जन्म दिला. गादीला वारस मिळाला. सर्वत्र आनंद झाला. पण नियतीच्या मनात भलतेच होते. किरकोळ अपघाताचे निमित्त होऊन बालराजांचा अंत झाला. वृद्ध आणि आजारी गंगाधररावांनी हाय खाल्ली. त्या आघाताने सन १८५३ मध्ये त्यांचा अंत झाला. झाशीवर आणि त्यातही तरुण राणीवर जणू वीजच कोसळली. राणी लक्ष्मीबाई म्हणजे

संकटांनी खचून जाणारी कोणी अबला नव्हती, तर प्रत्येक संकटाचा शौर्याने मुकाबला करणारी सबल दुर्गा होती. तिने सारा राज्यकारभार आपल्या ताब्यात घेतला. राज्याचा गाडा पुढे चालवण्यासाठी तिने एका सुलक्षणी मुलाला दत्तक घेतले. नाव ठेवले दामोदरराव. त्याला मांडीवर घेऊन तिने राज्यकारभार सुरु केला. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या शेजारी बसून तिने राजकारणाचे आणि मुत्सद्देगिरीचे धडे गिरवले होते.

कंपनी सरकारचे राज्य वाढवण्याचे गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीचे धोरण गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी अतिशय जोमाने चालवत होता. काही ना काही खुसपट काढून संस्थाने खालसा करून तो प्रदेश घशात घालायला तो चांगलाच सोकावला होता. राणीने घेतलेला दत्तक त्याने नामंजूर केला आणि झाशीचे राज्य खालसा केल्याचे फर्मान जारी केले. राणीने कंपनी सरकारपुढे झुकण्याचे ठामपणे नाकारले. गव्हर्नर जनरलचे फर्मान आणि रू. ६०,०००/- च्या पेन्शनीचा प्रस्ताव तिने बाणेदारपणे धुडकावला. राज्याचा ताबा घेण्यासाठी आलेल्या मेजर एलिस या इंग्रज अधिकाऱ्याची तिने 'मेरी झाँसी नहीं दूँगी' असे तेजस्वी

उत्तर देऊन बोळवण केली. याचा परिणाम अटळ होता. प्रबळ ब्रिटिश साम्राज्य शक्तिबरोबर संघर्ष! युद्ध! राणीची त्यास तयारी होती. अपमानित व लाचार जिण्यापेक्षा तिला सर्वनाश मंजूर होता. त्या काळात कंपनी सरकारच्या अन्यायी व कपटी राज्यतृष्णेने कळस गाठला होता. इंग्रजांच्या अत्याचाराला संस्थानिक किंवा सैनिकच नव्हे तर सर्व रयतच कंटाळली होती. कंपनी सरकारची राजवट उलथून टाकण्यासाठी आणि इंग्रजांना देशातून हद्दपार करण्यासाठी एका देशव्यापी युद्धाची अत्यंत गुप्तपणे तयारी सुरू झाली. त्या युद्ध तयारीत झाशीचा सहभाग होताच. युद्धाच्या डावपेचाची आखणी करण्यासाठी झालेल्या संस्थानिक व सेनानींच्या गुप्त बैठकीमध्ये राणीने केलेली डावपेचांची आखणी पाहून भलेभले वीर थक्क झाले. साऱ्यांनी तिचे नेतृत्व मान्य केले.

दुर्दैवाने युद्धाची तयारी पूर्ण होण्यापूर्वी आणि सर्वानुमते निश्चित केलेल्या उठावाच्या एक महिना आधीच १० मे १८५७ ला लढ्याला तोंड लागले. सुरुवातीला बंडखोरांना झपाट्याने यश मिळत गेले. पण संपर्काच्या साधनांच्या अभावी सर्वत्र गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. सारा युद्ध व्यूह ढासळला. कंपनी सरकारने योजनाबद्धपणे बंडखोरांचा बिमोड करण्यास सुरुवात केली. या लढ्याचे झाशी हे प्रमुख केंद्र व राणी लक्ष्मी ही प्रमुख आधार असल्याने झाशी जिंकून घेण्यासाठी इंग्रजांनी झाशीवर हल्ला केला. तिखट प्रतिकार करून राणीने पहिला हल्ला उधळून लावला.

लॉर्ड डलहौसीच्या जागी नवा गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग आला होता. त्याने सर ह्यूज रोजला राणीला जिवंत पकडून कलकत्त्याला पाठवण्याची ताकीद देऊन झाशीवर पाठवले. मार्च १८५८ मध्ये सर रोजने झाशीला अत्यंत बळकट वेढा घातला. सर्व शक्तिनिशी राणीने किल्ला झुंजवत ठेवला. ती स्वतः मर्दानी रणवेश चढवून हातात तळपती नंगी तलवार घेऊन भर झुंजीत किल्ल्याच्या तटावरून हिंडत युद्धाचे नेतृत्व करीत होती. इतर संस्थानिकांकडे हेर पाठवून मदत मागितली. पण हेर नकार घेऊन परत आले. या बळकट वेढ्यातून राणीचे हेर जिवावर उदार होऊन आत बाहेर भले करीत होते, पण दाणागोटा आणि रसद आणणे शक्य होत नव्हते. कपट नीतीचा अवलंब करून इंग्रजांनी किल्ल्यात फंद फितुरी माजवली होती. किल्ल्याबाहेरचे शहर त्यांनी जिंकून घेतले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा राणीने सतत दहा दिवस असा काही तिखट प्रतिकार केला की सर ह्यूज रोजच्या तोंडचे पाणीच पळाले.

राणीचा तोफखाना अतिशय सक्षम होता. तोफगोळ्यांच्या माऱ्याने इंग्रजी फौजांना

किल्ल्याजवळ येण्यापासून रोखले होते. त्या माऱ्यापासून वाचण्यासाठी त्यांनी तोफखाना सुद्धा अम्मळ दूरच ठेवला होता, पण एका दुर्बळक्षणी राणीचा विश्वासू तोफदल प्रमुख दुश्मनांच्या गोळीला बळी पडला आणि राणीचा तोफखाना पोरका झाला. पण झाशीचा प्राण कंठाशी आला होता. भवितव्य समोर स्पष्ट दिसत होते. राणीने आपल्या धर्माच्या भावाला, श्रीमंत नानासाहेबांना हाक दिली. पण त्यावेळी जनरल हॅवलॉकने कानपूरवर चढवलेल्या हल्ल्यात खुद्द श्रीमंत नानासाहेब पेशव्यांवरच परागंदा होण्याची पाळी आली होती. त्यांचे विश्वासू सेनापती आणि राणीचे बालपणीचे खेळगडी तात्या टोपे यांनी इंग्रजांना शह देण्यासाठी काल्पीवर हल्ला केला आणि ते तेथेच गुंतून पडले होते.

राणीच्या तोफखान्याची अचूकता भंगताच गनिमाने तोफखाना पुढे सरकावला. आता तोफगोळे किल्ल्यात पडू लागले. एक एका इमारतीचा वेध घेऊ लागले. धान्याचे कोठार उद्‌ध्वस्त झाले. एका तोफगोळ्याने दावा साधला. त्याने दारूगोळ्याच्या कोठाराचा वेध घेतला. प्रचंड स्फोट झाला. सारा इमला अस्मानात उडाला. शेकडो माणसे चिंध्या होऊन किंवा वांग्यासारखी भाजून मेली. सारा दारूगोळा धूर होऊन ढगात गेला. तोफा थंड पडल्या. बंदुका निष्प्रभ झाल्या. पण राणीला विचार करायला उसंत नव्हती. गोरा तटाला भिडला होता. तटाला शिड्या लावून गोरे शिपाई वर चढत होते. त्यांना रोखण्यासाठी राणीचे सैनिक जिवाची शर्थ करीत होते. राणी रणचंडीचे रूप धारण करून तटावरून घोडा उडवीत या टोकापासून त्या टोकापर्यंत दोडत सैनिकांना धीर आणि प्रोत्साहन देत होती. सूंऽऽसूंऽऽ करीत गोळ्या तिच्या जवळून जात होत्या. पण तिला त्यांची तमा नव्हती.

झाशीवर दुसरा आघात झाला. कोणीतरी नतद्रष्ट घरभेद्याने सर ह्यूज रोजला तटातील कमकुवत जागा दाखवली होती. सुरुंगाच्या स्फोटाने किल्ल्याचा एक बुरूज अस्मानात उडाला. बुरुजावरची तोफ आणि सैनिक पाला पाचोळ्यासारखे अस्मानात भिरकावले गेले. गडाला भले मोठे खिंडार पडले. खिंडारातून घुसू पाहणाऱ्या गनिमाला रोखण्यासाठी राणी, सैन्याची एक तुकडी घेऊन धावली. अत्यंत निकराची झुंज घेऊन राणीने पहिला हल्ला परतवला. रात्र झाली. युद्ध तात्पुरते थांबले. रात्रीच्या भयाण अंधारात आपली लाडकी झाशी जळताना राणी पहात होती. जागोजागी कोठे धारातीर्थी पडलेल्या वीरांचे छिन्न विछिन्न देह धुळीत लोळत पडलेले, तर कोठे प्राणान्त वेदनांनी कळवळणारे, कण्हणारे, आक्रोशणारे जखमी वीर तळमळत पडलेले. जखमींच्या उपचारांची व्यवस्था करत, त्यांना धीर देत, सांत्वना देत राणी अविश्रांत हिंडत होती, श्रमत होती.

रात्र सरत होती. सर ह्यूज रोज पूर्ण शक्तिनिशी पुन्हा यल्गार करणार हे सांगण्यासाठी कोणा ज्योतिष्याची गरज नव्हती. तो हल्ला परतवण्याचे सामर्थ्य झाशीच्या थकल्या भागल्या, जखमांनी विकल झालेल्या, तुटपुंज्या सैन्यात उरले नव्हते. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. अंगात रणचंडी संचारलेल्या राणीची इच्छा शूर वीर सैनिकांच्या खांद्याला खांदा लावून लढता लढता मृत्यूला कवटाळण्याची होती. पण राणीच्या मुत्सद्द्यांनी राणीचा विवेक जागा केला. हौतात्म्य हे ह्या महायुद्धाचे ध्येय नव्हते. तर ध्येय होते, इंग्रजांचा पराभव, समूळ विच्छेद. झाशीची आणि भारतमातेची परदास्यातून मुक्तता व स्वाभिमान, स्वत्व आणि स्वराज्याची पुनर्स्थापना. या महान युद्धामध्ये राणीची भूमिका केवळ झाशीच्या लढ्यापुरतीच सीमित नव्हती. ती त्या विशाल युद्ध पटाच्या अनेक केंद्रीय नेत्यांपैकी एक प्रमुख धुरीण होती. विस्कळीत झालेला युद्धव्यूह सावरायचा असेल तर तात्या टोपेंच्या मदतीने पुन्हा एकदा हयात आणि मुक्त असलेल्या सर्व युद्ध नेत्यांना एकत्र आणणे भाग होते. त्यासाठी राणीने झाशीत अडकून राहून चालणार नव्हते. तिला मरणाचा विचार करायला वेळ नव्हता. मुत्सद्यांच्या सल्ल्यांप्रमाणे राणीने अत्यंत व्यथित अंतःकरणाने झाशी सोडण्याचा निर्णय घेतला. प्रथम ग्वाल्हेरला शिंद्याकडे व तेथून काल्पीला अडकून पडलेल्या तात्या टोपेंकडे जाण्याचा तिचा बेत ठरला.

पहाटेच्या अंधारात गड सोडून जाण्याचा मूळ बेत ठरला होता. पण निरवानिरव करण्यास अंम्मळ उशीर लागलाच. राणी तटापाशी आली तेव्हा दिशा उजळण्याच्या बेतात होत्या. तटापलिकडून सर रोजच्या सैन्याचा कोलाहल ऐकू आला. हल्ला येणार हे तर ठरलेलेच होते, पण तो इतक्या पहाटे येईल असे वाटले नव्हते. कदाचित राणीच्या प्रयाणाचा बेत कोणा फितुराने फोडला असावा. खचलेल्या बुरजाकडे राणीने आपला मोहरा वळवला. एव्हाना जोरदार धुमश्चक्री सुरू झाली होती. उपाशी तापाशी, थकली भागली झाशीची सेना तळाहातावर शीर घेऊन ताज्या दमाच्या गोऱ्या पलटणीला रोखून धरण्याचा नेटाने प्रयत्न करीत होती. त्या रणवीरांमध्ये मिसळून जाऊन रणयज्ञात आत्माहुती देण्याची एक जोरदार उर्मी राणीच्या मनात उचंबळली, पण विवेक राखून तिने मन आवरले, सर्रकन तिची तलवार म्यानाबाहेर निघाली. मागे वळून स्वाराकडे सूचक पहात तिने तलवार उंचावली. उगवत्या सूर्याचा पहिला किरण तलवारीवर तळपला. जणू तिच्या दैवी कार्यास परमेश्वरी आशीर्वाद मिळाला. हर हर हर महादेव ऽऽऽऽऽऽऽऽ ची गगनभेदी आरोळी विरण्यापूर्वीच राणीने घोड्याला टाच दिली. खचलेल्या

तटावरून घोडा फेकला. सैनिकांनी आपल्या नेत्याचे अनुकरण केले. राणी आणि तिची तीनशे स्वाराची तुकडी तटाबाहेरच्या गर्दीत मिसळली. आडव्या येणाऱ्या गोऱ्याला जोंधळ्याच्या कणसांप्रमाणे तोडत वेगाने तुकडी पुढे पुढे सरकू लागली. पाहता पाहता वेढा फोडून बाहेर पडली आणि ग्वाल्हेरच्या दिशेने चौखूर उधळली.

जिवाच्या कराराने घोडी दौडवीत राणी ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या दारात आली. शिंद्यांनी राणीला मदत देण्याचे सोडाच पण किल्ल्यात आश्रय देण्याचेसुद्धा नाकारले. राणीसाठी ग्वाल्हेरचे दरवाजे उघडते, तर कदाचित इतिहासच बदलला असता. पण दैवाला ते मंजूर नव्हते. भारतमातेच्या दुर्दैवाचे दशावतार अजून पूर्ण व्हायचे होते. घामाने निथळणारी घोडी पुन्हा काल्पीच्या दिशेने निघाली. पाठलाग चुकवीत तात्या टोपेंना जाऊन राणी मिळाली. राणीच्या सांगण्यावरून ३० मे १८५८ ला तात्या टोपेने ग्वाल्हेर जिंकून घेतले. शिंद्यांनी इंग्रजांना साकडे घातले. १७ जून १८५८ ला सर ह्यूज रोज व रॉबर्ट नेपियर ग्वाल्हेरवर चालून आले. घोड्यावर स्वार होऊन राणीने असा कडवा प्रतिकार केला की सर रोज कच खाऊन मागे सरला.

मात्र १८ जून १८५८ ला राणी मुरारच्या छावणीत असताना रॉबर्ट नेपियरने छावणीवर अचानक छापा घातला. घाई घाईने दामोदररावांना पाठीशी बांधून, नवख्या घोड्यावर स्वार होऊन राणी गोऱ्यांची फळी फोडून गर्दीतून बाहेर पडली. घोड्यावर स्वार झालेल्या दोन दासी, कारभारी, एक दोन सेवक, हुजरे इतके मोजकेच लोक सोबत होते. दौडता दौडता वाटेत सुवर्णरेखा नावाचा एक ओढा आडवा आला. नवखा घोडा पाण्याला बिचकला. झेप घेईना. घोडा अडखळला आणि पाठलागावरील गनिमाने राणीला गाठले. तुंबळ धुमश्चक्री उडाली. राणीने अनेक गनिमांना कंठस्नान घातले. पण अखेर तिचे बळ तोकडे पडले. एका इंग्रजाने राणीच्या तोंडावर आडवा तिडवा वार केला आणि तिचा उजवा डोळा लोंबू लागला. दुसऱ्याने छातीवर मर्मभेदी वार केला, तर लगेचच तिसऱ्याने तिच्या मस्तकावर प्राणांतिक वार केला.

तशाही अवस्थेत राणीने त्या दोघांना ठार केले आणि घोडा ओढ्यात घातला. कारभारी रामचंद्ररावाने राणीला गर्दीपासून दूर नेले. राणीच्या पवित्र देहाला म्लेच्छांचा स्पर्श होऊ नये म्हणून मोठ्या कष्टाने त्याने राणीला गंगादास बाबांच्या पर्णकुटीत आणले. दामोदररावांस गंगादास बाबांच्या हवाली करून राणीने शेवटचा श्वास सोडला. रामचंद्रराव व गंगादास बाबांनी गवताची गंजी पेटवून राणीला अग्नी दिला. एक तेजस्वी अग्निज्वाला अग्नीच्या स्वाधीन झाली.

राणीच्या मरणाचे वृत्त समजल्यावर राणीवर हल्ला करणाऱ्या सर ह्यूज रोजने लिहून ठेवले आहे. ''बंडखोरांच्या सैन्यातील सर्वात शूर आणि सर्वोत्तम सेनानी कोणी पुरुष नव्हे तर एक स्त्री होती. ती म्हणजे झाशीची राणी लक्ष्मीबाई होय.'' स्वदेश व स्वाभिमानासाठी लढता लढता झाशीची राणी धारातीर्थी पडली. १८५७ च्या पहिल्या क्रांतीयुद्धात एक तेजस्वी समिधा अर्पण झाली. आज सुद्धा राणी लक्ष्मीचे नाव घेताना प्रत्येक सच्चा बुंदेला गहिवरतो.



३. तात्या टोपे

हुतात्मा सेनापती तात्या टोपे
जन्म - १८१४, येवला
फाशी - १८ एप्रिल १८५९, शिवपुरी

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचा सारा व्यूह ढासळला तरी ज्या काही मोजक्या वीरांनी तो लढा नेटाने पुढे चालवला आणि इंग्रजांच्या तोंडचे पाणी पळविले. त्या वीरांमध्ये सर्वात वरचा क्रम लागतो शेवटच्या पेशव्यांचे शेवटचे म्हणजे, मराठेशाहीचे शेवटचे सेनापती तात्या टोपे यांचा. तात्या टोपे हे युरोपियन वृत्तपत्रांमध्ये ज्याची दखल घेतली गेली असे एकमेव अद्वितीय भारतीय सेनानी होते. तात्यांचे मूळ नाव रामचंद्र पांडुरंग भट. त्यांचा जन्म सन १८१४ मध्ये महाराष्ट्रात येवला येथे झाला.

तात्या टोपेनी सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात नोकरी पत्करली. पण आपले राज्य बुडवणाऱ्या इंग्रजांविषयी त्यांच्या मनात द्वेष भावना असल्याने लवकरच त्यांनी ती नोकरी सोडली. नंतर ते श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे प्रमुख अंगरक्षक व वैयक्तिक कार्यवाह झाले. तात्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी. बोलणे मिठ्ठास व मुद्देसूद. मराठीशिवाय हिन्दी, उर्दू, गुजराथी, संस्कृत या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इंग्रजीचेसुद्धा कामचलाऊ ज्ञान त्यांना होते. त्यांची सहज छाप पडे. यामुळे त्यांनी इंग्रजी फौजेतील हजारो शिपायांना आणि नागरिकांना स्वातंत्र्यासाठी बंड पुकारून लढ्यास सिद्ध केले.

देशभर १८५७ च्या युद्धाचा वणवा पेटला. वरकरणी श्रीमंत नानासाहेब इंग्रजांशी गोडीगुलाबीने राहत असल्याने कानपूरचा कलेक्टर हिलर्सडन याने त्यांचे सहाय्य मागितले. त्या संधीचा फायदा घेऊन श्रीमंत फौजेसह कानपूरात दाखल झाले. तात्यांनी मुत्सद्देगिरीची कमाल करून लढाईशिवायच कानपूरचा खजिना व दारुगोळ्याचे कोठार कब्जात घेतले. श्रीमंतांनी ४ जून १८५७ ला कानपूरवर विजय मिळवला. श्रीमंत नानासाहेबांनी कानपुरात १ जुलै १८५७ ला स्वतःला राज्याभिषेक करून घेतला व स्वातंत्र्यांची द्वाही फिरवली पण हे स्वातंत्र्य क्षणभंगुर ठरले. इंग्रजांनी सर्व शक्तीनिशी कानपूरवर हल्ला चढवला. १६ व १७

जुलै १८५७ ला घनघोर रणसंग्राम झाला. तात्यांनी रणनैपुण्याची पराकाष्ठा केली. सैनिकांनी जिवाची बाजी लावली. पण दुर्दैवाने पेशव्यांना पराभव पत्करावा लागला. ते इंग्रजांचा पाठलाग चुकवीत नेपाळात गेले. पुढे त्यांचे काय झाले कोणालाच कधी कळले नाही.

विस्कळीत झालेल्या क्रांतिकारकांच्या सेनेची जमवाजमव काल्पीच्या ठाण्यावर करून तेथून नवी आघाडी उघडण्याची पेशव्यांची त्यांना आज्ञा होती. त्याप्रमाणे तात्यांनी बऱ्याच मोठ्या सेनेची जमवाजमव केली. त्यांनी गनिमी काव्याने अनेक लढाया करून इंग्रजांना त्रस्त करून सोडले. मनुष्यबळ आणि साधन सामुग्रीने समृद्ध असलेले ग्वाल्हेर क्रांतिकारकांच्या पक्षाकडे असणे आवश्यक होते. तात्यांनी अनेक हिकमती लढवून ग्वाल्हेरचे सारे सैन्य आधीच आपल्याकडे वळवून घेतले होते. त्यामुळे जेव्हा त्यांनी राणी लक्ष्मीबरोबर १ जून १८५८ ला ग्वाल्हेरवर हल्ला चढवला, तेव्हा तात्यांना पाहताच शिंद्यांचे सारे सैन्य त्यांना येऊन मिळाले. लढाई केल्याशिवाय ग्वाल्हेर सर झाले. शिंदे आणि त्यांचे दिवाण आग्र्याला इंग्रजांच्या आसऱ्याला पळाले.

शिंद्यांना मदत करण्याचे निमित्त करून आणि त्यांनाच पुढे करून १८ जून १८५८ ला सर ह्यूज रोज याने तात्यांवर अचानक हल्ला चढवला. अत्यंत घनघोर युद्ध झाले. पण गनिम वरचढ ठरला. तात्यांचा पराभव झाला. गनिमाची फळी फोडून निसटून जाण्याच्या प्रयत्नात राणी लक्ष्मीबाईला वीरमरण आले. मात्र तात्या आपल्या तुकड्यांसह इंग्रजांना गुंगारा देण्यात यशस्वी ठरले.

अनेक महिने पर्यंत तात्या इंग्रजांना हुलकावण्या देत गनिमी काव्याने लढत राहिले. इसागड, तलबहाट, चंदेरी अशा अनेक ठिकाणी त्यांनी इंग्रजांना खडे चारले. पण त्यांना उसंत मिळू न देण्याचा, स्थिरावू न देण्याचा चंग इंग्रजांनी बांधला. तात्यांना जर स्थिरावण्याची संधी मिळाली असती तर त्यांनी काय चमत्कार केला असता हे इंग्रज इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. पार्क, मिचेल आणि बेचर असे तीन-तीन श्रेष्ठ इंग्रज रणधुरंधर लांडग्यांसारखे त्यांच्या पाठलागावर होते. २६ ऑक्टोबर, १८५८ ला होशंगाबाद पासून २० कोसांवर (४० मैल) तात्यांनी नर्मदा ओलांडली. तीन-तीन सेनानींना तोंड देत त्यांनी हा चमत्कार केला. त्यांच्या या पराक्रमाचे मोल काय होते हे आपल्याला त्या काळातील इंग्रजी आणि इतर युरोपियन वृत्तपत्रांनी त्या घटनेला जी ठळक प्रसिद्धी दिली त्यावरून समजून येईल. इतिहासकार मॅलिसन आणि कलकत्त्याचे इंग्रजी वृत्तपत्र - ''फ्रेंडस् ऑफ इंडिया'' त्यांचे कौतुक करताना थकत नाहीत. त्यांनी त्यांची तुलना नेपोलियन बरोबर केली आहे. एवढेच नव्हे तर ''लंडन टाइम्स'' सारख्या पत्राने तर तात्यांवर गौरवपर अग्रलेख लिहिला होता.

या लांडगेतोडीच्या काळात तात्या दर दिवशी ६०-६० मैलांच्या मजला मारीत. या पळापळीच्या, माघारीच्या आणि विजय-पराजयाच्या लपंडावाच्या काळातसुद्धा तात्यांनी हजारो लोकांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा उत्पन्न केली. त्यांच्या मना-मनांमध्ये क्रांतीचे स्फुल्लिंग पेटवले. कष्ट, उपासमार आणि मरण या शिवाय अन्य कोणताही मोबदला मिळण्याची आशा नसताना.

नवनवीन तरुणांची त्यांच्या सैन्यात सतत भरती होत राहिली. कित्येक प्रसंगी त्यांच्या दळामध्ये दहा दहा हजार सैनिक असल्याचा इंग्रजांना अनुभव आला आहे. याला तात्यांचे व्यक्तिमत्व जसे कारण होते, तसेच त्यावेळी सारा देश स्वातंत्र्याच्या उर्मीने कसा भारलेला होता आणि योग्य नेतृत्व लाभताच स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिर घेऊन झुंजण्यास सिद्ध होता हे सुद्धा स्पष्ट होते. म्हणूनच हे केवळ सैनिकांचे बंड आणि मूठभर विलासी संस्थानिकांचे स्वार्थी युद्ध होते हा इंग्रजी इतिहासकारांचा दावा आपोआपच खोटा ठरतो. या क्रांतियुद्धाच्या अपयशातून आलेल्या घोर नैराश्यामधून अजून देश सावरलेला नाही.

तात्या आटोपत नाही असे पाहून कंपनी सरकारने विश्वासघाताचा आश्रय घेण्याचे ठरवले. त्यांच्या अटकेसाठी १० लाखांचे बक्षीस जाहीर करून विश्वासघातक्याचा शोध सुरु केला. स्वार्थासाठी शिंद्यांचा सरदार मानसिंग तात्यांच्या मैत्रीचे गळा घोटण्यास, स्वदेशाशी द्रोह करण्यास तयार झाला. राष्ट्रघातकी मानसिंगाने काही निमित्त काढून तात्यांना आपल्याकडे बोलावले. रात्री जेवण खाणे झाल्यावर आग्रहाने आपल्या तळावर ठेवून घेतले. दगाबाज मानसिंगाने ७ एप्रिल १८५९ च्या काळरात्री सर मिड ला तात्यांचे निवासस्थान दाखवले. घोडदौडीने दमून गाढ झोपलेल्या तात्यांवर झडप घालून त्यांना बंदिवान करण्यात आले. जेरबंद करून अतिशय कडक बंदोबस्तात रातोरात त्यांना शिवपुरी येथील रिचर्ड मिडच्या तळावर नेण्यात आले. त्याच किल्ल्याच्या बंदिखान्यात त्यांना डांबण्यात आले.

शिवपुरीच्या किल्ल्यात लष्करी न्यायालय उभे करून खटला चालवला गेला. त्यांच्यावर राजद्रोहाचा आणि कंपनी सरकार उलथून पाडण्याचा आरोप ठेवला गेला होता. हा खटला अर्थातच देखावा होता. परक्यांचे ते न्यायालयच तात्यांना मान्य नव्हते. त्यामुळे त्याने ठेवलेल्या आरोपाला त्यांच्या लेखी किंमत नव्हती. ‘‘आपण केवळ आपल्या धन्याची, श्रीमंत नानासाहेब पेशव्यांचीच तेवढी आज्ञा मानतो, बाकी काही जाणत नाही.’’ या पलिकडे त्यांनी एकही शब्द उच्चारला नाही. तात्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. पकडले गेल्यापासून अकराव्या दिवशी म्हणजे १८ एप्रिल १८५९ या दिवशी शिवपुरी किल्ल्याच्या मागील परेड ग्राउंडवर ३, बंगाल रेजिमेंट ह्या गोऱ्या पलटणीच्या शेकडो सोजिरांच्या कडक पहाऱ्यात सायंकाळी ५ वाजता तात्यांना फासावर लटकवण्यात आले. फाशी पाहण्यासाठी शेकडो इंग्रज स्त्री पुरुष उपस्थित होते. इंग्रज स्त्रियांनी त्यांची स्मृती म्हणून फासावरून उतरवलेल्या तात्यांच्या केसाची झुलपे कापून घेतली. त्यांची तशीच झुलपे आणि सैनिकी अंगरखा लंडनच्या ब्रिटिश आर्मी म्युझियममध्ये जतन करून ठेवण्यात आला होता. १८५७ च्या शताब्दी समारंभाच्या निमित्ताने त्या वस्तू स्वदेशात परत आणल्या गेल्या.

१८५७ चे स्वातंत्र्य समर फसले. अनेक संस्थाने खालसा झाली. संसार उद्ध्वस्त झाले, हजारो वीर धारातीर्थी पडले. क्रांतिकारकांना फाशी पासून काळ्या पाण्यापर्यंत शिक्षा झाल्या. यज्ञकुंड विझले. पण त्याच्या राखेतूनच पुढच्या पिढ्यांमध्ये क्रांतीची बीजे अंकुरली

४. वासुदेव बळवंत फडके

क्रांतिरत्न वासुदेव बळवंत फडके
जन्म - ४ नोव्हेंबर १८४५
फाशी - १७ फेब्रुवारी १८८३

अनेक हुतात्म्यांच्या आहुत्या घेऊन १८५७ चे यज्ञकुंड शांत झाले. कंपनी सरकारने युद्ध जिंकले असले तरी, त्या सरकारच्या हातात साम्राज्याचा कारभार राहू देणे ब्रिटिश राजमुकुटाला परवडणारे नाही, हे अनेक प्रकारे सिद्ध झाले होते. परिणामी कंपनी सरकारचा अंमल जाऊन राणी व्हिक्टोरियाचा अम्मल सुरू झाला. फसलेल्या स्वातंत्र्य युद्धाने लोकांना नैराश्याने घेरून टाकले होते.

पण पुण्यातला एक तरुण मात्र बेचैन होता. अस्वस्थ होता. रात्र रात्र अंथरुणात तळमळत होता. आपल्या देवघरातील दत्तात्रयासमोर घटका घटका ध्यान धरून बसत होता. चांगली सरकारी नोकरी, सोन्यासारखा संसार असताना, त्याला स्वस्थता नव्हती. नव्या परक्या राज्यकर्त्यांची मनमानी आणि अत्याचार त्याला अस्वस्थ करीत होते. मरण पंथाला लागलेल्या आईचे दर्शन केवळ अधिकाऱ्यांनी सुट्टी नाकारल्यामुळे त्याला घेता आले नव्हते. त्यामुळे या अस्वस्थतेत संतापाची ठिणगी पडली होती. देशात पडलेल्या दुष्काळाने रयतेची झालेली वातहत आणि इंग्रज सरकार कडून दुष्काळग्रस्तांची अपेक्षा, पिळवणूक, नाडवणूक त्याने सर्वत्र हिंडून उघड्या डोळ्याने पाहिली होती. चाऱ्या अभावी तडफडून मरणारी गुरे आणि भूक भूक करीत वणवण हिंडणाऱ्या माणसांचे अस्थिपंजर कळप त्याच्या मिटल्या डोळ्यासमोर आज सुद्धा स्पष्ट उभे राहत असत. एके दिवशी भल्या पहाटे ही अस्वस्थता संपली. दत्तगुरुंनी त्या तरुणाला दृष्टांत दिला. मन शांत झाले. त्याने निश्चय केला, आता दीन दुबळ्यांचे कल्याण हेच व्रत आणि पांढऱ्या पायाच्या इंग्रजाला देशाबाहेर हाकलणे हेच ध्येय. निश्चिंत मनाने त्या तरुणाने आसन सोडले. त्या तरुणाचे नाव होते वासुदेव बळवंत फडके.

वासुदेव बळवंतानी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. ते दुष्काळाने पोळलेल्या लोकांना मदत करण्यासाठी गावोगाव हिंडू लागले. आजच्या या दैन्याचे कारण इंग्रजच कसे आहेत हे ते लोकांना पटवून देत. हळूहळू त्यांच्या भोवती समविचारी तरुणांचा घोळका जमू लागला. या घोळक्याला त्यांनी संघटनात्मक स्वरुप देण्यास सुरुवात केली. गुप्तपणे शस्त्रास्त्रे, हत्यारे जमविण्यास सुरवात केली. छत्रपती शिवराय हा या कामी त्यांचा आदर्श होता. आपल्या

सहकाऱ्यांना घेऊन ते लांब लांब मजला मारीत खेड्यापाड्यात, दऱ्या डोंगरात हिंडत. त्यांच्या अनुयायांमध्ये फक्त ब्राह्मणच होते असे नाही तर मुख्य भरणा रामोशी, मांग, कोळी अशांचा होता. दोनशे निष्ठावान कोळी आणि रामोशींचे सैन्य त्यांनी उभे केले. दौलतराव नाईक रामोशीला त्यांनी मुख्य सरकार नेमले.

स्वराज्य उभे करायचे म्हणजे प्रदेश जिंकणे आले. त्यासाठी सैन्य उभारावे लागते. सैन्याला लढण्यासाठी शस्त्रे आणि पोटासाठी पगार पाहिजे. या साऱ्या गोष्टी पैशावाचून होत नाहीत. त्यासाठी पैसा मिळवावा लागतो. हे काम देणग्या गोळा करून किंवा भिक्षा मागून होणाऱ्यातले नाही. गोरगरीब रयतेला नाडून, पिळून श्रीमंत झालेल्या आणि स्वार्थासाठी इंग्रजांना निष्ठा वाहिलेल्या शेठ, सावकार, व्यापारी, जमीनदार, वतनदार इ. ना लुटूनच हा पैसा उभा करावा लागणार असल्याचे वासुदेव बळवंतांच्या लक्षात आले. त्यासाठी दरोडे घालावे लागणार होते. स्वराज्यासाठी हे दिव्य करण्याची त्यांची तयारी होती. पहिला दरोडा घातला गेला धामारी गावात दौलतचंद किलाचंद मारवाडी नावाच्या सावकाराच्या घरावर. त्या दिवशी तारीख होती १३ फेब्रुवारी १८७९. त्या नंतर दरोड्यांची मालिकाच सुरू झाली. प्रचंड लूट मिळू लागली. त्या पैशातून तलवारी, बंदुका, काडतुसे आणि इतर शस्त्रांची खरेदी केली जाऊ लागली. सैन्याचा पगार दिला जाऊ लागला. त्या व्यतिरिक्त फार मोठी रक्कम नाडल्या, पिडल्या, गरीब रयतेत वाटली जाऊ लागली. यामुळे साहजिकच लोक त्यांना त्राता मानू लागले. लोभी आणि मुजोर सावकार जमिनदारांच्या मनात वासुदेव बळवंतांच्या विषयी धाक निर्माण झाला तर सर्वसामान्य लोकांत, पांढरपेशे असो वा रयत, त्यांच्याविषयी श्रद्धा, प्रेम, आदर व सद्भाव उत्पन्न झाला, वेगवेगळ्या जाती जमातीचे अनुयायी फार मोठ्या संख्येने झपाट्याने त्यांच्या भोवती गोळा होऊ लागले.

या घटनांचे वृत्त मुंबई, कलकत्ता, मद्रास येथील देशीच नव्हे तर इंग्रजी वर्तमानपत्रात छापून येऊ लागले. सरकारवर टीका होऊ लागली. भरीसभर म्हणजे या बाबत मुंबई सरकारला थेट लंडन वरून कान पिचक्या मिळाल्या. वासुदेव बळवंतांचे वाढते वर्चस्व आणि त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा पाहून मुंबई प्रांताचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल घाबरला. त्याला १८५७ च्या पुनरावृत्तीची भीती वाटू लागली. सर टेंपलने वासुदेव बळवंतांचा बंदोबस्त करण्यासाठी अत्यंत कर्तबगार आणि तडफदार म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या मेजर विल्यम हेन्री डॅनियल नावाच्या सेनाधिकाऱ्याची खास नेमणूक केली. त्याच्या दिमतीला सर्व प्रकारच्या सुविधा आणि भरपूर सैन्य दिले. मेजर डॅनियल तडफेने कामाला लागला. रयतेचा पाठिंबा असल्यामुळे सुरुवातीच्या काळात खूप कष्ट करून सुद्धा त्याला थोडे देखील यश मिळाले नाही. जनतेचा पाठिंबा एवढा भक्कम होता की जंग जंग पछाडूनसुद्धा त्याला थोडासुद्धा माग मिळू शकत नव्हता. जे काम

बळाने साधत नाही ते काम पैशाने सहज साधते, हे जाणून सर टेंपलने वासुदेव बळवंतांवर रू. ४,०००/- चे बक्षीस जाहीर केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून वासुदेव बळवंतांनी पुण्याच्या कलेक्टरच्या डोक्यावर रू. ३,०००/- चे तर मुंबईच्या गव्हर्नरच्या डोक्यावर रू. ५,०००/- इनाम जाहीर केले. तसे जाहीरनामे खेडोपाडी झळकले.

मोहिमेला सरळ मार्गाने यश येत नाही हे पाहून मेजर डॅनियलने फंदफितुरीस सुरुवात केली. याच दरम्यान दरोड्यात मिळणारी प्रचंड लूट पाहून काही रामोश्यांची बुद्धी फिरली. दरोडे घालण्याचा मूळ उदात हेतू ते विसरले. त्यांनी लूट दडपण्यास, इतकेच नव्हे तर वासुदेव बळवंतांच्या नावावर परस्पर दरोडे घालून, स्वार्थी हेतूने अत्याचार करून, दहशत फैलावण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की मेजर डॅनियलच्या फंदफितुरीला हळूहळू यश येऊ लागले. त्याला वासुदेव बळवंतांचा माग सापडू लागला. त्यामुळे चेव येऊन तो शिकारी कुत्र्यासारखा त्यांच्या मागे लागला. वारंवार चकमकी झडू लागल्या. अशाच एका चकमकीत त्यांचा उजवा हात, दौलतराव नाईक, मेजर डॅनियलच्या गोळीला बळी पडला. नाईक पडल्यावर रामोश्यांमध्ये फाटाफूट झाली. काही बेईमानांना नाईलाजाने दूर करावे लागले. स्वार्थ साधेना म्हणून काही साथ सोडून गेले. सारेच विस्कळीत होऊन गेले. काही मोजक्या सहकाऱ्यांसह ते मेजर डॅनियलचा पाठलाग चुकवत रानोमाळ पळत होते. अपयश, प्रतारणा आणि उपासमारीमुळे त्यांना घोर निराशेने घेरले. नैराश्य दूर करण्यासाठी ते गाणगापुरास गेले. काही दिवसांनी ते श्री शैल येथे कृष्णा नदीच्या तीरावर जाऊन काही दिवस राहिले. अनुष्ठाने आणि तपश्चर्या करुन यांनी नैराश्य झटकून टाकले. इंग्रजांशी नव्या दमाने लढा देण्यासाठी पुन्हा जोमाने उभे राहिले. पदरची सारी पुंजी मोडून त्यांनी हैद्राबाद संस्थानात पाचशे रोहिल्यांचे पगारी सैन्य उभे केले.

पण दुर्दैव वासुदेव बळवंतांच्या मागे हात धुऊन लागले होते. मेजर डॅनियलने जास्त पैशाची लालूच दाखवताच रोहिले बेईमान झाले आणि वासुदेव बळवंतांवरच उलटले. मोठ्या मुष्किलीने ते त्या अरिष्टातून निसटले. पुन्हा एकदा मेजर डॅनियलला चुकवत रानोमाळ पळापळ सुरू झाली. एकाकी अवस्थेत आपल्या मुलुखापासून दूर, परक्या प्रदेशात, निष्कांचन परिस्थितीत, पाठलाग चुकवीत ते लांबलांब मजला मारीत राहिले. उपसामार आणि सतत उघड्यावर राहणे यामुळे त्यांना कायम ताप येऊ लागला. जणू डोक्याची शकले उडतील की काय असे वाटावे अशी असह्य डोकेदुखी मागे लागली.

अशा विकल व विपन्नावस्थेत ते एका रात्री विजापूर जिल्ह्यातील देवरनाडगी गावात पोहोचले. गावात त्यांना ना अन्न मिळाले ना आसरा. डोक्यात घण पडावेत अशी डोकेदुखी, अंग तापाने फणफणलेले, अशा अवस्थेतच त्यांनी पोहत पोहत भीमा नदी पार केली व ते

पैलतीरावरील बौद्ध विहारात पोहोचले. तिथेच भिकारी आणि गोसाव्यांमध्ये ओले घोंगडे पांघरून तापाने भरलेले उपाशी तापाशी झोपून राहिले. माग काढीत मेजर डॅनियल देवरनाडगी गावात पोहोचला. रोहिल्यांचा विश्वासघातकी नायक त्याच्या सोबत होता. वासुदेव बळवंत नदीपार बौद्ध विहारात गेल्याची खबर मिळताच तो वेळ न दवडता बौद्ध विहारात पोहोचला. भिकारी आणि गोसाव्यामध्ये झोपलेले वासुदेव बळवंत ओळखून फितुराने दुरूनच दाखवले. ते तापाच्या ग्लानीत झोपेत असतानाच मेजर डॅनियल त्यांच्या छातीवर बसला. शारीरिक थकवा, उपासमार, डोकेदुखी आणि तापाने अशक्त झालेले वासुदेव बळवंत काही प्रतिकार करण्यापूर्वीच त्याने त्यांना बेड्या घातल्या आणि दोरखंडांनी जेरबंद केले.

अतिशय कडक बंदोबस्तात त्यांना पुण्यात आणण्यात आले. संगमावरील कोर्टात त्यांचा खटला उभा राहिला. खटल्याचे कामकाज ऐकण्यासाठी आलेल्या प्रतिष्ठितांच्या गर्दीने कोर्टाचे दालन फुलून जाई. त्यांचे दर्शन व्हावे म्हणून खेड्यापाड्यातून आलेले गोरगरीब कोर्टाच्या आवारात उन्हातान्हाची पर्वा न करता गर्दी करीत. त्यांचा जयजयकार करीत. त्या गर्दीला आवर घालता घालता पुण्याच्या पोलिसांच्या नाकी नऊ येत. दरोडे,

चोऱ्या, मनुष्य वध या बरोबरच महाराणी विरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारून राजद्रोह केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला होता. इंग्रजांचे भारतातील अन्यायी राज्य हे अनैसर्गिक व बेकायदेशीर असल्याने त्याने रचलेला हा खटलाच आपल्याला मान्य नसल्याची वासुदेव बळवंतांची भावना होती. त्यामुळे कोर्टासमोर कोणताही युक्तिवाद करणे त्यांना मान्य नव्हते. सुनावणीचे नाटक पूर्ण करून शेवटी जन्मठेप, काळे पाणी आणि हद्दपारी (डिपोर्टेशन) ची कठोर शिक्षा ठोठावली गेली.

शिक्षा जाहीर होताच थेट कोर्टातून त्यांना रेल्वे स्टेशनवर नेले गेले. गाडी थेट मुंबई बंदरात नेली. कैदी बोटीवर चढताच बोटीने नांगर उचलला आणि बोट रवाना झाली. एडनच्या तुरुंगात त्यांचा अतोनात छळ केला गेला. तशा प्रतिकूल परिस्थितीतदेखील त्यांची विजिगिषी वृत्ती जिवंत होती. ते तुरूंग फोडून पळाले. पण अनोळखी, वाळवंटी प्रदेश, परकी भाषा, मदतीचा अभाव अशा अवस्थेत पळणार तरी किती आणि कुठे ? स्वाभाविकच ते पकडले गेले. तुरुंगात परत आणल्यानंतर छळ आणि हालअपेष्टांचे प्रमाण अधिकच वाढले. अन्नपाणी तोडले गेले.

अशा अनंत हालअपेष्टा सोसत, परक्या वाळवंटी भूमीत मातृभूमीपासून हजारो कोस दूर, एकाकी अवस्थेत, एडनच्या तुरुंगात या आद्य क्रांतिकारकाचे प्राण त्याचे नश्वर शरीर सोडून गेले. पण हे बलिदान व्यर्थ जाणार नव्हते. त्यांच्या चितेतून उठणाऱ्या ठिणग्यांमधून अनेक राष्ट्रभक्तांच्या काळजात हौतात्म्याचे स्फुल्लिंग पेटणार होते. त्याने चेतवलेली ही आग इंग्रजी राज्याचा बळी घेऊनच शांत होणार होती.

५. चाफेकर बंधू

हुतात्मा दामोदर हरी चाफेकर
जन्म - २५ जून १८६९, चिंचवड
फाशी - १८ एप्रिल १८९८, पुणे

चीनमधून आलेल्या एका गलबतातील उंदरांनी मुंबईत प्लेग आणला. यथावकाश प्लेग घाट ओलांडून पुण्यात आला. प्लेगचे थैमान सुरू झाले. काखेत वा जांघेत गाठ येई. फणफणून ताप चढे आणि दिवसा दोन दिवसातच रोगी दगावे. पुण्यात मृत्यूचे थैमान सुरू होते. सर्वत्र हाहाःकार माजला. प्लेग आटोक्यात आणण्यासाठी इंग्रज सरकारने अनेक उपाय योजले. स्वच्छता मोहिमा काढल्या. हे सर्व उपाय व योजना वरकरणी खूपच उपकारक आणि कागदोपत्री आदर्श दिसत असल्या तरी त्यांची अम्मलबजावणी करताना गोऱ्यांची हिन्दूंचा अपमान करण्याची वृत्ती उफाळून येत असे. हिन्दूंच्या धर्म भावना, रुढी, परंपरा, लोकलाज यांच्याशी त्यांचे काहीच देणे घेणे नसे. त्यांच्या घरात, माजघरात, देवघरात सोजीर पायातील जोड्यांसह घुसत. सोवळे भ्रष्ट करीत. लोणची, पापड इ. साठवणुकीच्या सोवळ्यातील वस्तूच नव्हे तर देव सुद्धा रस्त्यावर फेकून देत. रोगापेक्षा उपाय त्रासदायक असा प्रकार झाला. लोक त्रस्त झाले. मग सोजिराच्या धाकाने रोग आणि रोगी लपवू लागले. त्यामुळे सोजिरांना अत्याचारास आयतेच कारण सापडले. तपासणीच्या नावाखाली बायका-माणसांच्या अंगचटीला येणे, भल्या भल्या गृहस्थांना उघडे-नागवे करून भर रस्त्यात उभे करणे. त्याच अवस्थेत त्यांची धिंड काढीत रस्त्यातून सर्रास हिंडवणे. प्रसंगी मौल्यवान चीज वस्तू लुबाडणे, असे प्रकार सुरू झाले. ह्या अत्याचारातून भले भले नागरीक भरडले गेले. सर्व सामान्य रयतेच्या त्रासाला तर काही सीमाच नव्हती. या त्रासापेक्षा, अत्याचारापेक्षा आणि मानहानीपेक्षा प्लेग परवडला अशी भावना सर्वत्र उत्पन्न झाली. या आगीत तेल म्हणजे पुण्यात कमिशनर म्हणून रँड नावाच्या एका गोऱ्याची नेमणूक झाली. हा रँड साहेब मराठ्यांचा अत्यंत द्वेष्टा होता. त्यातही पेशव्यांच्या जातीचे म्हणून चित्पावनांवर त्याचा विशेष दात होता. त्याच्या छुप्या पाठिंब्याने आणि सोईस्कर दुर्लक्षाने अत्याचारांना नवेच उधाण आले.

ह्याची प्रतिक्रिया उमटणे व प्रतिकार होणे स्वाभविकच होते. रात्रीच्या अंधारात किंवा

आड वाटेवर एकट्या दुकट्या सोजिराला पकडून चोप देण्याचे प्रकार वाढू लागले. अशाप्रकारे गोऱ्यांना धडा शिकवण्याच्या प्रकारात कीर्तनकार हरिपंत चाफेकरांचा दामोदर आणि त्याचे दोघे धाकटे भाऊ नेहमीच आघाडीवर असत. दामोदरने व्यायामपटू तरुणांचा एक गटच आपल्या भोवती गोळा केला होता. लोकमान्य टिळकांकडे, गायकवाड वाड्यात, त्याचे जाणे येणे असे. दामोदरच्या अशा उद्योगांना लोकमान्यांचा छुपा पाठिंबा असे. अशाच एका भेटीत लोकमान्यांनी अशा फुटकळ उद्योगांपेक्षा काहीतरी भरीव, जास्त परिणामकारक कृत्य करण्यास त्यांना खडसावले. ह्या शद्बांनी दामोदरच्या हृदयात स्फुल्लिंग पेटले.

हुतात्मा बाळकृष्ण हरी चाफेकर
जन्म - १८७३, चिंचवड
फाशी - १० मे १८९९, पुणे

आपल्या प्रचंड मित्रपरिवारामधून दामोदरने निवडक अन् विश्वासू मित्रांचा एक गट तयार केला. तो वारंवार त्यांच्या गुप्त बैठका घेऊ लागला. त्या बैठकांमध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या आणि अपमानाचा, मानहानीचा बदला घेण्याच्या अनेक योजना मांडल्या जात. या कानाची खबर त्या कानाला लागू न देता शस्त्रास्त्रांची जमवाजमव सुरू झाली. सर्व विचार मंथनातून अखेर प्लेग कमिशनर रँडचा वध करण्याची योजना साकार झाली. कटाची अंमलबजावणी खुद्द दामोदर आणि त्यांचे दोन भाऊ बाळकृष्ण आणि वासुदेव हे करणार होते.

दिवसभर सावलीसारखा रँड साहेबाच्या मागे फिरून बाळकृष्णाने त्याच्या हालचालींचा व दिनचर्येचा तपशील गोळा केला. सर्व बाबींचा व्यवस्थित विचार करून साहेबाला उडवण्याचा मुहूर्त ठरला, २२ जून १८९७. त्या दिवशी राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाच्या ज्युबिलीचा मोठा समारंभ गव्हर्नरच्या बंगल्यावर होणार होता. रात्री त्या समारंभावरून परतणाऱ्या रँड साहेबाला गणेश खिंडीच्या अंधाऱ्या रानात छपून राहून उडवायचा बेत पक्का झाला. छोटा वासुदेव गव्हर्नर बंगल्याच्या दारात उभा राहून साहेबाची घोडा गाडी हेरणार आणि तिच्या मागे धावत येणार, 'गोंद्या आला रे' या सांकेतिक शद्बाने ती घोडागाडी दाखवणार, दामोदर गाडीच्या मागे चढून मागच्या खिडकीतून आपल्या जवळील पिस्तुलाने रँडला उडवणार, जर मध्ये कोणी आडवा आला, तर बाळकृष्ण दोन्ही भावांना संरक्षण देणार असा बेत शिजला.

ज्युबिलीच्या दिवशी दामोदर व त्याच्या सहकाऱ्यांनी अंधार पडण्यापूर्वीच आपआपल्या जागा धरल्या. पोलिसांनी त्यांना हटकताच आम्ही कार्यक्रमानंतर होणारी फटाक्यांची आतिशबाजी बघण्यासाठी आलो असल्याचा त्यांनी बहाणा केला. फटाक्यांची आतिशबाजी सुरु असतानाच साहेब आणि मडमा आपआपल्या घोडागाड्यांमध्ये बसून परत निघण्यास सुरुवात झाली. वासुदेवाने रँडची गाडी बरोबर हेरली आणि 'गोंद्या आला रे' असे थोड्या थोड्या वेळाने ओरडत तो घोडा गाडीच्या मागे धावू लागला. वासुदेवाचा आवाज ऐकून दामोदर सावध होऊन सरसावून उभा राहिला. एक ऐटदार घोडागाडी त्याच्या समोरून जाऊ लागताच बाळकृष्ण उतावळेपणा करून झेप घेऊन त्या घोडागाडीच्या मागे चढला. पडदा वर करून त्याने आत बसलेल्या साहेबाच्या डोक्यात गोळी घातली. त्या सरशी त्याला एका स्त्रीची किंकाळी ऐकू आली. त्या अनपेक्षित आवाजाने तो दचकला. कोचवानाने गाडी उभी न करता जास्त वेगाने पळवण्यास सुरुवात केली. उडी मारून बाळकृष्ण गाडीपासून

हुतात्मा वासुदेव हरी चाफेकर
जन्म - १८७९, पुणे
फाशी - ८ मे १८९९, पुणे

दूर झाला. परत वासुदेवाचा ''गोंद्या आला रे'' असा आवाज ऐकू येऊ लागला. बघतो तर एका घोडागाडीच्या मागे वासुदेव धावतोय आणि ओरडतोय ''गोंद्या आला रे, गोंद्या आला रे'' म्हणजे ? त्याच्या हातून कोणी भलतेच मारले गेले होते. बाळकृष्ण बावचळला. तो दिग्मूढ होऊन उभा असतानाच, एका घोडा गाडीच्या मागे धापा टाकीत धावणारा वासुदेव त्यांना दिसला. गाडीकडे हात दाखवत तो ओडरत होता, ''दादा, गोंद्या, दादा गोंद्या आला रे !'' दामोदरला काय करावे काहीच सुचेना. पण प्रसंगावधान राखून तो पुढे सरसावला. गाडीवर झेप घेऊन एकाच गोळीत त्याने कार्यभाग उरकला. शस्त्रे एका नाल्याच्या पुलाखाली टाकून लांबचा वळसा घेऊन आडरस्त्याने ते घरी येऊन गुपचूप झोपले.

२३ जूनला पुणेकर जागे झाले ते रँड आणि आयर्स्ट या दोन साहेबांच्या ज्युबिलीच्या रात्री वध झाल्याच्या वार्तेनेच. देशच नव्हे तर सारे ब्रिटिश साम्राज्य हादरले. देशोदेशीच्या वृत्तपत्रांमध्ये या घटनेवर वार्तापत्रे छापून आली. दिवसामागून दिवस लोटले तरी मारेकऱ्याचा शोध सरकारला लागेना. त्यामुळे सर्वत्र टीकेची झोड उठली. मुंबई सरकारकडे विलायतेतून चौकशा येऊ लागल्या. त्यामुळे अखेर सरकारने ब्रुईन नावाच्या एका अति चाणाक्ष आणि हुशार तपास अधिकाऱ्याला पुण्यास धाडले. हा साहेब अत्यंत थंड डोक्याने काम करणारा व सदोदित सावध म्हणून प्रख्यात होता. मराठी तर तो ब्राह्मणासारखा बोले. लोकमान्य टिळकांसारख्या बड्या राजकारण्यांकडे त्याचे जाणे येणे असे. त्याच्या जिभेवर जणू कायम साखर ठेवलेली असे. दुसऱ्याच्या पोटात शिरून आपला कार्यभाग साधण्यात त्याचा हात धरणारा दुसरा पोलिस अधिकारी नव्हता. अशा ब्रुईन साहेबाने पण जंग जंग पछाडले पण काही म्हणता काही तपास लागला नाही. अखेर सरकारने हल्लेखोरांस पकडून देणाऱ्यास वा त्याची माहिती देणाऱ्यास रू.२०,०००/- चे बक्षीस जाहीर केले.

भारत मातेचे दुर्दैव असे की, चार चांदीच्या तुकड्यासाठी आणि खोट्या स्वार्थासाठी स्वकीयांशी दगलबाजी करणारे या देशात नेहमीच उत्पन्न होत राहिले. बक्षिसाच्या लोभाने चाफेकर बंधूंचे अतिशय विश्वासाचे गणले जाणारे द्रविड नावाचे एक मित्र फितूर झाले. त्यांनी कटांची आणि चाफेकर बंधूंची पूर्ण माहिती ब्रुईनला दिली. या दरम्यान हरिपंत आपल्या

तीनही मुलांना घेऊन सहकुटुंब चातुर्मासातील कीर्तनासाठी मुंबईला येऊन राहिले होते. द्रविड बंधूंनी पुरवलेल्या या माहितीच्या आधारे कामतांच्या चाळीत असलेल्या चाफेकरांच्या बिऱ्हाडी ब्रुईनने २८ सप्टेंबर १८९७ या दिवशी छापा टाकून दामोदर चाफेकरला अटक केली. त्या वेळेस बाळकृष्ण व वासुदेव बिऱ्हाडी नसल्याने बचावले. ते लगेचच फरारी झाले.

शारीरिक छळाने दामोदर बधणार नाही याची जाणीव झाल्याने धूर्त ब्रुईन साहेबाने आपल्या गोड बोलण्याने भोळ्या आणि सरळ मनाच्या दामोदरला बरोबर सापळ्यात अडकवले. अनेक थापा मारून आणि खोटी आश्वासने देऊन त्याने दामोदरकडून कबुली जबाब मिळवला. इतकेच नव्हे तर त्याने लोकमान्य टिळकांना या प्रकरणात गोवण्याचाही बराच प्रयत्न केला. पण त्याला ते शक्य झाले नाही. दामोदरच्या लेखी जबाबाच्या आधारे दामोदरला फाशी झाली. तरी बाळकृष्ण आणि वासुदेव पोलिसांच्या हाती लागले नव्हते. ते निजामांच्या प्रांतात आणि कर्नाटकात खूप कष्टात दिवस काढत भटकत राहिले. या फरारी अवस्थेत लोकमान्य त्यांना शक्य ती सर्व मदत गुप्तपणे करीत राहिले. पण ती मदत पुरेशी ठरत नव्हती. अखेर बाळकृष्णाने वासुदेवास घरी पाठवले. दामोदरची फाशी झाल्यानंतर तो मुंबई बिऱ्हाडी परतला. कटात आपला सहभाग नव्हता, पण केवळ भीतीमुळे आपण पळून गेलो होतो हे ब्रुईनला पटवण्यात तो यशस्वी झाला. ब्रुईनने त्याला मोकळा सोडला.

बाळकृष्णाचा शोध सुरू होताच. फितुरीमुळे तो लवकरच पकडला गेला. त्याला जेरबंद करून पुण्याला आणण्यात आले. खटला चालवून त्यालासुद्धा फाशी ठोठावण्यात आली. पैशाच्या लोभाने द्रविड बंधूंनी फितुरी केली म्हणूनच आपले दोघे वडील भाऊ पकडले जाऊन फाशी गेले याचा वासुदेवाला नेहमी संताप येत असे. रानडे नावाच्या एका मित्राच्या मदतीने त्याने एके दिवशी रात्रीच्या वेळी सारे शहर झोपी जाण्याच्या तयारीत असताना दगलबाज द्रविड बंधूंना यमसदनी पोहचवले. आपल्या भावजयांच्या कपाळीचे कुंकू पुसणाऱ्यावर वासुदेवाने सूड उगवला. पण लवकरच तो आणि रानडे दोघेही पकडले गेले. त्या दोघाही बालवीरांना ठाण्याच्या तुरुंगात फासावर चढवण्यात आले.

आपल्या देशबांधवांच्या आणि समाजाच्या स्वाभिमानाचे रक्षण करण्यास, त्याच्या मानबिंदूंना भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्यास धडा शिकवण्यास आणि त्या योगे सरकारवर जरब बसवण्यासाठी चाफेकरांची एक संपूर्ण पिढी हसत हसत फासावर गेली. १८५७ नंतर देशासाठी फाशी जाऊन प्राणार्पण करणारे दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव हे चाफेकर बंधू आणि त्यांचा निष्ठावान सवंगडी रानडे पहिले हुतात्मे ठरले.

६. अनंत कान्हेरे

हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे
जन्म - १८९२
फाशी - १९ एप्रिल १९१०, ठाणे

भारतात १८५७ नंतर शस्त्रांवर कडक बंदी घातली गेली होती. स्वा. सावरकरांनी बॅरिस्टर राणांकडून पॅरिस येथून जर्मन बनावटीची ब्राऊनिंग पिस्तुले मागवली. पेट्यांना फसवे तळ बसवून आणि कोरलेल्या पुस्तकांमध्ये दडवून ती भारतात ठिकठिकाणच्या क्रांतिकारक गटांकडे पाठवली गेली. अशीच २० ब्राऊनिंग पिस्तुले चतुर्भुज अमीनच्या हस्ते मुंबईत पाठवली. तेथून ती नाशिकसह वेगवेगळ्या ठिकाणी रवाना झाली. मात्र लोभी अमीनने त्यापैकी एक पिस्तुल स्वतःकडे दडवून ठेवले होते. त्याच पिस्तुलाने त्याचा स्वतःचा व त्याच्यामुळे स्वा. सावरकरांचा घात केला.

सावरकर बंधूंच्या उपद्व्यापांमुळे नाशिक जिल्ह्यातील तरुणांची माथी भडकली असून जिल्हाभर राजद्रोहाचे वातावरण निर्माण झाले असल्याने तेथील राजद्रोह निपटून काढण्यासाठी ''पंडित'' जॅक्सन या आय. ए. एस. अधिकाऱ्याला सरकारने नाशिकचा कलेक्टर करून पाठवले. हा जॅक्सन अत्यंत नाटकी, धूर्त आणि पाताळयंत्री इंग्रज होता. तो संस्कृतचा अभ्यासक आणि मराठीचा उत्तम जाणकार होता. मराठी नाटकांचा तर तो विशेष भोक्ता होता. रयतेची गाऱ्हाणी तो दरबार भरवून ऐके. त्याच्या या मुखवट्याला नाशिककर जनता आणि विशेष म्हणजे पांढरपेशा समाज भुलला. त्याच्या या मुखवट्याखाली त्याचा खरा चेहरा चांगलाच झाकला गेला. तो सार्वजनिक, त्यातही राष्ट्रीय चळवळी करणाऱ्यांचा कट्टर द्वेष्टा होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी दडपशाहीची सर्व शस्त्रे सर्रास वापरीत असे. वंग भंग विरोधी आंदोलनात निघालेल्या मिरवणुकीवर त्याने बंदी घातली होती. अनेकांना तुरुंगात अडकवले. २६ सप्टेंबर १९०६ ला निघालेल्या दसऱ्याच्या मिरवणुकीत 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्याचे

निमित्त करून, खरे खोटे आरोप ठेवून अनेक तरुणांवर अनन्वित अत्याचार केले होते. लो. टिळकांना जन्मठेप झाल्यानंतर निघालेला मोर्चा त्याने उधळून लावला होता. कित्येकांना कडक शिक्षा लावल्या होत्या. नाशिक मधील ज्येष्ठ वकील बाबासाहेब खरे यांची वकिलीची सनद जप्त केली. मोकासा वतन व मालमत्ता जप्त केली. त्यांच्यावर इतके अत्याचार केले की ते ठार वेडे झाले. एतद्देशीय व युरोपियन यांच्यात तो बेधडक पक्षपात करी. बापूसिंग नावाच्या एका बैलगाडीवाल्याला किरकोळ चुकीवरुन मारहाण करुन जिवे मारणाऱ्या विल्यम्स नावाच्या एका युरोपियन इंजीनियरवर कोणतीही कार्यवाही न करता त्याला त्याने मोकळे सोडले. कोणताही सबळ पुरावा नसताना बाबाराव सावरकरांनी छापलेल्या चार कविता हा राजद्रोह ठरवून त्यांना त्याने अंदमानात जन्मठेप पाण्यावर पाठवले. खटल्याच्या दरम्यान त्यांची नाशिक शहरातून धिंड काढली. सावरकर कुटुंबाची सारी मालमत्ता जप्त केली.

बाबाराव सावरकरांची विटंबना ही उंटावरची शेवटची काडी ठरली. अभिनव भारतच्या सदस्यांनी या घटनेचा सूड उगवण्याचा निश्चय केला. औरंगाबादचा एक कोवळा तरुण, अनंत लक्ष्मण कान्हेरे, सावरकरांवर परमेश्वरावर ठेवावी तशी निष्ठा ठेवीत असे. त्याचा नाशिकच्या अभिनव भारतच्या मंडळींशी संपर्क जुळून आला होता. जॅक्सनला ठार मारण्याची त्याने सिद्धता दाखविली. काहीना काही निमित्त होत गेले आणि बेत लांबत गेला. कान्हेरेंना नाशिकमधून योग्य सहकारी मिळेना. तेव्हा सारी जबाबदारी स्वतः घेऊन जॅक्सनला आपण एकटेच संपवू अशी त्यांनी ग्वाही दिली. परंतु नक्की काहीच ठरेना. त्यामुळे ते औरंगाबादला निघून गेले.

नाशिकमधील राजद्रोह निपटून काढल्याचे बक्षीस म्हणून जॅक्सनला डिसेंबर १९०९ मध्ये कमिशनर म्हणून बढती मिळाली. पुढील वर्षाच्या सुरुवातीला तो नवीन जागी बदलून जाणार असल्याचे प्रसिद्ध झाले. त्याला नाशिकमधून जिवंत जाऊ न देण्याचा क्रांतिकारकांनी निर्धार केला. नाशिकच्या प्रतिष्ठित मंडळींनी किर्लोस्कर नाटक कंपनीच्या मदतीने जॅक्सनला पानसुपारी देऊन निरोप देण्याचा मोठा जंगी कार्यक्रम ठरवला. त्या कार्यक्रमाच्या निमित्ताने कंपनी ''शारदा'' नाटकाचा खेळ करणार होती. बाल गंधर्व तेव्हा शारदाची भूमिका करीत. या कार्यक्रमातच जॅक्सनला उडविण्याचा क्रांतिकारकांनी निर्धार केला. विनायकराव देशपांडे स्वतः औरंगाबादेस जाऊन कान्हेरेंना नाशिकला घेऊन आले. कान्हेरे अनंतराव देशपांड्यांच्या घरीच उतरले. देशपांडेंनी त्यांना पूर्ण भरलेली दोन ब्राऊनिंग ॲटोमॅटिक पिस्तुले दिली.

(ही पिस्तुले सावरकरांनी चतुर्भुज अमीनच्या हस्ते पाठवलेल्या पिस्तुलांपैकी होती आणि त्यामुळेच सावरकर नाशिक कटाच्या खटल्यात गोवले गेले.) त्याचबरोबर त्यांनी कान्हेरेंना एक जालिम विषाची पुडी आणि ''खुनास खून! जुलमाचा प्रतिकार!!'' या मथळ्याचे आत्म निवेदनपर एक पत्रक दिले. कान्हेरेचं कोवळे वय पाहून जॅक्सन वधाची योग्य कारण मीमांसा करु शकणार नाहीत. त्यामुळे काम आटोपताच शक्य तितक्या लवकर त्यांनी त्या पुडीतील विष खाऊन आत्महत्या करावी अशी त्यांना सूचना दिली गेली. तसेच एक प्रवेश द्वाराजवळील ओट्याचे आणि दुसरे खुर्चीचे अशी नाटकाची दोन तिकिटे सुद्धा दिली.

२१ डिसेंबर १९०९ च्या रात्री कान्हेरे विजयानंद थिएटरात जाण्यास निघाले. त्यांनी एक पिस्तुल धोतराच्या निऱ्यांमध्ये पोटाजवळ खोचून धोतराचा काचा मारला. दुसरे क्रोम प्लेट केलेले पांढरे पिस्तुल कोटाच्या खिशात ठेवले. उजव्या खिशात विषाची पुडी व स्वतःच्या हाताने पुन्हा लिहून काढून स्वतःची सही केलेले वरील निवेदन कोटाच्या वरच्या खिशात ठेवले. दाराजवळ जॅक्सनला टिपण्यासाठी त्यांना ओट्याचे तिकीट दिले होते. पण जर त्या ठिकाणी संधी मिळाली नाही तर जॅक्सनची बसण्याची सोय असलेल्या खुर्च्यांच्या रांगेत बसून त्यांनी कार्य साधावे. म्हणून त्यांनी दोन तिकिटे दिली होती. टोपी न घालता ते थिएटरात पोहोचले. थिएटरात त्यांनी दाराजवळची, ओट्यावर अगदी मोक्याची जागा पकडली.

कार्यक्रमास येण्यास जॅक्सनला उशीर झाला. नाटकाच्या पहिल्या अंकातील दुसऱ्या प्रवेशामधील एक गाणे सुरू असताना त्याचे आगमन झाले. त्याच्या सोबत जॉली नावाचा अन्य एक युरोपियन आय. सी. एस्. अधिकारी व काही युरोपियन स्त्रिया होत्या. चालू नाटकावर दृष्टी ठेवून सोबतच्या बायकांबरोबर बोलत तो ओट्याजवळून पायऱ्या उतरू लागताच कान्हेरे ओट्यावरून खाली उतरले. पोटाशी असलेले पिस्तुल झटक्यासरशी काढून त्यांनी पाठमोऱ्या जॅक्सनवर गोळी झाडली. गोळी त्यांच्या बगलेतून काही इजा न करता आरपार निघून गेली. कोणाच्या काही लक्षात येण्यापूर्वीच ते तीरासारखे पुढे धावले आणि जॅक्सनच्या छातीवर धाड धाड पाच गोळ्या घातल्या. त्याच्या छातीची चाळण झाली. जॅक्सन रक्ताच्या थारोळ्यात गतप्राण होऊन पडला.

जॉलीने कान्हेरेंवर झडप घालून त्यांना मागे मागे रेटत नेले व त्यांचा पिस्तुल धरलेला हात घट्ट पकडून ठेवला. त्याचवेळी जिल्हा डे. सुपरिटेंडंट ऑफ पोलिस तोरडमल पुढे धावून आला. त्याने त्यांच्या हातातील धूर ओकत असलेले पिस्तुल काढून घेतले. येवल्याचा मामलेदार

पळशीकर याने आपल्या हातातील काठीने त्यांच्या डोक्यावर फटका मारला. त्याच्याकडे वळून ते उद्गारले, ''तू हिन्दू आहेस म्हणून मी तुला जिवंत सोडीत आहे.'' नंतर पोलिसांकडे वळून ते म्हणाले- ''मी माझे कर्तव्य केले आहे. माझी पळून जाण्याची इच्छा नाही.'' त्यांना पोलिस ठाण्यात नेले गेले व रात्री दोन वाजेपर्यंत त्यांचा जबाब नोंदवण्याचे काम सुरु होते.

रातोरात शहरात चौकशा, झडत्या व धरपकडीचे सत्र सुरू झाले. गणू वैद्य नावाच्या भेदरट पण वरकरणी शौर्याचा आव आणणाऱ्या एका सदस्याकडून अण्णा कर्वे, विनायकराव देशपांडे, शंकरराव सोमण, वामनराव जोशी इ. ची नावे समजली. पन्नास तरुणांना धडाधड पकडून सरकारवाड्यात डांबण्यात आले. त्यांचे जबाब मिळवण्यासाठी त्यांचा अतोनात छळ केला गेला व अमानुष मारहाण करण्यात आली. अन्न पाण्याशिवाय दिवस दिवस तडफडत ठेवण्यात आले. अलिखान नावाचा एक अधिकारी हे अत्याचार करण्यात पुढाकार घेत होता. छळ आणि यातना यांनी असहाय्य झालेल्या कैद्यांनी पोलिसांना हवे तसे जबाब लिहून दिले. या झडत्या अन् धरपकडीच्या दरम्यानच बोरीबंदर स्टेशनवर सुटाबुटात पण संशयास्पद रीतीने

फिरणाऱ्या चतुर्भुज अमीनला मुंबईतील पोलिसांनी हटकले. त्याची झडती घेताच त्याच्या कडील ब्राऊनिंग पिस्तुल पोलिसांच्या हाती लागले. त्याला ताबडतोब अटक करण्यात आली. पोलिसी इंगा दाखवताच त्याने धडाधड सारे कबूल केले व सावरकरांचे नावसुद्धा सांगितले. पुढे नाशिक कटाच्या खटल्यात तो माफीचा साक्षीदार झाला. सावरकरांना अंदमानला धाडण्यात या खटल्यातील त्याची साक्षच सर्वात महत्त्वाची ठरली.

६ जानेवारी १९१० ला सरकारी वाड्याच्या काही खोल्यांमध्ये थाटलेल्या कोर्टात मॅजिस्ट्रेट मॉटगॉमेरी समोर खटला उभा राहिला. प्राथमिक सुनावणींचे व जवाब नोंदवण्याचे काम पूर्ण १ फेब्रुवारी १९१० ला त्याने खटला सेशन कमिट केला. जॅक्सन वधाचा खटला १९०८ च्या नव्या कायद्यानुसार मुंबईत हायकोर्टात चालवण्याचे सरकारने ठरवले. या कायद्यानुसार खटल्यात पंच राहणार नव्हते व त्याच्या निर्णयावर अपिल करण्यास मुभा नव्हती. सर्व आरोपींना ताबडतोब भायखळ्याच्या तुरुंगात हलविण्यात आले. अनंतराव कान्हेरे, अण्णा कर्वे, विनायकराव देशपांडे, शंकरराव सोमण, वामनराव जोशी, गणू वैद्य व दत्तू जोशी असा सात जणांवर मुंबई हायकोर्टात मुख्य न्यायाधीश सर वेसिल स्कॉट, नारायण चंदावरकर व हीटन यांच्या न्यायासनासमोर दि. ७ मार्च १९१० पासून जॅक्सनच्या वधाचा आरोप ठेऊन हा खटला सुरू झाला. कान्हेरेंनी सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली व ते खटल्याला धैर्याने सामोरे गेले. सरकारी साक्षीदारांच्या त्यांनी स्वतः उलटतपासण्या घेतल्या व कित्येक साक्षीदारांची भंबेरी उडवली. कोर्टातील त्यांचे शूर व धीरोदात्त वर्तन पाहून न्या. हीटन, बॅरि. जयकरांना एकदा म्हणाले, ''अशा सुंदर धैर्यवान तरुणाला मला फासावर धाडावे लागत आहे हे किती दुःखद आहे.''

३० मार्च १९१० ला मुख्य न्यायाधीश सर स्कॉट यांनी स्वतः निकालपत्र वाचून दाखवले. अनंत कान्हेरे, अण्णा कर्वे व विनायकाराव देशपांडे यांना फाशी, शंकरराव सोमण व वामनराव जोशी यांना जन्मठेप काळेपाणी. गणू वैद्यला जन्मठेप तर दत्तू जोशी यास दोन वर्षे सक्त मजुरी अशा शिक्षा लागल्या. गणू वैद्य व दत्तू जोशी स्वा. सावरकरांच्या विरुद्ध नाशिक कटाच्या खटल्यात पुढे माफीचे साक्षीदार झाल्याने त्यांच्या शिक्षा अमलात आल्याच नाहीत.

सर्व आरोपींना तातडीने ठाण्याच्या तुरुंगात हलवले गेले. वामनराव जोशींची रवानगी अंदमानात झाली. पण अत्याचार सहन न झाल्यामुळे शंकरराव सोमण ठाण्याच्या तुरुंगात ११ डिसेंबर १९११ ला इहलोक सोडून गेले. अभिनव भारतची पाळेमुळे खणली गेली असली

तरी त्या संघटनेची सरकारने इतकी धास्ती घेतली होती की तीन वीरांच्या फाशीचा दिवस व स्थान अखेरपर्यंत गुप्त ठेवण्यात आले होते. दि. १९ एप्रिल १९१० ला सकाळी सात वाजता कान्हेरे, कर्वे व देशपांडे यांना ठाण्याच्या तुरुंगात फासावर देण्यात आले. तिघेही वीर अत्यंत धीरोदत्तपणे हसत हसत फासावर गेले.

सरकारने त्यांची कलेवरे त्यांच्या आप्तांच्या हाती सोपवली नाहीत. तुरुंगाच्या बाहेर कडक पोलिस बंदोबस्तात ठाण्याच्या खाडीच्या काठावर त्यांचा अग्निसंस्कार उरकण्यात आला. दुपारी बारापर्यंत सारे आटोपून त्यांची रक्षा ठाण्याच्या खाडीत फेकून दिली गेली. इतकेच नव्हे तर तेथे कोणतीही खूण उरू नये म्हणून जागा झाडून झाडून सारवून स्वच्छकेली.

आज त्यांची स्मृतिसुद्धा आमच्या मनातून पुसून गेली आहे, नाही का ?

७. मदनलाल धिंग्रा

हुतात्मा मदनलाल धिंग्रा
जन्म - १८८४
फाशी - १७ ऑगस्ट १९०९,
पेन्टेनव्हिला

इंग्लंडच्या ऐन राजधानीत, लंडनमध्ये, एका अतिम हत्त्वाच्या नोकरशहाला उडवून आपल्या धैर्याची, शौर्याची कमाल दाखवणारे आणि भारतीय क्रांतिकारकांच्या मनोबळाचे आणि संघटना सामर्थ्याचे जगाला प्रत्यंतर देणाऱ्या आणि हसत हौतात्म्य पत्करणाऱ्या वीराचे नाव मदनलाल धिंग्रा.

सुंदर बायको व लहान मुलगा या सर्वांना सोडून कोणालाही काही न सांगता मदनलाल एक दिवस घरातून निघून गेले. मुंबईला जाऊन त्यांनी एका बोटीवर आगरक्षक म्हणून काम पत्करले आणि ते इंग्लंडला आले. स्वा. सावरकर त्यांच्या पूर्वीच इंग्लंडला पोहचले होते आणि त्यांनी त्यांच्या कार्यास सुरुवात केली होती. त्यांनी आपल्या मित्रांना मदनलाल बरोबर संपर्क राखण्यास सांगितले आणि एक दिवस ते त्यांच्या व्याख्यानाला येतील अशी व्यवस्था केली. सावरकरांचे व्याख्यान ऐकले आणि मदनलालचे सारे जीवनच पालटले. त्यांची आणि सावकारांची दृढ मैत्री जमली. मदनलाल आपले बिऱ्हाड सोडून श्यामजी कृष्ण वर्मांनी स्थापना केलेल्या 'भारत सदन' मध्ये राहण्यास गेले. त्यांनी स्वदेशीच्या कार्यास जोमाने सुरुवात केली.

१० मे १९०८ या दिवशी सावरकरांच्या प्रेरणेने १८५७ च्या प्रथम स्वातंत्र्य संग्रामाच्या ५०व्या स्मृती दिनाचे निमित्त साधून एका टोलेजंग समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या समारोहाच्या मिमित्ताने '१८५७ च्या हुतात्म्यांस अभिवादन' अशा अर्थाचा बिल्ला छातीवर लावून मदनलाल कॉलेजात गेले. एका इंग्रज धार्जिण्या भारतीय मित्राने त्यावरून त्यांची टर उडवली आणि थट्टेच्या भरात यांच्या छातीवरील तो बिल्ला ओरबाडून फेकून दिला. हुतात्म्यांची थट्टा आणि अपमान मदनलालना इतका जिव्हारी झोंबला की ते सुरा घेऊन मित्रावर धावून गेले. त्यांचा रुद्रावतार पाहून इतर मित्र मध्ये पडले, त्याला क्षमा मागायला लावली म्हणून काही गंभीर घटना न घडता वेळ निभावली.

कधी कधी त्यांचा मौजमस्तीचा स्वभाव उफाळून येई. एकदा 'भारत सदन' मध्ये सावरकर एक बैठक घेत असताना मदनलाल मात्र आपल्या खोलीत तरुण-तरुणी जमवून धांगडधिंगा घालीत होते. बैठकीत व्यत्यय येऊ लागल्याने सावरकरांनी त्यांना त्यांच्या खोलीत जाऊन चांगलेच झापले. खजील होऊन मदनलाल बाहेर निघून गेले. ते चार-पाच दिवस सावरकरांच्या समोर आलेच नाहीत. एकदा रात्री सावरकर जेवणासाठी खाली उतरले तेव्हा त्यांनी मदनलालना पाहिले. जणू काहीच घडले नाही अशाप्रकारे ते त्यांच्याशी बोलू लागले. त्याच वेळी मदनलाल व सावरकरांमधील प्रसिद्ध संवाद घडला. मदनलालने त्यांना विचारले, 'हौतात्म्य गाजविण्याची वेळ आली आहे काय?'

सावरकरांनी उत्तर दिले, ''एखाद्या हुतात्म्याचा तसा निश्चय झाला असेल आणि तो सिद्ध असेल तर हौतात्म्याची वेळ आली असलीच पाहिजे.''

याच दरम्यान भारतात क्रांतिकारकांच्या छळवणुकीने उच्चांक गाठला होता. दडपशाहीला उत आला होता. बारीकसारीक कारणांवरून तरुणांना कडक शिक्षा अगदी जन्मठेप काळ्या पाण्याच्यासुद्धा, दिल्या जात होत्या. इंग्लंडात सुद्धा तरुण विद्यार्थ्यांच्या मागे गुप्त पोलिसांचा ससेमिरा लावला गेला होता. त्यामुळे भारतातील दडपशाडीचा प्रतिशोध (सूड) म्हणून प्रत्यक्ष इंग्लंडमध्येच जबरदस्त धडाका उडवून देण्याचा क्रांतिकारकांचा विचार चालू होता.

मदनलालच्या हालचालीचे समग्र वर्तमान त्यांच्या घरी हिंन्दुस्थानात समजले. त्यांचे थोरले भाऊ डॉ. धिंग्रा यांनी त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगणारे पत्र लिहिले. वरकरणी भारताच्या हितासाठी झटणारी असल्याचा देखावा करणारी पण वास्तवात भारतीय विद्यार्थ्यांना राजनिष्ठेत गुंतवून ठेवण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या 'नॅशनल इंडियन असोसिएशन' या संस्थेत सामील होण्याचा त्यांनी मदनलालला सल्ला दिला. संस्थेच्या कार्यवाह मिस ॲना झोपिन जोसेफिन बेक यांना भेटण्याची सूचनासुद्धा दिली. इतकेच नव्हे तर तर संस्थेचे कोषाध्यक्ष कर्झन वायली यांना पण त्यांनी एक स्वतंत्र पत्र लिहून मदनलालना ''सुधारण्याची'' खास विनंती केली. कर्झन वायलींनी त्यांना पत्र पाठवून भेटीस बोलावले. या संधीचा लाभ देशहितासाठी उठवण्याचे मदनलालांनी ठरवले. त्यांनी संस्थेची असोसिएट मेंबरशिप घेतली. इतकेच नव्हे तर मिस बेक व कर्झन वायली यांच्याशी थोड्याच अवधीत घनिष्ठ मैत्री जमवली. ते 'भारत सदन' सोडून अन्यत्र, 'लेडी बरी' रोडवर राहण्यास गेले. सावरकर व त्यांच्या इतर मंडळींबरोबर आपले बिनसले असून आता आपण केवळ त्यांची रहस्ये जाणून घेण्यासाठीच

'भारत सदनात' जातो असा त्यांनी बहाणा केला. इतकेच नव्हे तर सावरकरांच्या संमतीनेच सावरकरांची काही पत्रे 'शिताफीने पकडून' त्यांनी कर्झन वायलींना आणून दिली. त्यामुळे तर त्यांचा पुरताच विश्वास पटला. पुढील बेताच्या सोयीसाठी याच वेळी सावरकरसुद्धा भारत सदन सोडून बिपिनचंद्र पाल यांच्या घरी राहू लागले.

कर्झन वायली हे १८६७ मध्ये लष्करी अधिकारी म्हणून भारतात आले. नंतर १८८० पासून पुढे त्यांनी मद्रासच्या गव्हर्नरचे लष्करी सहाय्यक, बडोदा, हैद्राबाद इ. संस्थानचे रेसिडेंट वगैरे अधिकारपदे उपभोगली १९०१ मध्ये लंडनला परत येऊन भारत मंत्र्याचे कार्यवाह झाले. 'इंडिया हाऊस'च्या कार्यालयाचे ते जणू सूत्रसंचालकच झाले. भारतमंत्र्यांच्या खालोखाल त्यांना अधिकार गाजवता येत होते. भारतातील अत्याचार व दडपशाहीत त्यांचाच मोठा हात होता. त्यांनीच लंडनमधील विद्यार्थ्यांवर पाळत ठेवली होती.

८ जून १९०९ ला देशद्रोही कविता छापून प्रसिद्ध केल्या, या आरोपाखाली बाबाराव सावरकरांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाल्याचे वृत्त विजेच्या लोळाप्रमाणे सावरकरांवर कोसळले. सावरकर अत्यंत खिन्न झाले. त्या वृत्ताने मदनलाल अत्यंत संतप्त झाले. या कृत्याचा सूड ताबडतोब घेतला गेला पाहिजे असा त्यांनी निश्चय केला. त्याच दिवशी योगायोगाने रॉयल कलोनियल इन्स्टिट्यूटची सभा होणार होती. तीत वंग भंगाला जबाबदार असणारे माजी व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन व बंगालचे माजी गव्हर्नर ब्रॅमफिल्ड कुल्लर उपस्थित असणार होते. दोघांनाही एकदमच उडवण्याचा निश्चय करून कोणाला काही न कळवता मदनलाल धिंग्रा सभास्थानी गेले. पण त्यांना थोडा उशीर झाला. ते पोहचण्यापूर्वीच हॉलचे दरवाजे बंद झाले होते. त्यामुळे त्यांना आत प्रवेश मिळाला नाही. आपला बेत फसल्याने धिंग्रा निराश झाले.

सावरकरांनी त्यांना धीर दिला. पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे खुद्द वायलीलाच संपवण्याचा बेत निश्चित झाला. १ जुलै १९०९ ला नॅशनल इंडियन असोसिएशनचा वार्षिक मेळावा जहांगीर हॉलमध्ये होणार होता. त्याच दिवशी हे काम करण्याचे ठरले. कार्यक्रमाच्या दिवशी सायंकाळी प्रत्येक परिचिताशी ते आवर्जून बोलले. रात्री अकरा वाजता कार्यक्रम संपला. ते कर्झन वायलीशी गप्पा मारीत हॉलच्या मुख्य दारातून पायऱ्यांवर आले. तेथे त्यांनी काही गुप्त वार्ता सांगण्याचा आविर्भाव आणून कर्झन वायलींना आपल्या अगदी जवळ येण्यात भाग पाडले. काही समजण्याच्या आत त्यांनी आपले कोल्ट रिव्हॉल्व्हर काढून दोन गोळ्या झाडल्या. पहिली उजव्या डोळ्याच्या चिंधड्या उडवीत मेंदूत शिरली दुसरी डाव्या डोळ्याखालून कवटीच्या आरपार

गेली. कर्झन वायली लटपटत मागे कोलमडले. त्यांनी पुन्हा दोन गोळ्या त्यांच्या छातीवर मारल्या. ते खाली कोसळले. गोळीबाराचा आवाज ऐकून मूळचा मुंबईचा पण सध्या शांघायमध्ये डॉक्टरकीचा धंदा करणारा डॉ. कावसजी लालकाका धिंग्राच्या अंगावर धावला. स्व-संरक्षणासाठी धिंग्रांनी एक गोळी त्यांच्यावर झाडली. छातीत गोळी लागल्याने डॉ. लालकाका खाली पडला. शेवटची गोळी त्यांनी स्वतःवर झाडून घेण्याचा प्रयत्न केला पण तेवढ्यात इतर लोक त्यांना पकडण्यास पुढे सरसावले. त्यांची त्यांच्याशी झटापट झाली. झटापटीत त्यांनी सर लेस्ली प्रोबिन यांना उचलून जोरात खाली आपटले. त्यांच्या दोन बरगड्या तुटल्या. पण शेवटी ते पकडले गेलेच. त्यासरशी ते अगदी शांत झाले आणि किंचित हसत त्यांनी आपला दूर उडालेला चष्मा मागितला. कर्झन वायली जागीच तर डॉ. लालकाका दवाखान्याच्या वाटेवर ठार झाला. ज्ञानचंद वर्मा त्या ठिकाणी सावरकरांच्या सूचनेप्रमाणे उपस्थित होते. त्यांनी संपूर्ण वृत्तांत सावरकरांना जाऊन सांगितला. धिंग्रांना वॉल्टन स्ट्रीट पोलिस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांना जबानी देण्याचा कार्यक्रम उरकल्यानंतर ते लॉकअपमध्ये शांतपणे झोपून गेले.

प्रत्यक्ष भारतमंत्र्यांच्या खालोखाल महत्त्वाच्या व्यक्तीचा अशाप्रकारे वध केल्याने दुसऱ्या दिवशी साऱ्या जगभर खळबळ उडाली. भारतीय क्रांतिकारकांच्या धैर्याने जग स्तंभित झाले. लंडन टाईम्स पासून जगभरच्या सर्वच वृत्तपत्रांमध्ये धिंग्रावर स्तंभच्या स्तंभ छापून आले.

१० जुलै १९०९ ला वेस्टमिनिस्टर कोर्टात मॅजिस्ट्रेट समोर धिंग्रावर खटला सुरू झाला. २३ जुलै १९०९ ला खटला सेशन कोर्टात वर्ग झाला. वध करण्यास जाण्यापूर्वी एक निवेदन धिंग्रांनी सोबत घेतले होते ते पोलिसांच्या ताब्यात होते. ते कोर्टासमोर आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु कोर्टाने परवानगी नाकारली. कोर्टापुढे केलेल्या शेवटच्या निवेदनात त्यांनी आपणास फाशीची शिक्षाच देण्याची विनंती केली. 'त्यामुळे आपल्या देश बांधवामध्ये त्याचा सूड घेण्याची उर्मी उफाळून येईल' असे ते पुढे म्हणाले. अर्थातच त्यांना फाशीची शिक्षा सुनावली गेली.

१७ ऑगस्ट १९०९ या दिवशी पेंटन व्हिले तुरुंगात ते धीरोदत्तपणे फाशी गेले. त्यांच्या हौतात्म्याने जगभरचे स्वातंत्र्यवादी व क्रांतिकारक प्रभावित झाले. आयर्लंडमध्ये जागोजागी त्यांचे छायाचित्र असलेली पोस्टर्स लागली. त्यावर १२ इंची ठळक काळ्या अक्षरात लिहिले होते - ''आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान करणाऱ्या धिंग्राचा आयर्लंड सन्मान करते.''

मात्र इंग्रज सरकारने प्रेतावर सुद्धा सूड उगवण्याच्या आपल्या हीन वृत्तीचे प्रदर्शन केले. धिंग्रांचे शव ताब्यात घेण्यास गेलेल्या जे.एस्. मास्टर यांना नकार देऊन त्यांचे तुरुंगाच्या आवारातच दफन करण्यात आले.

पोलिसांनी दाबलेले धिंग्राचे निवेदन सावरकरांनी ज्ञानचंद वर्मा यांचे करवी पॅरिसमध्ये छापवून घेतले व जगभरातील प्रमुख वृत्तपत्रांना धाडले. सावरकरांच्या प्रयत्नांमुळे ते धिंग्राच्या फाशीच्या दिवशीच जगभरात प्रसिद्ध झाले. त्यांचे मित्र डेव्हिड गार्नेट व रॉबर्ट लिंड यांच्या प्रयत्नांनी ते निवेदन फाशीच्या दुसऱ्या दिवशी १८ ऑगस्टला लंडनच्या 'डेली न्यूज'मध्ये प्रसिद्ध झाले. इंग्लंडमध्ये प्रचंड खळबळ उडाली. त्या पत्रकाचे शीर्षक होते 'चॅलेंज'. ('आव्हान')



८. खुदिराम बोस

इंग्लंडमध्ये असताना सेनापती बापटांच्या करवी सावरकरांनी बॉम्ब बनविण्याची पद्धती रशियन क्रांतिकारांकडून मिळवली. त्याची सविस्तर माहिती देणारी सायक्लोस्टाईल्ड पुस्तिका तयार करून जागोजागच्या क्रांतिकारकांना पुरवली गेली. सन १९०७ मध्ये हेमचंद्रदास हा क्रांतिकारक ती पुस्तिका घेवून कलकत्त्यात आला. १९०८ मध्ये सेनापती बापट भारतात परत येताच कलकत्त्यास गेले आणि त्यांनी बंगाली क्रांतिकारकांना बॉम्ब विद्या शिकवली. याच बॉम्बचा पहिला ऐतिहासिक आणि यशस्वी प्रयोग ३० एप्रिल १९०८ या दिवशी मुझफ्फरपूर येथे खुदिराम बोस याने केला.

हुतात्मा खुदीराम बोस
जन्म-३ डिसेंबर १८८९, बहुवैनी (मिदनापूर)
फाशी-११ ऑगस्ट, १९०८, मुझफ्फरपूर

व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन याने ऑक्टोबर १९०५ मध्ये बंगालची फाळणी जाहीर केली. संपूर्ण देशभर राष्ट्रभक्तीची जोरदार लाट उसळली. एतद्देशियांच्या भावना पायदळी तुडवणारे, अन्याय, अत्याचार करणारे ब्रिटिश सरकार उलथून टाकण्यासाठी लोकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन सुरू केले. त्यासाठी जहाल तरुणांनी प्रतिज्ञा घेतल्या. बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जी व बिपिनचंद्र पाल यांच्या, तर महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली वंगभंग विरोधी आंदोलनाचा वणवा भडकला. 'वंदे मातरम्'ला वेदमंत्राचे महत्त्व आले. आंदोलन दडपण्यासाठी सरकारने प्रचंड दडपशाही केली. बारीक सारीक कारणांवरून तरुणांना अत्यंत क्रूर शिक्षा ठोठावल्या जाऊ लागल्या. त्यामध्ये राष्ट्रीय बाण्याच्या वृत्तपत्रांच्या संपादकांना विशेष लक्ष्य करण्यात आले.

सरकारी दडपशाहीला न जुमानता वंग-भंग विरोधी आंदोलन सुरूच राहिले. सरकार विरोधी लेख लिहून येतच राहिले. कलकत्त्यात १९०४ मध्ये नेमणूक झालेला चीफ प्रेसिडेन्सि मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड याचा जहाल विचारांच्या तरूण पत्रकारांना कठोर शिक्षा देण्यावर विशेष

भर होता. त्याच्या या सेवेचे बक्षीस म्हणून त्याला २६ फेब्रवारी १९०८ ला मुझफ्फरपूरचा सेशन जज्ञ म्हणून बढती मिळाली.

'युगांतर'च्या एका गुप्त बैठकीत बाबू अरविंद घोष, राजा सुबोधचंद्र मलिक, चारूचंद्र दत्त इत्यादी प्रमुख नेत्यांनी किंग्जफोर्डला उडवण्याचा निर्णय एकमताने घेतला. संस्थेच्या कामासाठी खुदिराम 'युगांतर'च्या कार्यालयात आला असताना त्याच्यावर ही कामगिरी सोपवण्यात आली. त्याच वेळी त्याची प्रफुल्लकुमार चाकीबरोबर प्रथम भेट झाली. तो त्याच्या या कामात सहकारी असणार होता. प्रसंग पडल्यास आत्मघात करावा पण पोलिसांच्या हातात सापडायचे नाही अशा सक्त सूचना त्यांना दिल्या होता.

योजनेप्रमाणे २३ एप्रिल १९०८ ला खुदिराम व प्रफुल्लकुमार हावडा स्टेशनवर भेटले. प्रफुल्ल कुमार सोबत एक ४ इंच घेराचा वजनदार गोल डबा होता त्याने खुदिरामला एक रिव्हॉल्व्हर दिले व एक स्वतःजवळ ठेवले. खुदिरामकडे स्वतःचे एक पिस्तुल होतेच. हावड्यास गाडी पकडून दोघे २४ एप्रिलला मुझफ्फरला पोहोचले. यांनी किंग्जफोर्डवर टेहळणी करण्याचे काम लगेचच सुरू केले. रोज सायंकाळी किंग्जफोर्ड नियमितपणे युरोपियन क्लबात जात असे. त्यांनी बऱ्याच चकरा मारून त्याच्या घोडागाडीचा आणि घोड्याचा रंग नीट न्याहाळून लक्षात ठेवला. कलकत्त्यावरून दोन तरूण त्याला मारण्यासाठी निघाल्याची खबर गुप्त पोलिसांनी दिल्यामुळे मुझफ्फरपुरचा पोलिसप्रमुख आर्मस्ट्रॉंग याने किंग्जफोर्डला साध्या वेशातील पोलिसांचे संरक्षण पुरवले होते. सावधगिरी म्हणून तो केवळ घोडागाडीनेच फिरत असे.

३० एप्रिल १९०८ ला सूर्यास्ताच्या सुमारास खुदिराम व प्रफुल्लकुमार निघाले. कलकत्याहून निघताना सोबत घेतलेला गोल डबा प्रफुल्लकुमारने खुदिरामच्या हातात दिला. तो सेनापती बापटांनी तयार करून दिलेला बॉम्ब होता. त्याच्या दोन्ही खिशात दोन भरलेली पिस्तुले होती. एक पिस्तूल प्रफुल्लकुमारच्या खिशात होते. सोबतीस जादा काडतुसे त्याने ठेवलेली होती. किंग्जफोर्डच्या बंगल्यासमोरच्या मोकळ्या मैदानात असलेल्या मोठ्या वडाखाली दोघे वाट पहात उभे राहिले. ते तसे उभे असताना साध्या वेशातील पोलिसांनी त्यांना हटकले. तेथून निघून जाण्याचा बहाणा करून ते परत वडाखाली येऊन दबा धरून बसले. सर्वत्र मिट्ट काळोख पसरला होता.

गाडीची चाहूल लागताच दोघे ताडकन उठून रस्त्याकडे धावले. खुदिरामने आधीच बॉम्ब मोकळा करून ठेवला होता. येणाऱ्या गाडीचे किंग्जफोर्डच्या गाडीशी साम्य दिसताच खुदिराम सज्ज झाला. मिट्ट कोळाखात गाडीत कोण बसले आहे हे त्याला दिसणे शक्यच नव्हते, तरी त्याने

गाडी जवळ येताच नेम धरून बॉम्ब गाडीत फेकला त्यासरशी प्रचंड जाळ करीत धमाका उडाला. स्फोटाचा आवाज तीन मैलपर्यंत दूर ऐकू गेला. त्या स्फोटाने सारा देश हादरला. त्याचे प्रतिध्वनी जगभर उमटले. भारतीय क्रांतिकारकांच्या हातात एक नवे आणि प्रभावी शस्त्र लागले होते.

दोघेही पळत सुटले. पळताना अडचण नको म्हणून अंगावरील चादरी आणि जोडे त्यांनी टाकून दिले. रेल्वेमार्गाच्या कडेने ते रात्रभर धावत राहिले. पहाटेपूर्वी मुझफ्फरपूर पासून २४ मैलांवर असलेल्या नैनी स्टेशनजवळ पोहोचले. अंगातील त्राण संपल्याने त्यांनी स्टेशन जवळच्या एका आमराईत शिरून विश्रांती घेण्याचे ठरवले.

दोघेही आपण संघटनेने सोपवलेले कार्य यशस्वीपणे पूर्ण केल्याच्या आनंदात असले तरी प्रत्यक्ष प्रकार वेगळाच होता. मुझफ्फरपूरमधील एक युरोपियन वकील मि. प्रिंगले. केनेडीची आणि किंग्जलेची गाडी जवळपास सारख्याच होत्या. खुदिराम जिला किंग्जलेची गाडी समजला ती वास्तविक मि. केनेडीची गाडी होती व गाडीत त्याची तरूण मुलगी व पत्नी होती. स्फोटाच्या दणक्याने गाडीची बरीच नासधूस झाली. मिस केनेडीने स्फोटानंतर वीस मिनिटांनी तर मिसेस केनेडीने दुसऱ्या दिवशी रात्री उशीरा प्राण सोडला. किंग्जले केवळ नशिबाने बचावला. काही कारणांनी त्याला क्लबमधून निघण्यास थोडा उशीर झाल्याने मि. केनेडीची गाडी त्याच्या पुढे निघाली आणि बॉम्बचे भक्ष्य ठरली.

९. आधुनिक अभिमन्यू

मुझफ्फरपूरच्या कलेक्टर वुडमन व पोलिस प्रमुख आर्मस्ट्रॉंग ताबडतोब तिथे पोहोचले. वुडमन ने तपासास झटपट सुरूवात केली. तैजुद्दिन व इतर पोलिसांकडून त्याने शस्त्रधाऱ्यांचे पूर्ण वर्णन मिळवले आणि लगोलग गावांमध्ये ते वर्णन तारेने कळवले. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांमध्ये ते वर्णन छापून येण्याची व्यवस्था केली. शस्त्रधाऱ्यांच्या अटकेसाठी रू.५०००/-चे बक्षीस जाहीर केले. चाणाक्ष गुप्त पोलिसांच्या तुकड्या करून रातोरात सर्वत्र रवाना केल्या त्या पैकी फत्तेसिंग व शिवप्रसाद हे दोन हत्यारी गुप्त पोलिस रेल्वेने पहाटे नैनी स्टेशनवर उतरले. त्यांनी दोन गाड्यामध्ये बारकाईने तपास केला. तिसरी गाडी येण्यास वेळ असल्याने ते बाजारात फिरण्यासाठी निघाले.

हुतात्मा प्रफुल्लकुमार चाकी
आत्मार्पण - १९०८, मरुमाघाट स्टेशन

उन्हे वरती आल्यावर खुदिराम व प्रफुल्लकुमार जागे झाले. भूक लागल्याने खुदिराम खाण्याचे जिन्नस आणण्यासाठी आमराईतून बाहेर पडला. एका दुकानात तो बंगालीत 'मुरी'कुरमुरे मागत असताना कर्मधर्मसंयोगाने ते दोन शिपाई त्याच दुकानासमोर आले. त्याच्या बोलण्याने व संशयास्पद हालचालीमुळे त्यांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. हल्लेखोरांचे त्यांना सांगितले गेलेले वर्णन त्याला चपखल लागू पडत असल्याचे लक्षात आल्याने दोघांनी त्याला हटकले. तो उत्तर देताना गडबडला. खिशातून पिस्तुल काढण्याचा प्रयत्न करीत त्यांने तिथून पळ काढला. पण पाठलाग करून त्यांनी त्याला धरलेच. मुझफ्फरपूरला तार करून पहिल्याच गाडीने दोन शिपाई त्याला घेऊन मुझफ्फरपूरला रवाना झाले. प्रवासातच त्याला किंग्जले बचावल्याची बातमी समजली. तो फार उदास झाला.

बराचवेळ झाला तरी खुदिराम परत न आल्याने प्रफुल्लकुमार आमराई बाहेर निघाला पाहतो तर खुदिराम पोलिसांच्या गराड्यात. प्रसंगावधान राखून तो तिथून निसटला व पोलिसांना गुंगारा देऊन समस्तिपूरला पोहोचला. तिथून त्याने कलकत्त्याला जाण्याचा बेत

केला. संशय येऊ नये म्हणून त्याने कलकत्त्याऐवजी मुखमाघाटचे तिकिट काढले. ज्या इंटरच्या डब्यातून तो प्रवास करीत होता त्याच डब्यातून योगायोगाने नंदलाल बॅनर्जी नावाचा पोलिस अधिकारी प्रवास करीत होता. हल्लेखोरांच्या तपासाची व वर्णनाची त्याला पूर्ण कल्पना होती. त्याला प्रफुल्लकुमारचा संशय आल्याने त्याने त्याची चौकशी केली. थातुर मातुर उत्तरे देऊन प्रफुल्लकुमारने वेळ मारून नेली. त्याने पुढच्याच स्टेशनवर उतरून डबा बदलला. त्यामुळे संशय बळावल्याने नंदलालने पुढील सर्व स्टेशनांना सावधगिरीच्या तारा केल्या. तसेच एक तार आर्मस्ट्राँगला केली. पुढच्याच स्टेशनवर त्याला आर्मस्ट्राँगची संशयिताला पकडण्याचा हुकूम देणारी तार मिळाली.

मुखमाघाट स्टेशनवर कलकत्त्याचे तिकिट काढत असतानाच प्रफुल्ल कुमारवर पोलिसांची झडप पडली पण हिसडा मारून त्याने सुटका करून घेतली व प्लॅटफॉर्मच्या टोकाकडे धावण्यास सुरूवात केली. पोलिसांनी त्याचा पाठलाग सोडला नाही. प्लॅटफॉर्मच्या टोकाशी गेल्यावर रस्ता बंद झाल्याचे दिसताच त्याने पिस्तूल काढून सर्वात जवळच्या शिपायावर गोळी झाडली पण नेम चुकला. अटक अटळ असल्याचे लक्षात येताच त्याने स्वतःवर दोन गोळ्या घालून घेतल्या आणि तिथेच गतप्राण होऊन पडला. मातृभूमीसाठी त्याने हसत हसत आत्माहुती दिली.

मुझफ्फरपुर स्टेशनवर खुदिरामला उतरवून घेण्यासाठी कलेक्टर वुडमन व पोलिस प्रमुख आर्मस्ट्राँग स्वतः गेले. त्याला पाहण्यासाठी स्टेशन बाहरे अलोट गर्दी लोटली होती. बेड्या घालून व दंडाला काढण्या लावून कडक बंदोबस्तात त्याला युरोपियन क्लबमध्ये नेऊन जाबजबाब नोंदवले गेले. त्याने आपल्या दुसऱ्या साथीदाराचे नाव दिनेशचंद्र राय असे खोटेच सांगितले. दोघे दोन दिशांना पळाल्याचे सांगून त्याचा ठाव ठिकाणा माहित नसल्याचा त्याने बहाणा केला. त्याने खऱ्या खोट्याची बेमालूम सरमिसळ असलेले जबाब नोंदवले.

वुडमन व आर्मस्ट्राँगने झपाट्याने तपास पूर्ण केला. २१ मे १९०८ ला मॅजिस्ट्रेट बर्थथोडच्या कोर्टात खटला उभा राहिला. खुदिरामला कोणीच वकील मिळाला नाही. सरकारी पक्षाचा वकील म्हणून मि.मनुक उभा राहिला. सकाळी ६।। वाजता कोर्टाचे काम सुरू होई ते रात्री ८ वाजेपर्यंत चाले. २३ मे १९०८ ला केस सेशन कमिट झाली. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मुझफ्फरपूरच्या कोर्टात विशेष सेशन्स जज्ज कॉर्नडक समोर खटला सुरू झाला. घाईघाईने खटल्याचे कामकाज चालवून १३ जून १९०८ ला खुदिरामला फाशीची शिक्षा सुनावण्यात

आली. फाशीच्या शिक्षेच्या विरोधात कलकत्ता उच्च न्यायालयात अपिल करण्यात आले. सुनावणी ब्रेट व रिम्स या दोन न्यायाधिशांपुढे ८ जुलै १९०८ ला सुरू झाली व १३ जुलैला अपिल फेटाळून लावून फाशीची शिक्षा कायम करण्यात आली. २७ जुलै रोजी ११ ऑगस्ट १९०८ ला दिवशी फाशी देण्याचे फर्मान जारी झाले.

१० ऑगस्टपासून मुझफ्फरपूर जेल भोवती गोऱ्या सैनिकांचा कडक पहारा बसवला गेला. त्या पलिकडे पोलिसांचे कडे होते. आपले अंत्यसंस्कार कालिदास बाबूंनी करावे अशी खुदिरामने अखेरची इच्छा व्यक्त केली. रात्रीपासूनच हजारो नागरिकांचे लोंढे पोलिसांच्या कड्यावर धडका देऊ लागले. ११ ऑगस्ट १९०८ चा सूर्य उगवत असतानाच खुदिराम बोस आपल्या हातात गीता घेऊन स्वतःच्या पायांनी चालत वधस्तंभावर चढला आणि धीरोदात्तपणे फाशी गेला.

१०. वांछिनाथन अय्यर

उत्तर भारतात ‘राजद्रोह्यांचे’ उपद्रव सुरू असताना दक्षिण भारतात सर्व शांत होते. हा इंग्रजांचा दावा कसा निखालस खोटा होता हे दाखवण्यासाठी उदाहरण म्हणून वांछिनाथन अय्यरची कहाणी पुरेशी ठरावी.

हुतात्मा वांछीनाथन अय्यर
जन्म - १८८६ शेनकोटा (त्रावणकोर)
आत्मार्पण - १७ जून १९११, मन्याची

स्वा. सावरकरांनी स्थापलेल्या ‘अभिनव भारत’ या क्रांतिकारी संघटनेच्या शाखा देशाच्याच नव्हे तर जगाच्या कान्याकोपऱ्यात पसरलेल्या होत्या. कारणपरत्वे व स्वातंत्र्यवीरांच्या अटकेनंतर त्यांचे काम अन्य नावांनी सुरू राहिले असले तरी त्यांचा मूलस्रोत अभिनव भारतच होता. स्वा. सावरकरांचे उजवे हात व्ही. व्ही. एस. अय्यर यांच्या प्रेरणेने एम.पी.टी. म्हणजेच थिरुमल आचार्य यांनी १९०८ पासूनच पाँडिचेरीत ‘अभिनव भारत’ चे कार्य सुरू केले होते. त्यांच्या प्रेरणेने त्यामधून दक्षिण भारतात अनेक गुप्त संघटना कार्यरत झाल्या.

तुतिकोरिनचा सब कलेक्टर रॉबर्ट विल्यम डी. अेसकोर्ट ॲश याने २७ प्रमुख व प्रतिष्ठित नागरिकांवर राजद्रोह फैलावण्याच्या आरोपावरून खटले भरवले व त्यांना वेगवेगळ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या. दडपशाही व दमनशक्तीच्या वरवंट्याखाली त्याने स्वातंत्र्य आंदोलन चिरडून टाकले. पण असंतोष धुमसत राहिला. १३ मार्च १९१० ला स्वा. सावरकरांना लंडनला अटक झाली. युरोपात त्यांच्या सुटकेचे प्रयत्न निष्फळ ठरल्यावर व्ही. व्ही. एस. अय्यर गुप्तपणे पॅरिस, कोलंबो, कडलोर मार्गे पाँडेचेरीत पोहचले. त्यांच्या येण्याने स्वातंत्र्य आंदोलकांत नव चैतन्य उसळले. अत्याचारी ॲशला देहांत शासन देण्याचा कट ठरला. कटाच्या कार्यवाहीची जबाबदारी वांछिनाथन अय्यरवर सोपवली गेली.

थिरूमल आचार्यांच्या प्रेरणेने वांछिनाथन अय्यरने पूर्वीच त्रावणकोर संस्थानात ‘‘भारतमाता संगम’’ नावाने गुप्त संघटना सुरू केली होती. सुब्रह्मण्यम् भारतींच्या देशभक्तीपर कवितांमधून त्यांनी स्फूर्ती घेतली होती. त्यांना नीळकंठ ब्रह्मचारींचा निकट सहवास व

मार्गदर्शन लाभले होते. ते देशप्रेमाने ओतप्रोत होते व क्रांतिकार्यात सक्रीय होते. संसाराच्या दुर्दशेचा विचार न करता ते आत्मयज्ञाच्या वाटेवर ठामपणे निघाले. त्यांचे मेहुणे (बहिणीचे पती) शंकर कृष्ण अय्यर यांनी त्यांना सोबत करण्याचे ठरवले.

तिरुनेलवेल्ली येथे ॲशची कलेक्टर म्हणून नेमणूक झाली होती. त्याच्या पाळतीवर दोघे १५ जून १९११ ला तिरुनेलवेल्लीला पोहोचले. त्याला कलेक्टर बंगल्यातच ठार मारण्यासाठी वांछी एकटेच, निवेदन देण्याचा बहाणा करून, बंगल्यावर पोहोचले. ॲश बंगल्यावर नव्हता. त्याची मुले कोडाइकनाल येथे असून त्यांच्या सोबत राहण्यासाठी तो बायकोसह १७ जूनला रेल्वेने तिकडे जाणार असल्याचे त्यांना कळले. याच प्रवासात पाठलाग करून संधी मिळताच ॲशला संपवण्याचा निश्चय करून वांछी मुक्कामावर परत आले.

१७ जूनला शनिवार होता. सकाळी लवकर उठून वांछी अय्यर व शंकर कृष्ण अय्यर यांनी निघण्याची तयारी केली. वांछीनी अंगात फॉरेस्ट गार्डचा खाकी कोट चढवला. बेल्जियम बनावटीचे छोटे पण परिणामकारक असलेले पिस्तूल पूर्ण भरून त्यांनी कोटाच्या खिशात ठेवले. पिस्तुलाचा क्रमांक त्यांनी त्या आधीच कानशीने घासून नष्ट केला होता. त्यांच्या या सावधगिरीमुळे अनेकांचा आपोआप बचाव झाला. ॲश वधाची कारणमीमांसा करणारे, तमिळ भाषेत स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेले निवेदन कोटाच्या वरच्या खिशात ठेवले. तिरुनेलवेल्ली स्टेशनवर येऊन मन्याची जंक्शन स्टेशनची दुसऱ्या वर्गाची तिकिटे काढली. कोडाइकनालला जाण्यासाठी मन्याची जंक्शन येथे गाडी बदलावी लागे. ते ॲशची वाट पाहात स्टेशनवरच थांबले.

गाडी सुटण्याच्या काही मिनिटे आधी ॲश बायकोसह पहिल्या वर्गाच्या डब्यात येऊन बसला. त्याचा दफेदार (पट्टेवाला) खादिर बच्चा त्याचे सामान डब्यात ठेऊन नोकरांच्या डब्यात जाऊन बसला. नीट निरीक्षण करून शंकर कृष्ण अय्यर सोबत वांछी गाडी सुटता सुटता दुसऱ्या वर्गाच्या डब्यात जाऊन बसले.

ॲशची गाडी मन्याची स्टेशन एक क्रमांकाच्या फलाटावर आली. कोडाइकनालला जाणारी गाडी तीन नंबरच्या फलाटावर येणार होती. तिला यायला बराच वेळ असल्याने ॲशने सामान तीन क्रमांकाच्या फलाटावर पाठवून दिले. तो स्वतः बायकोसह दुसऱ्या बाजूच्या दोन क्रमांकाच्या फलाटावर उभ्या असणाऱ्या एका गाडीच्या रिकाम्या डब्यात जाऊन बसला. त्याची पाठ तीन क्रमांकाच्या फलाटाकडे व तोंड एक क्रमांकाच्या फलाटाकडे होते.

सहज फिरत असल्याचा बहाणा करीत वांछी अय्यर त्या डब्यावरून पुढे गेले. फलाटाच्या

टोकाला असलेल्या मुतारीत जाऊन त्यांनी पिस्तुलाचा सेफ्टीलॅच उघडला व पिस्तूल पुन्हा कोटाच्या खिशात टाकून परत निघाले. ॲश बसलेल्या डब्याजवळ येताच त्यांनी झेप घेऊन डब्याची पायरी गाठली. त्यांची चाहूल लागताच हातातील पेपर टाकून ॲश ताडकन उठला व त्यांना हाकलण्यासाठी ओरडू लागला. क्षणार्धात वांछीच्या खिशातील पिस्तूल हातात आले होते. चमकून ॲशने आपली साहेबी हॅट त्यांच्यावर भिरकावली पण त्यापूर्वीच वांछीच्या पिस्तुलातून गोळी सुटली होती. गोळीने अचूक वेध घेतला. गळपट्टीचे हाड फोडत गोळी छातीत व तेथून फुफ्फुस फाडत ती प्लीहेतून निघून गेली होती. ॲश रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. पिस्तुलाच्या बाराचा आवाज व ॲशच्या बायकोचा ओरडा ऐकून खादिर बऱ्हा धावून आला. त्याने वांछीच्या कमरेला विळखा घालण्याचा प्रयत्न केला पण स्वतःची झटक्यात सुटका करून घेऊन वांछीनी फलाटावरून पळण्यास सुरूवात केली. खादिर व इतर त्यांचा पाठलाग करू लागताच त्यांनी खादिराच्या पायाशी गोळी झाडून त्याला धमकावले. जमाव थबकला पण फलाटाच्या टोकाला असलेल्या मुतारीने त्याचा मार्ग रोखला. वांछिनी मुतारीचा आश्रय घेतला.

मुतारीच्या बाहेर जमाव जमला होता. पण कोणी पुढे होण्याची हिंमत करीत नव्हता. स्टेशन मास्तराने गावातून सशस्त्र पोलिसांची कुमक मागवली. सशस्त्र पोलिस आलेले पाहताच वांछिनी पुढील भविष्य जाणले. पोलिसांच्या हातात जिवंत सापडण्यापेक्षा त्यांनी आत्मार्पण करणे पसंत केले. स्वतःच्या पिस्तुलातून तोंडात गोळी झाडून त्यांनी आपले जीवन संपवले.

मुतारीतून पिस्तुलाचा आवाज झाला व नंतर सारे सामसूम झाले तरी, कोणी पुढे होण्यास धजावेना. अखेर एक रायफलधारी पोलिस दबकत दबकत मुतारीत शिरला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेले वांछिचे कलेवर त्याला आढळले. झडतीत त्यांच्या कोटाच्या खिशात अत्यंत तेजस्वी भाषेत प्रभावीपणे लिहिलेले ते पत्रक पोलिसांना सापडले. त्यात लिहिले होते... 'आज प्रत्येक हिन्दी मनुष्य इंग्रजांना हाकलून देऊन स्वराज्य आणि सनातन धर्म पुन्हा स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंचम जॉर्ज याला हिंन्दुस्थानात राज्याभिषेक करण्याची सिद्धता इंग्रज करीत आहेत. त्याला ठार मारण्याची शपथ तीन हजार मद्रासी बांधवांनी घेतली आहे. त्यांचा हा निश्चय सर्वांना ज्ञात व्हावा म्हणून... मी आज ही कृती केली आहे.!''

वांछी मुतारीत शिरताच पुढचे भविष्य जाणून शंकर कृष्ण अय्यर दुसऱ्या बाजूने रेल्वे रूळ ओलांडून नाहीसे झाले होते. ॲशच्या अंगात थोडी धुगधुगी असल्याचे पाहून त्याला पहिल्याच गाडीने उलट तिरुनेलवेल्लीला धाडण्यात आले पण प्रवासातच त्याने प्राण सोडला. वांछिचे कलेवर त्याच गाडीने तिरुनेलवेल्लीला आणले गेले. ओळख पटवण्यासाठी जिल्हा रूग्णालयात उघड्यावर त्यांचे शव दोन दिवस ठेवण्यात आले. कोणीच त्यांची ओळख पटवण्यासाठी वा शवाचा ताबा घेण्यासाठी पुढे आले नाही. अखेर पोलिसांनीच त्यांच्या पार्थिव शरीरावर अग्निसंस्कार केला. मातृभूमीसाठी बलिदान करणाऱ्या तिच्या एका सुपुत्राच्या शरीराची एखाद्या बेवारशासारखी विल्हेवाट लावली गेली. हेच या भारतभूचे दुर्भाग्य नव्हे तर काय?

झपाट्याने तपास पूर्ण करून १२ सप्टेंबर १९११ रोजी नव्या विशेष कायद्याखाली मद्रासच्या हायकोर्टात एकूण १४ क्रांतिकारकांवर ॲशच्या खुनाचा कट व बादशहाविरूद्ध युद्ध पुकारल्याच्या आरोपाखाली खटला उभा राहिला. १५ फेब्रुवारी १९१२ ला खटल्याचा निकाल लागला. खुनाच्या कटाचा आरोप कोणावरच सिद्ध होऊ शकला नाही, पण बादशहाविरूद्ध युद्ध पुकारल्याच्या अपराधाखाली १ ते ७ वर्षांच्या सश्रम कारावासाच्या शिक्षा ठोठावल्या गेल्या.

स्वातंत्र्याच्या यज्ञात वांछिनाथन अय्यर यांनी आपल्या संसाराची, सुखाची व प्राणांची आहुती दिली. त्यांचे हे बलिदान व्यर्थ जाणार नाही, हे आपण डोळ्यात तेल घालून पाहिले पाहिजे.

११. व्हॉइसरॉयवर बॉम्ब फेक

वसंतकुमार विश्वास
फाशी - ८ मे १९१५, दिल्ली

भाई लालमुकुंद
फाशी - ८ मे १९१५, दिल्ली

अवध बिहारी
फाशी - ८ में १९१५, दिल्ली

बादशहा पंचम जॉर्ज भारतात आला आणि सुखरूप परत गेला. मग वांछी अय्यरने आपल्या निवेदनात लिहिले ती काय पोकळ वल्गना होती काय?

नाही. पुढे खुद्द रासबिहारी बोसांनी हे स्पष्ट केले की बादशहाला मारण्याची सर्व सिद्धता झाली असताना बादशहाकडून सुधारणा व सवलतींची अपेक्षा करणाऱ्या मवाळ गट व राजनिष्ठांची परस्पर फजिती व्हावी व जनतेचा भ्रमनिराश होऊन स्वतंत्रता आंदोलनास तसेच सशस्त्र चळवळीस सर्व समाजाचे समर्थन मिळावे म्हणूनच केवळ क्रांतिकारी गटांनी पाऊल मागे घेतले. बादशहा भले सुखरूप परत गेला तरी तशीच तोलामोलाची घटना घडवून आणून साम्राज्याला व जगाला हादरा देण्याची संधी क्रांतिकारक गट शोधत होते.

अलीपूर कटानंतर बंगालमधील प्रमुख क्रांतिगट - अनुशीलन समितीची वाताहात झाली. ढाक्क्यात झालेल्या बैठकीत क्रांतिकार्य बंगाल बाहेरून सुरू ठेवण्याचा व त्याची जबाबदारी रासबिहारी बोस यांच्यावर सोपवण्याचा निर्णय झालाच होता. त्या प्रमाणे १९०८ पासूनच रासबिहारी डेहराडून येथील वनसंशोधन संस्थेत नोकरी करीत होते. त्यांचा नोकर असल्याचे दर्शवीत वसंतकुमार विश्वास हा श्रेष्ठ क्रांतिसैनिक त्यांच्याच घरी राहत होता. विष्णू

गणेश पिंगळेच्या मध्यस्थीने त्यांची पंजाब व संयुक्त प्रांतातील क्रांतिकारी गटाशी हातमिळवणी झाली.

त्यामुळे उत्तरेतील क्रांतिकारी संघटनांचे बळ अनेकपट वाढले. इतकेच नव्हे तर त्यांचे नेतृत्त्व रासबिहारींकडे आपोआप चालून आले होते. एकामागोमाग एक जहाल पत्रके आणि लेख यांचे नियोजनपूर्वक सूत्रबद्ध वितरण तसेच अनेक क्रांतिकारी घटनांमुळे पुरेसे जनमत तयार झाले होते. भरपूर बाँबचा साठा तयार होता. काहीतरी दैदीप्यमान घडविण्याची हीच सुसंधी होती. याचा विचारविनिमय करण्यासाठी वेगवेगळ्या गावांमध्ये गुप्त बैठका होऊन डिसेंबरच्या अखेरीस भारताची राजधानी कलकत्त्यावरून दिल्लीला हलविण्याच्या समारंभातच असा प्रहार करण्याचे निश्चित केले गेले.

दिल्ली या पारंपरिक राजधानीत साम्राज्याची राजधानी हलविण्याचा इंग्रज सरकारचा निर्णय झाला. त्यासाठी २३ डिसेंबर, १९१२ या दिवशी वैभवशाली भव्य मिरवणुकीने व्हॉईसरॉय बादशहाचा प्रतिनिधी म्हणून दिल्ली शहरात प्रवेश करणार होता. लाल किल्ल्यातील दिवान-ए-आममध्ये मोठा दरबार होऊन त्यामध्ये स्वतःच्या अधिपत्याखाली असणारा दिल्लीचा प्रदेश, पंजाबचा डे. गव्हर्नर समारंभपूर्वक व्हाईसरॉयच्या ताब्यात देणार होता. या कार्यक्रमाला प्रसिद्धी देण्यासाठी देशभरातूनच नव्हे तर जगभरातून पत्रकार बोलावण्यात आले होते. ह्या संधीचा फायदा घेऊन भर दिवसा उजेडी, हजारो लोकांच्या उपस्थितीत व सैनिकी बंदोबस्त असताना भर मिरवणुकीत व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग्जवर बाँब फेकून त्याचा वध करण्याचा महत्त्वाकांक्षी बेत मास्टर अमीरचंद, अवधबिहारी, भाई बालमुकुंद, रासबिहारी बोस इत्यादीनी आखला. त्याची तयारी करण्यासाठी वसंतकुमार विश्वास, अवधबिहारींच्या ओळखीने लाहोरात राहण्यास गेला.

मिरवणुकीचा मार्ग अगोदरच जाहीर करण्यात आला होता. दिल्ली स्टेशनपासून सुरू होणारी मिरवणूक ऐतिहासिक चांदणी चौक मार्गाने लाल किल्ल्यातील दिवाने आममध्ये व तेथील दरबार आटोपून नव्याने बांधलेल्या व्हॉईसरिगल लॉजमध्ये जाणार होती. हल्ला करण्यास सुयोग्य जागा शोधण्यास सुरुवात झाली. मास्टर अमीरचंद व रासबिहारी बाबूंनी मिरवणुकीच्या मार्गावरून अनेक चकरा मारून चांदणी चौकाच्या परिसराची यासाठी निवड केली. या स्थानाला ऐतिहासिक महत्त्व तर होतेच पण हल्ला करण्याच्या दृष्टीने अत्यंत सोयिस्कर असा हा परिसर होता. जवळजवळ पाऊणशे फूट रुंदीच्या, घंटा घर ते लाल

किल्ल्याचे लाहोरी गेट असा मैलभर लांबीच्या या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दाटीवाटीने अनेक इमारती उभ्या आहेत. या इमारतींच्या मागील बाजूस अतिशय अरुंद व गुंतागुंतीच्या गल्ल्यांचे जाळे पसरलेले असल्याने या भागात बंदोबस्त ठेवणे अत्यंत अवघड होते. मात्र हल्ला करून पळून जाण्यास फारच सोयिस्कर होते. रस्त्याच्या बाजूंना झाडांची दुहेरी रांग असल्याने मिरवणूक रस्त्याच्या मध्यभागातून नेणे भाग होते. घंटाघराच्या पुढे टाऊन हॉलच्या जवळ एक तीन मजली इमारत होती. तिच्या तळमजल्यावर पंजाब नॅशनल बँक होती. गच्चीवर व सज्जात परिसरातील अनेक कुटुंबे स्त्रियांसहित मिरवणुकी पाहण्यास जमत. त्या गर्दीत वसंतकुमार विश्वासने मुसलमानी स्त्रीप्रमाणे बुरखा घालून मिसळावे. रासबिहारी बोस त्याचा पती होऊन तर अवधबिहारी व भाई बालमुकुंद यांनी त्यांचे नातेवाईक होऊन त्याच्या भोवती रहावे. प्रत्यक्ष बॉंब फेकण्याचे काम वसंतकुमारने करावे व ऐन वेळी काही घोटाळा झाला किंवा बॉंब फुटला नाही तर उरलेल्या तिघांपैकी कोणीतरी बॉंब फेकावा व मागच्या परिसरातील गल्ल्या बोळांतून पसार व्हावे असा एकूण बेत ठरला.

२३ डिसेंबर उजाडला. ठरल्याप्रमाणे दिल्ली स्टेशनावरून सकाळी मिरवणुकीस सुरुवात झाली. साम्राज्याचा डौल, पौर्वात्य भपका, वैभवाचे व सैन्याच्या धाकाचे प्रदर्शन मिरवणुकीत पुरेपुर मांडले होते. उंच व धिप्पाड हत्तीवर चांदीच्या भव्य हौदात व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज व त्याची पत्नी बसलेली होती. त्याच हौदात आसनाच्या उंच व जाड फळीमुळे झालेल्या मागील कप्प्यात (खवासखान्यात) भलेमोठे किनखापी जरीचे छत्र धरून जमादार महावीरसिंग बसला होता.

एक मुसलमान कुटुंब मोठ्या उत्सुकतेने पंजाब नॅशनल बँकेच्या गच्चीवरून मिरवणूक न्याहाळत होते. टाऊन हॉल ओलांडून व्हॉईसरॉयचा हत्ती पंजाब नॅशनल बँकेच्या समोर आला. सकाळच्या कोवळ्या उन्हात व्हॉईसरॉयचे शिरस्त्राण व चांदीची अंबारी झळाळत होती. तेवढ्यात जमावाचा जयघोष भेदत कान बधीर करणारा स्फोटाचा आवाज आसमंतात दुमदुमला. लखलखीत प्रकाश पडला. पाठोपाठ सर्वत्र धूर पसरला. स्फोटाच्या आवाजाबरोबर 'शाब्बास' असा खणखणीत पुरुषी आवाज घुमला.

ठरल्याप्रमाणे वसंतकुमारने बॉंब फेकला होता. अत्यंत अचूकपणे बॉंबने वेध घेतला होता. झाडांच्या फांद्या चुकवून चालत्या हत्तीवरील हलत्या हौदाचा वेध घेणे व लेडी हार्डिंग्जला ओलांडून लॉर्ड हार्डिंग्जवर बॉंब फेकणे अत्यंत कठीण होते. पण वसंतकुमाराने लक्ष्य अचूक

टिपले होते. बॉंब आसनाच्या पाठीवर आदळला. पण हार्डिंग्जच्या सुदैवाने तो त्याच्या बाजूला न घरंगळता पलिकडच्या बाजूस घरंगळला होता. पाठीच्या मजबूत व जाड फळीमुळे हार्डिंग्ज जखमी झाला, तरी बचावला आणि जमादार महावीर सिंग मात्र जागच्या जागी ठार झाले. मिरवणूक बघण्यासाठी झाडावर चढून बसलेला एक मुलगासुद्धा जागच्या जागी ठार झाला. स्फोटाचा आवाज विरण्यापूर्वी क्रांतिकारकांची ती चौकडी अदृश्य झाली.

स्फोटाची तीव्रता इतकी भयंकर होती की आपण जखमी झाल्याचे हार्डिंग्जला सुरुवातीला समजलेच नाही. बॉम्बची फेक इतकी अचूक होती की लेडी हार्डिंग्जवर साधा ओरखडासुद्धा उठला नाही. आवाज व दणक्याने बिथरलेला हत्ती माहुताने शांत करताच हार्डिंग्ज हौदात उभा राहिला. त्याचे रस्त्यावर पडलेले शिरस्त्राण संगिनीवर ठेऊन त्याला देण्यात आले. त्याने मिरवणूक तशीच पुढे नेण्याची व कार्यक्रम ठरल्याप्रमाणेच पार पाडण्याची आज्ञा दिली आणि मग तो बेशुद्ध होऊन खाली कोसळला. त्याला हत्तीवरून उतरवून मोटारीने हॉस्पिटलात नेण्यात आले, मात्र मिरवणूक तशीच ठरल्याप्रमाणे पुढे गेली.

स्फोटांचा अपेक्षित परिणाम घडून आला. अशा प्रकारे उघड उघड प्रत्यक्ष राजप्रतिनिधीवर हल्ला केलेला पाहून साऱ्या जगात खळबळ उडाली. भारतीय क्रांतिकारकांच्या शौर्याची, धैर्याची व योजकतेची जगभर चर्चा सुरू झाली. सरकार हबकले, पण गप्प बसले नाही. भारत सरकारचा प्रमुख शोध अधिकारी चार्लस् क्लिव्हलँड याने स्वतः शोधकार्य हाती घेतले. कलकत्ता, मद्रास, दिल्ली, मुंबई, नाशिक, डेहराडून अशा अनेक ठिकाणी झडत्या झाल्या. कित्येकांना अटका झाल्या. पण पुराव्या अभावी त्यांना सोडून दिले गेले. मात्र या धामधुमीत रासबिहारी डेहराडूनला, अवध बिहारी व वसंतकुमार विश्वास लाहोरास, भाई बालमुकुंद जोधपूर येथे सुखरूप पोहचले. काही केल्या स्फोटाचे व कटाचे धागेदोर सापडेना सरकारने संशयितांना पकडून देणाऱ्यांस रु. १०,०००/- चे बक्षिस घोषित केले. त्या मागोमाग काश्मिरच्या राजाने रु. १०,०००/- ग्वाल्हेरकरांनी रु. ८,०००/- अशी आपल्या बाजूने त्यात भर टाकली. शेवटी सर्वांची मिळून बक्षिसाठी रक्कम रु.१,००,०००/- (एक लाख) वर पोहोचली जंग जंग पछाडून सुद्धा सरकारला किंचितसुद्धा यश आले नाही.

१२. हौतात्म्य

हुतात्मा मास्टर अमीरचंद
जन्म - १८६९, दिल्ली
फाशी - ८ मे १९१५, दिल्ली

मास्टर अमीरचंदांवर गुप्तचरांची टेहळणी असतानासुद्धा त्यांनी बॉम्ब हल्ल्याचा वृतांत असलेल्या लिबर्टी वृत्तपत्राच्या अंकाच्या टंकलिखित प्रती काढून गावोगावच्या अनेक सार्वजनिक ठिकाणी चिकटविल्या. सरकारचे एक लाखाचे पारितोषिक डोक्यावर घेऊन फिरत असतानासुद्धा रासबिहारी बाबूंचा आग्रह होता पंजाबात क्रांतिकारक घटना घडाव्या. अवध बिहारी व भाई बालमुकुंद यांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. त्याप्रमाणे योजना आखण्यात आल्या.

आसाममधील गार्डन नावाचा एक आय.सी.अेस. अधिकारी हिंदूंवर अतोनात अत्याचार करीत होता. त्याच्याविरुद्ध तक्रारी वाढल्याने अखेर त्याची बदली पंजाबात करण्यात आली. क्रांतिकारी संघटना देशभर पसरली असून अत्याचारी अधिकारी देशात कोठेच सुरक्षित नाहीत हे स्पष्ट करण्यासाठी गॉर्डनचा वध करणे व ते नाहीच जमले तर धाक उत्पन्न करण्यासाठी १७ मे १९१३ या दिवशी लाहोरच्या मॉटगॉमेरी हॉलमध्ये युरोपियनांचा जो एक मोठा कार्यक्रम होणार होता त्या कार्यक्रमात बॉम्बचा स्फोट घडवून आणण्याची योजना ठरली. त्याप्रमाणे स्फोट घडवून आणला गेला. अतिशय कसून व निर्दयपणे शोध करून सुद्धा सरकार स्फोट घडविणाऱ्यांचा शोध लावू शकले नाही.

दिल्ली व लाहोर स्फोटाचा तपास एक वर्ष उलटले तरी लागला नाही. मात्र सरकारचे दैव अचानक उघडले.

बंगालमधील राजाबाझार बॉंम्ब केसचा तपास व लिबर्टी पत्राचा उगम शोधण्यासाठी क्लीव्हलँड दिल्ली व लाहोरात आला होता. झडत्यांच्या दरम्यान लिबर्टी पत्राबाबत काही धागेदोरे दिल्ली पोलिसांच्या हाती लागले. त्या तुटपुंज्या सूत्रांच्या आधारे दिल्लीचा असि. पोलीस सुपरिटेंडट पेट्री याने लाहोरचा सहाय्यक पोलीस प्रमुख स्टेट यास १७ फेब्रुवारी, १९१४ ला तार दिली - ''दीनानाथ नावाच्या गृहस्थाला अटक करून त्याच्या घराची झडती घ्या. तेथेच

रासबिहारी बोस सापडण्याची शक्यता आहे.'' लाहोरातील दीनानाथ नावाच्या यच्चयावत पुरुषांना धरून आणण्यात आले. ''खरा'' दीनानाथ मात्र योगायोगाने त्या दिवशी बाहेरगावी होता. धरून आणलेल्या लोकांच्या चौकशीमधून त्याचा आणि त्याच्या घराचा पत्ता पोलिसांना मिळाला. दुसऱ्याच दिवशी ''खऱ्या'' दीनानाथच्या घरावर धाड टाकून त्याला धरण्यात आले. अटक होताच त्याच्या शौर्याचा आव गळला आणि रडारड सुरू झाली. थोडा पोलिसी हिसका दाखवताच त्याने त्याला माहीत असलेली सारी माहिती ओकली. येवढेच नाही तर दिल्ली व लाहोर स्फोटाची त्याला माहित असलेली माहिती व क्रांतिकारकांची नावे धडाधड सांगून तो मोकळा झाला. अनपेक्षितपणे पोलिसांच्या हाती घबाड लागले.

१२ फेब्रुवारी १९१४ पासूनच रासबिहारी बाबू डेहराडून सोडून लाहोरात येऊन राहिले होते. त्यांच्या सूत्रांकडून त्यांना तारेची माहिती लागली होती. योगायोगाने दीनानाथच्या अटकेपूर्वी काहीच तास अगोदर त्यांनी पठाणाच्या वेषात पोबारा केला होता. पोलिसांनी झपाट्याने अटक व झडत्यांचा सपाटा लावला. लाहोरात अवधबिहारी व दिल्लीत मास्टर अमीरचंदांच्या घरांच्या झडत्यांमध्ये अनेक महत्त्वाचे धागेदोर व विशेषतः रासबिहारी बाबूंच्या संबंधीचा पुरावा सापडला. त्यांचे सामान व क्रांतिविषयक साहित्य, लिखाण, पुस्तके, पत्रके इ. तसेच काही शस्त्रास्त्रे व स्फोटके जप्त करण्यात आली. अवधबिहारी, मा. अमीरचंद, बलराज, खुशीराम, चरणदास, मुन्नालाल, रामलाल, हनुमंत सहाय, रघुवीर शर्मा वगैरेंना अटक करून ताब्यात घेण्यात आले. २७ फेब्रुवारीला जोधपूरला भाई बालमुकुंद यांना धरले. वसंतकुमार विश्वास वडिलांच्या श्राद्धासाठी बंगालमध्ये गेला होता. तो लाहोरला परतताच २८ फेब्रुवारीला त्याला ताब्यात घेतले गेले. रासबिहारी बाबूंचा दीनानाथवर काडीचाही विश्वास नसल्याने दिल्ली स्फोटाची त्याला विशेष माहिती नव्हती. म्हणून त्याबाबत विशेष तपशील तो पोलिसांना सांगू शकला नव्हता त्यामुळे या साऱ्या अटका राजबाझार बॉम्ब केस व लिबर्टी पत्रकाच्या केसमध्ये असल्याचे जाहीर करण्यात आले. पुढे सर्व आरोपींना दिल्ली येथे एकत्र आणून ३ मार्च रोजी त्यांच्यावर दिल्ली व लाहोर स्फोटासंबंधीचे आरोप असल्याचे जाहीर झाले.

दीनानाथ माफीचा साक्षीदार झाला. त्याने लाला हरदयाळ, बाबू रासबिहारी बोस, मास्टर अमीरचंद इ. ची साद्यंत हकीकत कोर्टाला सांगितली. सुदैवाने दोन्ही बॉम्ब स्फोटाबाबतची त्याची माहिती तुटपुंजी व अर्धवट असल्याने तो त्या संबंधाने काही भरीव माहिती देऊ शकला नाही. मा. अमीरचंदाचा दत्तक पुत्र सुलतानचंद हा सुद्धा माफीचा साक्षीदार झाला.

त्याने मा. अमीरचंद व रासबिहारी यांच्या क्रांतिकार्याची माहिती उघड केली हे पाहून मास्टर अमीरचंद दुःखाने कोलमडून पडले. ५१२ कलमाखाली रासबिहारी बाबूंना फरारी घोषित करून त्यांची संपत्ती सरकार जमा करण्यात आली. खालच्या कोर्टातील काम पूर्ण होऊन खटला सेशनकमिट झाला.

एम्.एच्. हॅरिसन, विशेष सत्र न्यायाधीश, दिल्ली यांच्यापुढे २१ मे १९१४ पासून रोज सुनावणी होऊन ६ ऑक्टो १९१४ खटल्याच्या पहिल्या भागाचा, स्फोटक निर्बंध विषयक भागाच निर्णय झाला. मा. अमीरचंद व अवधबिहारी यांना प्रत्येकी २० वर्षे सक्तमजुरी शिक्षा सुनावली गेली. खटल्याच्या पुढच्या भागात फाशी निश्चित असल्याचे माहीत असल्याने दोघेही निर्विकार राहिले. लॉरेन्स गार्डन प्रकरणात दीनानाथ व सुलतानचंद यांच्या साक्षी, सबळ पुराव्यांचा आधार नसतानासुद्धा ग्राह्य धरण्यात आल्या. चरणदास, खुशीराम, रघुवीर शर्मा, मन्नुलाल, रामलाल, यांना सबळ पुरव्या अभावी निर्दोष सोडण्यात आले. बलराम, हनुमान सहाय इ. ना जन्मठेप काळेपाणी, कमी वय लक्षात घेऊन वसंतकुमार विश्वासला जन्मठेप, तर मा. अमीरचंद, अवधबिहारी व भाई बालमुकुंद यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. दीनानाथ व सुलतानचंद यांना माफी व सुटका.

अनेक आरोपी निर्दोष सुटले व कित्येकांना फाशी न झाल्याने अनेक नोकरशहा व गोरे नाराज झाले. त्यांनी शिक्षा वाढवण्यासाठी व निर्दोषी आरोपींना शिक्षा लावण्यासाठी खटपट सुरू केली. त्यामध्ये प्रमुख होता जालियनवाला बाग प्रकरणात बदनाम झालेला पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायर. १० फेब्रुवारी १९१५ ला उच्च न्यायालयात चाललेल्या अपिलांचा निकाल लागून खालच्या कोर्टाने दिलेल्या सर्व शिक्षा कायम तर झाल्याच, त्या शिवाय चरणदास यास जन्मठेप व वसंतकुमार विश्वास यांस फाशी देण्यात आली. ८ मे १९१५ ला दिल्ली जिल्हा तुरुंगात मा. अमीरचंद, भाई बालमुकुंद, अवध बिहारी व वसंतकुमार विश्वास यांना फाशी देण्यात आले. फाशीवर जाण्यापूर्वी वसंतकुमारने हार्डिंग्जवर बॉम्ब आपण एकट्याने फेकल्याची कबुली दिली. फाशी नंतर चारही हुतात्म्यांचे मृतदेह नातेवाईकांच्या हवाली करण्यास व त्यांची प्रेतयात्रा काढण्यास सरकारने स्पष्ट नकार दिला. सरकारने तुरुंगाच्या आवारातच चौघांच्या पार्थिव शरीरावर अग्निसंस्कार केले व राख गुपचूप यमुनेत टाकून दिली. भाई बालमुकुंद यांचा नुकताच प्रेम विवाह झाला होता. त्यांची पत्नी रामरखी हिने पतीच्या फाशीनंतर अन्नपाण्याचा त्याग करून १८ दिवस एकाच जागी पडून राहून सतीप्रमाणे आत्मार्पण केले.

यानंतर सुद्धा बाबू रासबिहारी बोसांचा शोध घेण्याचे प्रयत्न कसून होत राहिले. पण ते सरकारला हुलकावण्या देत दिल्ली, काशी इ. ठिकाणी क्रांतिकार्य करीत राहिले. इतकेच नव्हे तर सरदार कर्तारसिंग, विष्णू गणेश पिंगळे इ. च्या सहाय्याने ''गदर'' या सर्वंकश उठावाची त्यांनी तयारी केली. फितुरीमुळे तो उठाव फसला. त्यामुळे त्यांना परागंदा व्हावे लागले. दक्षिणी ब्राह्मणाचा वेश घेऊन ते भारतातून निघून कलकत्ता, रंगून, शांघाय मार्गे जपानला पोहोचले. जपानात युद्ध कैद्यांमधून स्वातंत्र्य सेना उभारून पुढे आझाद हिंद फौज या नावाने ने. सुभाषचंद्र बोसांच्या हवाली केली व आपल्या जीवितकार्याची सांगता केली.

१३. विष्णू गणेश पिंगळे

क्रांतिरत्न विष्णू गणेश पिंगळे
जन्म - १८८८, तळेगांव (ढमढेरे)
फाशी - १६ नोव्हेंबर १९१५, लाहोर

ब्रिटन जर्मनीबरोबर पहिल्या महायुद्धात गुंतले असताना १९१५ मध्ये भारतात ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्याचा एक व्यापक कट घरभेद्यांच्या फितुरीमुळे उघडकीस आला. तो स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात 'लाहोर' उठाव म्हणून प्रसिद्ध आहे. त्या कटाची व्याप्ती पाहून सरकारला १८५७ ची आठवण झाली. कट इतका सुनियोजित आखलेला होता की जर तो उठाव झाला असता, तर ब्रिटिश सत्ता टिकून राहणे दुरापास्त होते. या उठावाची आखणी करणाऱ्या प्रमुख क्रांतिकारकांमध्ये एक होते विष्णू गणेश पिंगळे.

पिंगळ्यांचा जन्म १८८८ मध्ये पुण्याजवळ तळेगाव ढमढेरे या छोट्या गावात झाला. वासुदेव बळवंत, चाफेकर बंधू इ. च्या कहाण्या ऐकून त्यांच्या मनात लहानपणीच स्वातंत्र्याची उर्मी जागी झाली. स्वा. सावरकरांसारख्या तेजस्वी नेत्याच्या परीस स्पर्शाने त्यांच्या मनात क्रांतीचे स्फुल्लिंग जागे झाले. १९०५ मध्ये स्वा. सावरकरांनी पुण्यात देशातील पाहिली विलायती कापडाची होळी दसऱ्याच्या मुहुर्तावर घडवून आणली. त्यात त्यांचा चांगलाच पुढाकार होता. त्यावेळी देशात क्रांतिकारक चळवळी जोरात चालू होत्या. जॅक्सन वधाचा तसेच बाबाराव सावरकरांवरील खटला इ. खटले त्या काळात देशभर गाजत होते. तेव्हा पिंगळ्यांचा क्रांतिकारक गटामध्ये शिरकाव झाला असल्यास नवल नव्हते. क्रांतिकार्याचा भाग म्हणून इलेक्ट्रिकल इजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी पिंगळ्यांनी अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला. १९११ मध्ये ते हाँगकाँगमार्गे अमेरिकेस निघून गेले. त्यांचे मॅट्रिक पर्यंतचे सुद्धा शिक्षण पूर्ण झालेले नव्हते. त्यामुळे १९११च्या दुसऱ्या सहामाहीत त्यांनी प्रवेश परीक्षा देऊन इंजिनिअरिंगच्या प्रवेशाची तयारी सुरू केली. त्यांनी खूप शारीरिक कष्ट केले. कधी कारखान्यात रोजंदारीवर काम कर, तर कधी बागकाम कर तर कधी गाईच्या गोठ्यात काम कर इतकेच नव्हे तर अलास्कामध्ये फळे गोळा करणारे मजूर म्हणून सुद्धा त्यांनी काम केले. जून १९१३ मध्ये वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीत इंजिनिअरिंग कॉलेजात त्यांना प्रवेश मिळाला.

अमेरिकेत जगण्यासाठी धडपडत असताना आणि इंजिनिअरिंगच्या प्रवेशाची तयारी करीत असताना ते आपले ध्येय विसरले नव्हते. पं. काशिराम व सोहनसिंह भकाना यांनी अमेरिकेत स्थापन केलेल्या 'हिन्दुस्थानी असोसिएशन ऑफ पॅसेफिक कोस्ट' या संस्थेत पिंगळे सामील झाले. पुढे संघटनेचे एक नेता झाले. हीच संस्था पुढे 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग' या नावाने प्रसिद्ध झाली. लाला हरदयाळ यांच्या 'गदर' पत्रांच्या मराठी आवृत्तीचे काम ते पाहू लागले. लाला हरदयाळांच्या बरोबर त्यांनी अमेरिकेचा दौरा केला. सॅन फ्रान्सिस्को, अॅस्ट्रोनिया, सेंट जॉन, सॅक्रमँटो, स्टॉकहोम इत्यादी ठिकाणी त्यांनी व्याख्याने दिली. त्यांचे बोलणे अतिशय प्रभावी आणि व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक व समोरच्यावर छाप पाडणारे होते. त्यामुळे त्यांनी अमेरिकेत वास्तव्य करून असलेल्या हजारो भारतीयांना स्वातंत्र्य भावनेने भारून टाकले. याच काळात त्यांनी बंदूक व पिस्तुले चालविण्याचे शिक्षण घेतले. तसेच बॉम्ब व स्फोटके तयार करण्याचे ज्ञान संपादन केले.

त्यांचे इंजिनिअरिंगचे शिक्षण सुरू झाले पण शिक्षण पूर्ण करण्याचे त्यांच्या नशिबी नव्हते. सर्बियाच्या राजपुत्राचा खून झाला आणि त्या ठिणगीने ४ ऑगस्ट १९१४ ला इंग्लंड आणि जर्मनीमध्ये युद्ध भडकले. पहिले महायुद्ध सुरू झाले.

क्रांतिकारकांना १८५७ची स्वप्ने पडू लागली. ब्रिटनची अडचण हीच आपली सुसंधी. भारतात जाऊन स्वातंत्र्यासाठी उठावणी करण्याची वेळ आली आहे हे जाणून पिंगळ्यांनी आपला अभ्यासक्रम सोडून दिला. त्यांच्या पूर्वीपासूनच्या प्रयत्नांनी जे भारतीय भारताच्या स्वातंत्र्याच्या ध्यासाने भारले गेले होते त्या अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांमध्ये लढ्याची चेतना चेतवून त्यांनी त्यांना हिंदुस्थानात जाण्यास उद्युक्त केले.

''कामा गाटा मारू'' च्या मागोमाग ''तोसा मारू'' या जपानी जहाजातून असे हजारो भारलेले 'गदर'वाले अमेरिकेतून निघून कलकत्त्यात उतरले आणि ठिकठिकाणी लपून पुढच्या आदेशाची वाट पहात राहिले. त्या मागोमाग 'अेस्.अेस्. सलामीस' नावाच्या जहाजातून २० नोव्हेंबर १९१४ ला स्वतः पिंगळे गुप्तपणे कलकत्त्यात उतरले. अमेरिका सोडण्यापूर्वी डॉ. तारकानाथ यांनी त्यांना त्यांच्या बेतापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. ते स्पष्टपणे म्हणाले, ''पिंगळे तुम्ही हिन्दुस्थानात जाऊ नका. येथूनच शक्यतो सारी मदत पोहोचवण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम करा. तिकडे गेल्यास तुम्हाला हमखास मरावे लागेल.''

पिंगळ्यांनी तडफदारपणे उत्तरे दिले,''हरकत नाही. जर मी इतरांना प्राणार्पण करण्याचे आवाहन करत असेन तर माझी सुद्धा त्याला सिद्धता असणे हे माझे कर्तव्य आहे. माझे कर्तव्य मला केलेच पाहिजे.''

कलकत्त्यात उतरताच त्यांनी बंगाली क्रांतिकारकाशी संपर्क साधला. पुढे ते संयुक्त प्रांतात गेले. पिंगळे मराठी आणि इंग्रजी उत्तम बोलतच पण ते गुजराथी, हिन्दी, उर्दू, पंजाबी, बंगाली इत्यादी भाषासुद्धा अगदी अस्खलितपणे बोलत. ते वेषांतर करण्यात सुद्धा पटाईत होते. त्यामुळे भाषेला साजेसा वेष व नाव घेऊन ते सर्वत्र संचार करीत. साधू वेष घेऊन त्यांनी संपूर्ण उत्तर हिंदुस्थान पालथा घातला.

त्यांच्या येण्याने उत्तर भारतातील क्रांतिकारकांना आनंद झाला. त्यांच्या कार्याला नवे बळ मिळाले. त्यांनीच रासबिहारी बोसांचा परिचय उत्तरेतील क्रांतिकारकांना करून दिला. त्यावेळी झालेल्या बैठकीत त्यांनी उघड केले की, ''बंडामध्ये भाग घेण्यासाठी ४००० भारतीय अमेरिकेतून भारतात आले आहेत. बंड सुरू होताच इकडे येण्यासाठी २०,००० लोक तिकडे सिद्ध आहेत. तसेच बंडाची सूचना मिळताच उत्तरेत येण्यासाठी १५००० योद्धे ठिकठिकाणी गुप्तपणे रहात आहेत.''

पिंगळे म्हणजे उत्साहाचा झरा, योजकतेचा आदर्श, कर्तारसिंग सरावा सारख्या साथीदारांसोबत ते वेगवेगळ्या हिंदी सैनिकी छावण्यांना भेटी देऊ लागले. सैनिकांमध्ये देशभक्तिची ज्योत पेटवून ते त्यांना स्वातंत्र्यासाठी लढण्यास प्रवृत्त करू लागले. त्यांना शपथा देऊन 'गदर'मध्ये सामील करून घेऊ लागले. ते असे उत्तम संघटक होते की ज्यांची निष्ठा वादातील मानली जाई, त्या खुद्द पंजाबच्या लेफ्ट. गव्हर्नरच्या शरीररक्षक दलातील शिपाईच त्यांनी आपल्याकडे वळवून घेतले होते.

महायुद्धामुळे युरोपात सैन्याची आवश्यकता वाढल्याने बहुतेक गोरे सैन्य पूर्वीच युरोपात रवाना झाले होते. त्या वेळी हिंदुस्थानात अगदीच नाममात्र गोरे सैन्य होते. हिन्दी सैन्याच्या पलटणी १ मार्च १९१५ व त्यानंतर युरोपात रवाना होणार होत्या. आपापल्या छावण्यांमध्ये त्या प्रयाणासाठी जय्यत तयार होत्या. २१ फेब्रुवारी १९१५ ही सार्वत्रिक उठावाची तिथी पिंगळे व रासबिहारी बाबूंनी मुक्रर केली. त्यासाठी जागोजागी शस्त्रांची, बॉम्बची जमवाजमव करून ठेवण्यात आली. ध्वज तयार करण्यात आले. रेल्वेचे रूळ उखडण्यासाठी आणि तारायंत्रांच्या तारा तोडून टाकण्यासाठी हत्यारे आणि योग्य शिक्षण घेतलेली माणसे ठिकठिकाणी सिद्ध

ठेवली गेली. लाहोर, काशी, जबलपूर, रावळपिंडी, ढाका, मीरत इत्यादी सर्व छावण्यांमधून एकाचवेळी व काटेकोर योजना आखण्यात आली.

ही योजना इतकी काटेकोर व सुव्यवस्थित आखली गेली होती की जर ती कार्यवाहीत येती, तर दुसरे १८५७ घडते. तिची सिद्धता इतकी चोख होती की जर ती अमलात आली असती तर खात्रीने यशस्वी झाली असती व देश तेव्हाच स्वतंत्र झाला असता असे अनेक इंग्रजांनी नंतर मान्य केले आहे.

परंतु भारतमातेचे दुर्दैव. कृपालसिंह नावाचा एक घरभेदी या क्रांतिकारकांत निपजला. त्याने संपूर्ण कटाची माहिती पोलिसांना दिली. ती इतकी विस्मयकारक होती की त्यावर पोलिसांचा विश्वासच बसेना. पण त्याने हरप्रकारे त्यांचा विश्वास पटकावला. केवळ त्याच्या माहितीची खात्री पटवण्यासाठी म्हणून त्याने सांगितलेल्या पत्त्यावर लाहोरच्या क्रांतिकारकांच्या तळावर धाड टाकली. तेथील तयारी पाहून पोलिस चक्रावूनच गेले. तळावरील सर्व क्रांतिकारकांना तिथल्या तिथे अटक झाली. सुदैवाने पिंगळे व रासबिहारी बोस तेथून सटकण्यात यशस्वी झाले.

एवढे होऊनही पिंगळ्यांचे सैनिकी छावण्यांना भेट देण्याचे सत्र सुरूच राहिले. सरकारने त्यांच्या अटकेसाठी मोठ्या रकमेची बक्षिसे जाहीर केली. एकदा बनारसवरून काही स्फोटके व बॉम्ब घेऊन ते मीरतला निघाले. सोबत नादीरखान नावाचा घोडदळातील एकसैनिक होता. रासबिहारी बाबूंना नादीरखानचा विश्वास वाटत नव्हता. त्यांनी पिंगळ्यांना सावध करण्याचा प्रयत्न केला. त्याला सोबत नेण्यास मना केले, परंतु पिंगळ्यांनी तिकडे दुर्लक्ष केले.

पिंगळे नादीरखानसह मीरतच्या १२वी घोडदळ रेजिमेंटच्या छावणीत पोहोचले. तिथेच बाराकीमध्ये राहिले असता २३ मार्च १९१५ ला तेथील पोलिस सुपरिंटेंडेट विलकिन्सनने छापा घालून दारूगोळ्यासकट त्यांना अटक केली. त्यांच्या सोबत असलेला दारूगोळा अर्धीअधिक रेजिमेंट उद्‌ध्वस्त करण्यास पुरेसा होता असे नोंदवले गेले. अर्थात नादीरखानने विश्वासघात केला होता.

पिंगळ्यांसह ८२ क्रांतिकारकांवर राज्य उलथवून टाकण्याच्या आरोपाखाली खटला भरवण्यात आला.'लाहोर कटाचा खटला' म्हणून हा खटला ओळखला जातो. हा खटला एप्रिल ते सप्टेंबर १९१५ पर्यंत लोहार सेंट्रल जेलमध्येच चालवला गेला. पिंगळे व इतर सहा क्रांतिकारकांना फाशी सुनावली गेली.

१६ नोव्हेंबर १९१५ या दिवशी पिंगळ्यांना लाहोर सेंट्रल जेलमध्ये फाशी देण्यात

आली. फाशी जाण्यापूर्वी त्यांनी परमेश्वराची शेवटची प्रार्थना केली, ''हे परमेश्वरा, ज्या पवित्र कार्यासाठी आम्ही आमचे प्राणांचे बलिदान करीत आहोत ते आता तूच पूर्णत्वाला ने. हीच माझी तुझ्यापाशी शेवटची प्रार्थना आहे.''

ते ज्या धीरोदात्तपणे खटल्याच्या काळात वागले व शेवटी फासावर गेले ते पाहून पंजाबचा लेफ्ट. गव्हर्नर सर मायकेल ओडवायर अत्यंत प्रभावित झाला. त्याने नमूद करून ठेवले आहे ''अंगिकारलेले कर्तव्य पार पाडण्यासाठी पिंगळे स्वतःचा जीव धोक्यात घालण्यास डगमगले नाहीत. त्यांनी एखाद्या मर्दाप्रमाणे मृत्यू पत्करला.''

१४. पं. रामप्रसाद बिस्मिल

पंडित रामप्रसाद बिस्मिल
जन्म - १८९७
फाशी - १९ डिसेंबर १९२७, गोरखपूर

पहिल्या महायुद्धात आलेली संधी साधून आखलेली गदर उठावणी घरभेद्यांच्या लोभीपणाने फसली. अनेक क्रांतिकारक फाशी गेले तर कित्येक तुरुंगात छळ सोसत राहिले. क्रांतिकारी संघटनांचे कंबरडे मोडून काढल्याच्या समाधानात सरकार होते. सरकार निश्चिंत होते.

सचीन्द्रनाथ संन्याल हे जन्मठेप काळेपाणी भोगून पुन्हा सक्रीय राजकारणात एवढेच नव्हे तर क्रांतिकारी चळवळीत कार्यरत राहणारे एकमेवाद्वितीय उदाहरण आहे. सुटका होताच ते पुन्हा कार्यमग्न झाले. त्यांच्या प्रयत्नांमधूनच पुढे 'हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' ही राष्ट्रीय पातळीवर सुसंघटितपणे काम करणारी संघटना उभी राहिली.

याच काळात त्यांचा संपर्क मैनपुरी खटल्यातील अनेक क्रांतिकारकांशी आला. त्यात देव नारायण, पं. रामप्रसाद बिस्मिल, राजेन्द्रनाथ लहिरी, चंद्रशेखर आझाद इत्यादी प्रमुख होते. तसेच स्थानबद्धता व कैद भोगून नुकतेच सुटका झालेले व सामाजिक कार्यात गुंतलेले जोगेशचंद्र चॅतर्जी व पंजाबातून कानपुरात येऊन राहिलेले सरदार भगत इत्यादींचा समावेश होता.

पं. रामप्रसाद बिस्मिल यांचे पूर्वज चंबल नदीच्या खोऱ्यात शिस्तबद्ध पण स्वतंत्र जीवन जगत असत. त्यांचे आजोबा पुढे शहाजहानपूर येथे येऊन राहिले. त्यांचे शालेय शिक्षण तेथेच झाले. आर्य समाज मंदिरातील एका सात्विक वृत्तीच्या पुजाऱ्याचा त्यांच्यावर प्रभाव पडून त्यांचे जीवन बदलून गेले. याच दरम्यान त्यांना राजकारणाची आवड उत्पन्न होऊ लागली. वयाच्या १८व्या वर्षी लखनौच्या 'मातृवेदी संस्था' या गुप्त संस्थेत त्यांनी प्रवेश केला आणि सक्रीय राजकारणाला सुरुवात केली. शहाजहानपुरात रहात असतानाचे त्यांचे मित्र ठाकूर रोशन सिंह व अशफाकुल्ला खान हे त्यांच्या प्रभावाने राष्ट्रीय कार्यात आले आणि राजकीय प्रवासात त्यांचे शेवटपर्यंत साथीदार राहिले.

ठाकूर रोशनसिंह यांचा जन्म १८९४ मध्ये शहाजहानपूर जवळच्या नवोढा गावात झाला. ते रजपूत होते. पं. रामप्रसादांच्या संपर्कातून ते मातृवेदी संस्थेत आले आणि पुढे त्यांच्या हातून देशाला ललामभूत ठरणारे कार्य घडून आले.

अशफाकुल्लाखान सुशिक्षित व श्रीमंत पठाण कुटुंबात जन्मले. त्यांचे सर्व नातेवाईक मोठमोठ्या सरकारी नोकऱ्यांमध्ये होते. त्यांना राजकारणाशी देणेघेणे नव्हते. त्यांचे मोठे भाऊ उर्दू शाळेत रामप्रसादांच्या वर्गात होते. तेव्हाच रामप्रसाद व अशफाकुल्लांची मैत्री जमली. दोघांनी एकमेकांना भावांसारखे प्रेम दिले. मातृवेदी संस्थेमधून पं. रामप्रसादांनी अनेक गुप्त कारवायांमध्ये भाग घेतला.

या प्रकरणातून प्रख्यात मैनपुरी कटाचा खटला उभा राहिला. पं. रामप्रसाद पोलिसांच्या हाती लागले नाहीत. त्यांना फरारी घोषित केले गेले. भूमिगत असताना त्यांना अतोनात कष्ट काढावे लागले. उपासमार सोसावी लागली. तरी त्या परिस्थितीत ते बंगाली शिकले. क्रांतिकारकांना अतिशय उपयुक्त ठरेल असे 'निहिलिस्ट रहस्य' हे पुस्तक लिहून त्यांनी प्रसिद्ध केले. सार्वत्रिक क्षमेच्या राजघोषणेनंतर ते शहाजहानपुरात प्रगट झाले. त्यांनी उपजीविकेसाठी रेशमाचा माग चालवण्याचा धंदा सुरू केला. याच काळात यांनी काही पुस्तकांचेसुद्धा लेखन केले. हिंदूंचे पुनरुत्थान व देशाचे स्वांतत्र्य या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत असेच त्यांचे सचीन्द्रनाथ संन्याल व इतर राष्ट्रवादी देशभक्तांप्रमाणे मत होते. त्यांचे गुप्त संस्थेचे काम तसेच चालू होते.

१९२२ च्या सुमारास सचीन्द्रनाथ संन्याल जोगेशचंद्र चॅतर्जींच्या मदतीने सर्व लहान मोठ्या गुप्त संस्थांची मिळून प्रबळ संस्था तयार करण्याच्या खटपटीत होते. १९२३ मध्ये मन्म नाथ गुप्तांच्या आमंत्रणावरून पं. रामप्रसाद बिस्मिल त्यांच्या संस्थेत सामील झाले. त्यांच्या सोबत मातृवेदीचे सर्व निष्ठावान सहकारी आले. नव्या संघटनेचे नाव ठरले, 'हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशन'. सचीन्द्रनाथ संन्यालांनी तिची घटना लिहिली. सशस्त्र क्रांती करून हिन्दुस्थान स्वतंत्र करून हिंदुस्थानात संयुक्त प्रजासत्ताकाची स्थापना करणे हे संघटनेचे ध्येय होते. संघटना, प्रचार, शस्त्रास्त्रांची जमवाजमव, बॉम्ब तयार करणे इत्यादी प्रत्येक कामासाठी स्वतंत्र समित्या स्थापन झाल्या. फेब्रुवारी १९२५ मध्ये सचिन्द्रनाथांना अटक झाली. त्यामुळे हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशनचे नेतृत्व पं. रामप्रसाद बिस्मिलांकडे आले.

संघटना तर बांधली पण ती चालवण्यासाठी पैसा कोठून आणायचा? देणग्या गोळा करण्याचा प्रयत्न केला, पण अपेक्षेप्रमाणे तो साफ फसला. या काळात संघटनेच्या सदस्यांची परिस्थिती फारच बिकट झाली. कोणी अर्धपोटी असे तर काही अन्नछत्रात जेवून दिवस काढत. कोणी बारीक सारीक शिकवण्या करीत. चंद्रशेखर आझाद एका लोणचेवाल्याकडे काम करीत. सहकाऱ्यांचे हाल पाहून पं. रामप्रसादसुद्धा केवळ सातूचे पीठ खाऊनच राहू लागले.

अखेर पैशासाठी दरवडे घालून निधी उभा करण्याच्या निर्णयावर साऱ्यांचे एकमत झाले. तीन-चार दरोडे घातलेसुद्धा, पण त्यात काही विशेष लाभ झाला नाही. उलट स्थानिक स्वजनांशी वैर मात्र निर्माण झाले. अखेर दरोडा घालायचा तर सरकारी खजिन्यांवरच असे बऱ्याच चर्चेअंती ठरले.

पं. रामप्रसाद एकदा गाडीने प्रवास करीत असताना त्या गाडीत प्रत्येक स्टेशनवर स्टेशनमास्तर स्टेशनची रोकड जमा करीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. लखनौला पोहोचेपर्यंत किमान दहा हजाराची रोकड तरी जमा होत असावी, असे त्यांच्या लक्षात आले. गाडीवर दरवडा टाकून ती रोकड लुटण्याचा विचार त्यांच्या डोक्यात घोळू लागला. वेळापत्रकाचा अभ्यास करून त्यांनी त्या लुटीची योजना तयार करून सहकाऱ्यांसमोर मांडली. स्टेशन दर स्टेशन पैसे गोळा करीत रात्री लखनौला पोहचणारी '८ डाऊन' ही दरोड्याचे लक्ष्य ठरली.

काकोरी जंक्शन नंतर दोन स्थानकांच्या मध्ये अंधार पडल्यानंतर साखळी खेचून गाडी थांबवायची व तिजोरी फोडून पैसा घेऊन अंधारात निसटून जावयाचे अशी योजना ठरली. पहिला प्रयत्न फसला कारण उशीरा स्टेशनात पोहोचल्याने गाडी डोळ्यादेखत निघून गेली. पण त्यामुळेच पुढची योजना जास्त काळजीपूर्वक आखली गेली.

९ ऑगस्ट १९२५. कोणतीही चूक न करता आपल्या वीरांनी काकोरी जंक्शन स्थानकावर ८ डाऊन गाडी पकडली. नजरेत भरू नये म्हणून कोणाहीकडे बंदुका नव्हत्या. सर्वांकडे माऊजर पिस्तुले होती. राजेन्द्रनाथ लाहिरी, सचिन्द्रनाथ बक्षी व अशफाकुल्ला खान दुसऱ्या वर्गाच्या डब्यात चढले. तिसऱ्या वर्गातील साखळी पुरेशी विश्वासार्ह नसल्याने ते दुसऱ्या वर्गाच्या डब्यातील साखळी ओढून गाडी थांबवणारे होते. पं. रामप्रसाद बिस्मिल, केशव चक्रवर्ती, मुरारीलाल शर्मा, मुकन्दीलाल, बनवारीलाल, मन्मनाथ गुप्त आणि चंद्रशेखर आझाद असे सात जण तिसऱ्या वर्गाच्या वेगवेगळ्या डब्यांमध्ये विखरून बसले.

ठरल्याप्रमाणे संकेत स्थळाच्या जवळ गाडी येताच राजेन्द्रनाथ लहिरींनी साखळी ओढून गाडी थांबवली. झपाट्याने कटवाले खाली उतरले. दोघांच्या एका गटाने इंजिनामध्ये शिरून पिस्तुलाच्या धाकाने ड्रायव्हरचा ताबा घेतला तर दुसऱ्या गटाने गाडीतून उतरलेल्या गार्डाला ताब्यात घेतले. प्रवाशांना कोणताही त्रास न देता केवळ सरकारी तिजोरी लुटायची असल्याचे ओरडून सर्वांना सांगण्यात आले. तसेच गाडीतून बाहेर न डोकावण्याची सक्त सूचना दिली गेली होती. दोघे क्रांतिकारक गाडीच्या दोन्ही बाजूंनी गस्त घालू लागले व प्रवाशांना धाक वाटावा म्हणून अधून मधून गाडीला समांतर गोळ्या झाडू लागले.

अवजड तिजोरी डब्यातून बाहेर ढकलण्यात आली. गाडीतील पोलिसांना पिस्तुलाच्या धाकाखाली डब्यात बंद करण्यात आले. सोबत आणलेल्या मोठ्या घणाचे घाव घालून तिजोरी फोडण्यास सुरुवात झाली. तिजोरी अत्यंत मजबूत असल्याने सहजासहजी फुटेना. जसजसा उशीर होऊ लागला तसतसे क्रांतिकारक अस्वस्थ होऊ लागले. रात्रीच्या अंधारात घणाचे घाव घुमत होते. अशफाकुल्ला चेवाने आणि त्वेषाने घाव घालू लागले. अखेर तिजोरीला भगदाड पडले. तिजोरीतील सर्व थैल्या काढून त्या चादरीमध्ये बांधून घेतल्या आणि उलट दिशेने जाण्याचा बहाणा करून सारे क्रांतिकारक अंधारात निसटले. लांबचा वळसा घालून वेश्यावस्तीतून रात्री उशीरा सारे लखनौमध्ये पोहोचले व वेगवेगळ्या ठिकाणी विखरून राहिले. राम प्रसादांनी पैसा व शस्त्रे योग्य जागी दडवून ठेवली.

काही दिवसांनी लुटल्या गेलेल्या काही नोटा शहाजहानपुरात सापडल्या. नोटांच्या क्रमांकावरून पोलिसांना त्यांचा तपास लावला. लुटीच्या वेळी प्रवाशांना लुटारूंनी ओरडून दिलेल्या सूचना आणि केवळ सरकारी पैसा घेऊन निघून जाणे यावरून हे क्रांतिकारी गटाचेच काम असावे असा सर्वांचा ग्रह झाला होता. शहाजहानपुरात या नोटा सापडल्याने त्यावर खात्रीची मोहर बसली. लुटारुंच्या अटकेसाठी सरकारतर्फे रू. ५,०००/- चे बक्षिस घोषित झाले पण काहीच सुगावा हाती लागेना.

शेवटी फारसा पुरावा गोळा करण्याच्या खटाटोपात न पडता सर्व संभाव्य संशयितांना एकाचवेळी छापा टाकून ताब्यात घ्यायची योजना पोलिसांनी आखली. त्या अनुसार २६ सप्टेंबर १९२५ ला पहाटेच्या अंधारातच निरनिराळ्या गावी एकाच वेळी छापे टाकून बहुतेक सर्व क्रांतिकारी सदस्य पकडण्यात आले. या धरपकडीतून चंद्रशेखर आझाद, अशफाकुल्ला खान व सचिन्द्रनाथ बक्षी बचावले. पुढे एक वर्षांनी ८ सप्टेंबर १९२६ ला काबूल मार्ग रशियाला जाण्याच्या तयारीत असलेल्या अशफाकुल्लाना दिल्लीत तर भूमिगत असताना झालेल्या कष्टांमुळे आजारी पडलेल्या सचिन्द्रनाथ बक्षींना भागलपूरमध्ये, फितुरीमुळे अटक झाली. मात्र चंद्रशेखर आझाद शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत. उशीरा अटक झाल्याने अशफाकुल्ला व बक्षींच्या विरुद्ध स्वतंत्र खटला चालवला गेला.

१५. सरफरोशी की तमन्ना

मोठ्या प्रमाणावर धरपकड करूनसुद्धा खटला भरण्याइतका पुरेसा आणि भक्कम पुरावा हाती न लागल्याने क्रांतिकारकांना युक्ती प्रयुक्तीने, धाक दपटशाने व अमिषे दाखवून फोडण्याच्या कारवाया सुरू झाल्या यामध्ये बनवारीलाल पोलिसांच्या गळाला लागला आणि तो माफीचा साक्षीदार झाला. त्याच्या कबुलीजबाबातून सारा भेद उघड झाला. दरोड्याचा संपूर्ण तपशील पोलिसांना मिळाला आणि त्याच्या आधारावर भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात 'काकोरी कटाचा खटला' म्हणून गाजलेला खटला उभा राहिला. खटल्याचे कामकाज चालू असताना खटल्यात आरोपी असलेला इंदूभूषण सुद्धा माफीचा साक्षीदार झाला. बनवारीलाल व इंदूभूषण वगळता एकूण २१ जणांवर खटला भरला गेला. काकोरीच्या धावत्या गाडीवरील धाडसी दरोडा ही स्वतंत्र घटना नसून बादशहाच्या विरुद्ध सशस्त्र बंड करून भारताचे सार्वभौमत्व ब्रिटिशांकडून हिरावून घेण्याच्या व्यापक कटाचा एक भाग असल्याचा आरोप ठेवला गेला. या आरोपामुळे आणि खटल्यादरम्यान व नंतर कैदेत क्रांतिकारकांचा झालेला छळ, विटंबना व मानहानीच्या बातम्यांमुळे साऱ्या देशात खळबळ उडाली. सशस्त्र लढा देणाऱ्या देशभक्तांच्या सहानुभूतीची लाट उसळली.

४ जानेवारी, १९२६ या दिवशी सैय्यद अैनुद्दिन या लखनौच्या मॅजिस्ट्रेटपुढे प्राथमिक सुनावणी सुरू झाली. पुराव्याची नोंदणी पूर्ण करून खटला हॅमिल्टन नावाच्या सेशन जज्जाच्या कोर्टात वर्ग करण्यात आला. अशफाकुल्ला व बक्षी यांच्या विरुद्धचा पूरक खटला याच कोर्टापुढे सुनावणीसाठी लावला गेला.

तुरुंगातून २-३ मैल दूर कोर्टात जाताना सारे बंदी हातापायातील बेड्यांच्या तालावर उच्चस्वराने देशभक्तीपर गाणी गात. गर्दीमुळे मोटारीचा वेग कमी झाला किंवा मोटार बाजारासारख्या गजबजलेल्या रस्त्याने जाऊ लागताच स्वातंत्र्याच्या, क्रांतीच्या घोषणा देत. कोर्टाच्या आवारातसुद्धा ते गाणी म्हणत. यामुळे जनजागृती होण्यास खूपच मदत झाली. जनतेत उत्साहाची, स्फूर्तीची, देशभक्तीची आणि सशस्त्र क्रांतिकारकांबद्दलच्या आदराची व श्रद्धेची मोठी लाट उसळली. त्याचा स्वातंत्र्य चळवळीला चालना मिळण्यात मोठा उपयोग झाला.

लखनौचा सेशन्स जज्ज हॅमिल्टन हा पक्का भारत द्वेष्टा. सशस्त्र चळवळ करणाऱ्या

क्रांतिकारक देशभक्तांवर तर त्याचा विशेष राग असे. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर ६ एप्रिल, १९२७ ही निकालाची तारीख त्याने जाहीर केली.

ठाकूर रोशनसिंग
जन्म - १९१५
फाशी - १९ डिसेंबर १९२७,
शहाजहानपूर

निकालाच्या दिवशी ६ एप्रिल, १९२७ ला सारे सजून सवरून तुरुंगाच्या दाराशी, कोर्टात जाण्यासाठी जमले. ठाकूर रोशनसिंगांनी आपल्या ठेवणीतले अत्तर सर्वांना भरभरून लावले. आज बेड्यांचा खळखळाट आणि देशभक्तीपर गाण्यांचा स्वर जरा जास्तच जोरात होता. पोलिसांच्या मोटारीतून उतलेल्यावर अतिशय निर्भयपणे सारे बंदिवान हातापायातील बेड्या तालात खळखळावीत पं. रामप्रसाद बिस्मिलांचे सुप्रसिद्ध 'सर्फरोश गीत' एका तालासुरात मोकळ्या गळ्याने गात कोर्टाच्या इमारतीत शिरले.

न्यायालयाचे दालन माणसांनी खच्चून भरले होते. सशस्त्र पोलिसांचा कडक पहारा जागोजागी बसवला होता. त्या गर्दीत वेशांतर केलेले चंद्रशेखर आझाद आणि भगतसिंग आपल्या सहकाऱ्यांचे भवितव्य जाणून घेण्यासाठी उपस्थित होते. धन्य त्यांच्या निधड्या छातीची आणि भव्य, दिव्य, उत्कट मित्रप्रेमाची.

ठरल्या वेळेला हॅमिल्टन कोर्टात आला. संपूर्ण निकालपत्र न वाचता त्याने त्याचा केवळ सारांश वाचून दाखवला आणि लगेचच शिक्षा सुनावून कोर्टातून लगबगीने निघून गेला. पं. राम प्रसाद बिस्मिल, राजेन्द्रनाथ लाहिरी व ठाकूर रोशन सिंह मरेपर्यंत फाशी. सचिन्द्रनाथ संन्याल जन्मठेप, मन्मनाथ - १४ वर्षे सश्रम कारावास, इतर आरोपींना ७ ते ३ वर्षांच्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षा ठोठावल्या गेल्या. अशफाकुल्ला खान - फाशी, सचिन्द्रनाथ बक्षीला जन्मठेप. अपेक्षेप्रमाणे त्याच दिवशी सर्व कैद्यांना वेगवेगळ्या तुरुंगात हलविण्यात आले. पं. रामप्रसाद बिस्मिल गोरखपूर, ठाकूर रोशनसिंह अलाहाबाद, राजेन्द्रनाथ लाहिरी गोंडा तर अशफाकुल्ला खान फैजाबाद तुरुंगामध्ये रवाना झाले. मन्मनाथ व विष्णूशरण दुबलीना नैनी तुरुंगात हलवले गेले. अशी सर्वांची पांगापांग करून टाकली. जुलै १९२७ मध्ये फाशीच्या शिक्षांवर हायकोर्टाचे शिक्का-मोर्तब झाले. मन्मनाथांची शिक्षा वाढून जन्मठेपेत परावर्तित

झाली. इतरांच्या शिक्षा सुद्धा १० वर्षे पर्यंत वाढविल्या गेल्या. या शिक्षांनी देशभर संतापाची आणि सरकार विरोधाची प्रचंड लाट उसळली. फाशीच्या चारही कैद्यांना आपापल्या तुरुंगामध्ये १९ डिसें. १९२७ या दिवशी सकाळी साडेसहा वाजता फाशी दिली जाण्याची घोषणा केली गेली.

राजेन्द्रप्रसाद लाहिरांना ठेवलेला गोंडा तुरुंग जरा आडबाजूचा, संपर्काच्या पुरेशा सोयी नसणारा आणि सुरक्षा व्यवस्था अपुरी असणारा असा तुरुंग होता. क्रांतिकारक संघटनांचा पूर्वानुभव पाहता तुरुंगावर हल्ला करून फाशीपूर्वी त्यांना पळवून नेले जाईल अशी सरकारला साधार भिती वाटली. त्यामुळे अत्यंत गुप्तपणे त्यांना दोन दिवस आधीच म्हणजे १७ डिसेंबर, १९२७ रोजीच गोंडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले.

राजेंद्रनाथ लाहिरी
जन्म - १८९२, वाराणसी
फाशी - १७ डिसेंबर १९२७, गोंडा

फाशी कोठडीत असताना पं. रामप्रसाद बिस्मिल यांनी आपली ६३ मोठी पृष्ठे भरतील एवढी आत्मकथा लिहून गुप्तपणे तुरुंगाबाहेर पाठवली. आत्मकथेचा शेवटचा भाग त्यांना १६ डिसेंबरला लिहून पूर्ण केला. त्यांनी स्वतःच मुळी तसा उल्लेख आत्मकथेत केला आहे. आत्मकथेच्या शेवटी त्यांनी आपली स्वतः रचलेली देव व देशभक्तीपर अकरा गीते त्या आत्मकथेस जोडली आहेत. सोमवार १९ डिसें. १९२७ पहाटे सर्व सोपस्कार आटोपून पंडितजींना त्यांच्या कोठडीतून बाहेर काढले. 'भारत माता की जय', 'वंदे मारतम्'चा उच्चरवाने घोष करीत ते, युरोपियन पहारेकऱ्यांच्या गराड्यात, फाशीच्या जागेकडे निघाले. त्यांचे हात बांधून व पायांना दोरी बांधून ते फासासमोर उभे असताना त्यांना गोऱ्या सुपरिटेंडटने शेवटची इच्छा विचारताच 'ब्रिटीश सम्राज्याचा विनाश व्हावा. हीच माझी एकमेव आणि शेवटची इच्छा आहे.' असे त्यांनी ताडकन उत्तर दिले. पंडितजींनी वेदांचा अभ्यास केला होता. शेवटचे उत्तर देऊन त्यांनी वेदांतील ऋचा म्हणण्यास सुरुवात

अशफकुल्ला खान
जन्म - २२ ऑक्टोबर १९००, शहाजानपूर
फाशी - १९ डिसेंबर १९२७, फैजाबाद

केली. गळ्याभोवती फास आवळेपर्यंत त्यांचा वेदघोष सुरु होता. मांगाने खटका ओढताच त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

त्याच क्षणाला अलाहाबादच्या तुरुंगात ठाकूर रोशनसिंह व फैजाबादच्या तुरुंगात अशफाकुल्ला असेच धीरोदत्तपणे फाशी गेले.

हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशन ही गदर नंतरची सैनिकांचा सहभाग नसलेली तरी सर्वात मोठी संघटना होती. व्यापक प्रमाणात दमनसत्र चालवून सरकारला आपण ही संघटना संपवल्याचे जे समाधान लाभले होते ते दोन, तीन वर्षातच पार धुळीला मिळाले. भगतसिंग प्रभृतींनी ते कार्य केले.

१६.चंद्रशेखर आझाद

क्रांतिशिरोमणी चंद्रशेखर आझाद
जन्म - २३ जुलै १९०६, भाबरा
शौर्यशाली आत्मार्पण - २७ फेब्रुवारी १९३१, अलाहाबाद

काकोरी, भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक सुवर्णपान. त्या धाडसी कृत्यानंतर सरकारने हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशन नेस्तनाबूत करण्याचा हर तऱ्हेने प्रयत्न केला. पण त्या दरोड्यात प्रत्यक्ष सहभाग घेऊन सुद्धा पोलिसांच्या हाती न लागता गुप्तपणे स्वदेशकार्य करीत, त्या संघटनेला नवजीवन देऊन, पुन्हा त्याच जोमाने, किंबहुना त्यापेक्षा अधिक कार्यक्षमतेने कार्यप्रवण असणाऱ्या वीराचे नाव आहे चंद्रशेखर आझाद.

आझादांचा जन्म २३ जुलै १९०६ ला अलिराजपूर या मध्यप्रांतातील छोटेखानी संस्थानाच्या झाबुआ तहसीलातील भाँवरा नावाच्या खेड्यात एका गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ आडनाव तिवारी. वडील पं. सीताराम व आई जगरानी देवी यांच्या पाच अपत्यांपैकी शेवटचे आणि जगलेले एकमेव मूल. संस्कृत शिकण्याच्या ईर्षेने ते काशीला आले. निघताना जगरानी देवींनी मोठ्या काटकसरीने जम वलेले अकरा रुपये त्यांच्या हातावर ठेवले. काशीला त्यांनी संस्कृत व्याकरण शिकण्याचा प्रयत्न केला, पण ते त्यांना जमेना. कारण त्यांचे लक्ष शिक्षणापेक्षा देशात चाललेल्या स्वातंत्र्य चळवळींमध्ये गुंतले होते.

वयाच्या १५ व्या वर्षी १९२१ च्या असहकार आंदोलनात त्यांनी झोकून घेतले. सहाजिकच इतर सत्याग्रही सोबत ते पकडले गेले पण ते इतके रोड होते की त्यांचे दोन्ही हात हातकडीच्या एकाच कडीत अडकवावे लागले. त्यांचे कोवळे वय आणि दुबळी प्रकृती पाहून मॅजिस्ट्रेटनी त्यांना दटावून रागावून सोडून दिले. काही दिवसांनी पुन्हा अटक झाली. त्यांना त्याच मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आहे. मॅजिस्ट्रेटने चिडून विचारले- 'छोकरे, तेरा नाम क्या है?' 'मेरा नाम है आझाद.' 'पिता कौन है तेरे?' 'स्वतंत्रता मेरे पिता है' 'घर कहाँ है ?' 'जेल खाना.'

आता अशा उद्धट उत्तरांनी मॅजिस्ट्रेट खवळला नसता तरच नवल. त्याने पंधरा वेत मारण्याची शिक्षा सुनावली. वेत मारण्यासाठी त्यांना तिकटीवर बांधत असताना ते पोलिसांना निडरपणे म्हणाले, 'बाँधते क्यों हो? मै भागूंगा थोडी ही!'

ज्या फटक्यांनी भलेभले दरोडेखोर नरमतात ते १५ वेताचे फटके त्या कोवळ्या मुलाने 'वन्दे मातरम्' असा घोष करीत खाल्ले. त्यांच्या या शौर्याचा देशभर डंका वाजला. त्याच दिवशी काशीतील ज्ञानवापीत त्यांचा सत्कार केला गेला. त्यामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख 'आझाद' असाच केला गेला. तेव्हापासून त्यांचे तेच नाव रुढ झाले.

याच काळात त्यांचा काशीत असलेल्या काही गुप्त मंडळांशी संपर्क आला. पुढे काही वर्षांनी प्रणवेश चतर्जींनी त्यांची ओळख जोगेशचन्द्र चतर्जी बरोबर करून दिली. त्यामुळे त्यांचा हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशनमध्ये प्रवेश झाला आणि ते तिच्याशी एकरूप होऊन गेले.

२६ सप्टें. १९२५ ला फार मोठ्या प्रमाणावर देशभर एकाच वेळी छापे टाकून धरपकड झाली. सारे प्रमुख नेते तुरुंगात अडकले. चौघांना फाशी आणि इतरांना मोठ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या गेल्या. सरकारला वाटले, क्रांतिकारकांना पार नेस्तनाबूत केले आहे पण पोलिसांच्या ससेमिरा चुकवत आझाद पंजाब, मध्यप्रांत, युक्त प्रांत, बंगाल, बिहार असा तुफानी प्रवास करीत राहिले. सुखदेव आणि भगतसिंग सारखे नवजवान त्यांनी मदतीला लाभले. ते नवे नवे कार्यकर्ते जोडत राहिले.

सुखदेव सारखा संघटना कुशल कल्पक तरुण त्यांनी जोडला. पंजाबात अनेक तरुणांना त्यांनी गुप्त संघटनेत आणले. पैसा, शस्त्रे, स्फोटके इत्यादी गोळा करण्यात ते वाकबगार होते. त्यांच्या योजकतेची दाद खुद्द कोर्टानेच त्यांना पुढे 'कटाचा मेंदू' ठरवून दिली आहे.

महाराष्ट्रात पुण्याजवळच्या खेडमध्ये १९०८ मध्ये जन्मलेले शिवराम हरी राजगुरू, काशीत संस्कृत शिकण्यासाठी येऊन राहिले होते. व्यायामाच्या आवडीमुळे त्यांची इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी आलेल्या श्रीराम बळवंत सावरगांवकरांशी मैत्री जमली.

सावरगांवकर शिक्षण सोडून गुप्त क्रांतिकार्यात गुंतले होते. त्यांची बाबाराव सावरकरांशी दाट ओळख होती. सावरकरांच्या संपर्कातून त्यांची मुनीश्वर प्रसादांशी ओळख झाली. चंद्रशेखर आझाद, भूमिगत असताना त्यांच्याचकडे रहात होते. मुनीश्वर प्रसादांनी आझादांशी राजगुरु यांची गाठ घालून दिली. बाबाराव सावरकरांचा माणूस म्हटल्यावर वेगळा विश्वास पटवण्याची गरज उरली नव्हती. झाले. अंतरीच्या तारा जुळल्या. दोघे एकमेकांचे होऊन गेले. संघटनेच्या कामासाठी राजगुरु, आझाद व भगतसिंगांबरोबर दिल्ली, लाहोर, फिरोजपूर,

कानपूर, अजमेर असे खूप हिंडले. असे एक एक तरूण जोडत आझादांनी हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनची संघटना इतकी मजबूत केली की काकोरी नंतर दोन अडीच वर्षात तिचा पसारा देशभर पसरला.

सप्टेंबर १९२८ मध्ये दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानजवळच्या जुन्या किल्ल्यात हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनची एक महत्त्वाची बैठक झाली. त्या बैठकीला देशाच्या प्रत्येक प्रांतातून प्रतिनिधी उपस्थित होते. त्यापैकी बहुतेक पोलिसांना अनेक प्रकरणात हवे होते. कित्येकांच्या डोक्यावर हजारो रुपयांची बक्षिसे घोषित झाली होती. भगतसिंग सारख्या तरुणांच्या आग्रहाने असोसिएशनचे नवे नाव निश्चित झाले, 'हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' याच संघटनेची लढाऊ शाखा म्हणून हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन आर्मीची नव्याने स्थापना झाली. दोन्ही संघटनांचे प्रमुख व आर्मीचे सरसेनापती म्हणून एकमताने निवडले गेले, बलराज म्हणजेच चंद्रशेखर आझाद. बैठक संपताच सारे सदस्य जणू हवेतच विरघळावे तसे गुपचूप आपापल्या स्थानी निघून गेले.

सायमन कमिशन विरोधी निदर्शने करीत असताना झालेल्या मारहाणीमुळे १७ नोव्हेंबर १९२८ ला लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. त्यांना ठोसे मारणाऱ्या सुपरिंटेंडेट स्कॉटला ठार मारून या कृत्याचा बदला घेण्याच्या प्रतिज्ञा क्रांतिकारकांनी केल्या. आझादांनी अतिशय काटेकोर कट रचला. पण जयगोपाळच्या चुकीमुळे स्कॉटच्या ऐवजी त्याचा दुय्यम अधिकारी सॉंडर्स मारला गेला. आझादाच्या योजनेप्रमाणे सारे कटवाले कडक पोलिस बंदोबस्त भेदून लोहारातून सुखरूप निसटले. स्वतः आझाद बैरागी साधूच्या वेशात लाहोर मधून निसटले.

८ एप्रिल १९२९ ला असेंब्लित बॉम्ब फेकून भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी स्वतः ला अटक करून घेतली. त्याच दरम्यान लाहोरच्या लोहाराने चुगली केल्याने काश्मिरी बिल्डिंगमधील शस्त्रसाठा पकडला गेला. सुखदेव व जयगोपाळ इत्यादींना अटक झाली. भेकड जयगोपाळ माफीचा साक्षीदार झाला आणि संघटनेवर कुऱ्हाड कोसळली. उत्तर भारतात पोलिसांच्या कारवाया वाढल्याने उत्तर भारतात कार्य करणे अशक्य होऊन बसले. त्या मानाने त्यावेळी पोलिसांच्या वक्रदृष्टीतून सुटलेल्या महाराष्ट्रात पुन्हा एकदा क्रांती कार्य सुरू करून तेथून ते पुढे दक्षिणेत पसरवावे या हेतूने आझादांनी भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकरांना अकोल्यास रवाना केले. पण दुर्दैवाने वाटेत मनमाड स्टेशनवर झालेल्या पोलिस तपासणीत दोघेही पिस्तुलांसह पकडले गेले. त्यांच्या सामानामध्ये बॉम्ब सापडले. दोघांवर पुढे खटला चालून त्यांना जन्मठेपेच्या शिक्षा लागल्या.

१७. आत्मार्पण

क्रांतिशिरोमणी चंद्रशेखर आझाद
जन्म - २३ जुलै १९०६, भाबरा
शौर्यशाली आत्मार्पण - २७ फेब्रुवारी १९३१, अलाहाबाद

साँढर्स वधाचा खटला चालू असताना क्रांतिकारी संघटना अजून जिवंत आहे आणि इतकचे नव्हे तर प्रचंड उत्पात घडविण्याइतकी बलशाली आहे हे जगाला दाखवून देण्यासाठी आझादांनी व्हॉइसरॉय लॉर्ड आयर्विनची खास गाडी स्फोटकांनी उडवून देऊन प्रत्यक्ष व्हॉइसरॉयची हत्या करण्याचा धाडसी बेत आखला. त्यासाठी दिवस निवडला २३ डिसेंबर १९२९. याच तारखेला व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिंग्जवर भर मिरवणुकीत वसंतकुमार विश्वासने रासबिहारी बोसांच्या योजनेप्रमाणे यशस्वी बॉम्बफेक केली होती.

पहाटेच्या अंधारात आणि दाट धुक्यातून व्हॉइसरॉय स्पेशल जुन्या किल्ल्याजवळच्या यमुनेच्या पुलावरून जाणार होती. रेल्वेरूळांना बॉम्ब बांधून बॅटरीच्या सहाय्याने ३०० यार्ड दूर असलेल्या जुन्या किल्ल्यातून स्फोट घडवून गाडी उडवण्याची योजना होती. स्फोट होताच रेल्वेचे रूळ उदध्वस्त होऊन गाडीचे डबे पुलावरून खाली नदीत कोसळतील अशी अपेक्षा होती. आज हे तंत्र सामान्य वाटत असले तरी त्या काळातील तंत्रज्ञानाचा आणि क्रांतिकारकांना उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या साधन सामुग्रीचा विचार करता ही योजना फारच महत्तवाकांक्षी आणि क्रांतिकारकांच्या बुद्धिमत्तेची, तसेच क्षमतेची कसोटी पहाणारी होती, यात वाद नाही. प्रत्यक्ष कारवाई इंद्रपाल आणि यशपाल करणार होते.

स्फोट घडविण्यात यश आले पण घनदाट धुक्यामुळे डब्यांचा अंदाज चुकला. तसेच स्फोटकांची क्षमता कमी पडल्याने अपेक्षित प्रमाणात रूळ उद्ध्वस्त झाले नाहीत. स्फोटामुळे गाडीचा दुसरा डबा तळातून उद्‌ध्वस्त झाला खरा पण गाडी थांबावी इतके नुकसान झाले नाही. तुटलेल्या रूळांवरून गाडी सहज पुढे जाऊ शकली. लॉर्ड आयर्विनचे नशीब थोर म्हणून तो वाचला. धुक्याचाच फायदा घेऊन यशपाल व इंद्रपाल निसटून गेले.

भगतसिंग आणि सुखदेव यांच्यासारखे मोहरे तुरूंगात खितपत राहणे किंवा फासावर चढून कामी यावे हे संघटनेच्या भवितव्याच्या दृष्टीने हिताचे नाही असे आझादांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे त्यांची कैदेतून सुटका करून पळवून नेण्याची योजना त्यांनी तयार केली. त्यासाठी दिवस निश्चित केला होता १ जून १९३० सुटकेच्या वेळी पोलिसांवर हल्ला करण्यासाठी बॉम्ब तयार केले होते. त्या बॉम्बचे परीक्षण करण्यासाठी भगवतीचरण व्होरा, सुखदेवराज व बच्चन वैशंपायन यांना घेऊन शहराबाहेर रावीच्या तीरावरील जंगलात गेले. बॉम्बची क्लीप सैल झाल्याने तो भगवतीचरणच्या हातातच फुटला. ते जबर जखमी झाले. अशा जखमी अवस्थेत त्यांना शहरात नेणे म्हणजे पोलिसांचे संकट पुन्हा ओढवून घेणे असा विचार करून वैशंपायन त्यांच्याजवळ थांबला. सुखदेवराज आझादांना बोलविण्यासाठी आणि डॉक्टरांची मदत आणण्यासाठी शहरात आला. आझाद पोहोचेपर्यंत भगवतीचरणांचे प्राण निघून गेले होते. पोलिसांचे किंवा घरभेद्यांचे लक्ष वेधले जाऊ नये म्हणून त्यांची पत्नी दुर्गाभाभी संघटनेची आज्ञा शिरसावंद्य मानून पतीचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सुद्धा आली नाही. चिता पेटवल्यास पोलिसांना माग लागेल या भीतीने त्या वीर हुतात्म्याच्या मृतदेहास मोठे दगड बांधून रावी नदीच्या पात्रातच जलसमाधी दिली गेली.

भगवतीचरणांच्या मृत्युमुळे भगतसिंगच्या सुटकेच्या योजनेची तारीख बदलली असे झाले नाही. ठरल्यादिवशी ठरल्या वेळेवर प्रत्येक सैनिक आपापल्या स्थानी जय्यत तयार होता. होय, दुर्गाभाभीसुद्धा त्यांना दिलेले कर्तव्य पार पाडण्यासाठी वैधव्याचे दुःख गिळून सज्ज होती. परंतु कोणा घरभेद्याने पोलिसांना बातमी कळवली होती की काय न कळे, पण त्या दिवशी पोलिसांचा बंदोबस्त अभूतपूर्व म्हणावा इतका मोठा आणि कडक होता. पोलिसांच्या हालचाली इतक्या सावध होत्या की क्रांतिकारकांना हालचाल करणे शक्यच झाले नाही. योजना सपशेल फसली.

यशपाल कानपूरला आझादांना भेटले. त्यांची रशियाला जाण्याची योजना आझादांनी आखली. २७ फेब्रुवारी १९३१ चा तो दुर्दिन उजाडला. सकाळी साडेनऊ वाजता यशपाल सुरेंद्र पान्डेला घेऊन प्रवासात लागणाऱ्या काही वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात निघाले. कोणीतरी अल्फ्रेड पार्कात भेटणार असल्याने आझाद त्यांच्या सोबतच बाहेर पडले. त्यांनी धोतर कुर्ता असा साधा पेहराव केला होता. मात्र नेहमी प्रमाणे आपले लाडके माऊजर पिस्तुल धोतराच्या आत कमरेस खोचण्यास व गोळ्यांचा पट्टा बांधण्यास ते विसरले नाहीत. गप्पा

गोष्टी करीत सारे बागेजवळ आले. आझाद बागेत शिरले व यशपाल पाण्डेसह पुढे निघून गेले. तेवढ्यात सुखदेवराज बागेत आला. एका झाडाखालच्या मोकळ्या बाकावर बसून आझाद त्यांच्याशी काही चर्चा करू लागले.

विश्वेश्वर सिंग नावाच्या एका घरभेद्याने आझादांना बागेत शिरताना ओळखले. त्याने तातडीने फोन करून कानूपरच्या ॲडिशनल डिस्ट्रीक्ट पोलिस सुपरिटेन्ड नाट बॉर्वर याला खबर दिली. नाट बॉर्वर हत्यारबंद होऊन व तीन सशस्त्र गुप्त पोलिसांना सोबत घेऊन जीपने बागेत पोहोचला. आझादांवर पिस्तुल रोखून त्यांच्या दिशेने चालत येत त्याने आझादांना हटकले. विद्युत वेगाने आझादांचे माऊजर त्यांच्या हातात आले आणि त्यांनी बॉर्वरवर गोळी झाडली. मात्र त्याच वेळी त्याने झाडलेली गोळी त्यांच्या पायात घुसल्याने नेम चुकला. बॉर्वरने लागोपाठ झाडलेली गोळी त्यांच्या छातीत शिरली. तरी त्यांनी दुसऱ्या गोळीने बॉर्वरचा वेध घेतलाच. गोळी त्यांच्या दंडात शिरली. याच संधीचा फायदा घेऊन चित्त्यासारखी झेप घेत त्यांनी एका मोठ्या झाडाच्या मागे आश्रय घेतला. त्यांनी सुखदेव राजला निघून जाण्याचा आदेश दिला. सेनापतीला मदत करण्यासाठी न थांबता तो मूर्ख प्राण वाचवून पळून गेला.

दोन्ही बाजूंनी गोळा गोळी सूरू झाली. आझाद एकटे एकाकी. सोबत मोजक्याच गोळ्या. लढाई विषम होती. एवढ्यात आझादांना दूर झुडुपामागे लपलेला विश्वेश्वर सिंग दिसला. त्या अवस्थेतसुद्धा त्यांनी एवढ्या लांबून अचूक वेध घेतला. विश्वेश्वराचा जबडा फाटून निघाला. पोलिसांची वाढीव कुमक आली. आझादांच्या पिस्तुलात एकच गोळी शिल्लक राहिली. शेवटची गोळी हृदयाजवळ कुशीत झाडून घेऊन त्यांनी पोलिसांच्या हातात जिवंत न सापडण्याची आपली प्रतिज्ञा खरी केली.

पलिकडून होणारा गोळीबार शांत झाला तरी आझादांच्या नेमबाजीने धास्तावलेले पोलिस पुढे येण्यास धजावत नव्हते. एक हवालदार दबकत दबकत पुढे पुढे सरकला. रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडलेले आझाद त्याला दिसले. परंतु शिकारी जसा सावजावर सावधगिरी म्हणून गोळी झाडून ते मेल्याची खात्री करून घेतो, तशी त्या हवालदाराने एक गोळी आझादांच्या निष्प्राण कलेवरावर झाडली. ते मृत झाल्याची खात्री पटल्यावरच पोलिसांनी त्यांच्या देहाचा ताबा घेतला. तो पर्यंत शहरात चकमकीची बातमी फुटली होती. लोकांचे लोंढे अल्फ्रेड पार्ककडे लोटू लागले. एतद्देशियांच्या भावनांची कदर करेल तर ते इंग्रजी शासनच कसले? आझादांचे पार्थिव त्यांच्या नातेवाईकांच्या हाती देण्यास व त्यांची प्रेतयात्रा काढण्यास

मनाई करण्यात आली. रसूल घाटावर पोलिसांनीच त्यांचा अग्निसंस्कार केला. सर्व निर्बंध झुगारून आणि परिणामांची पर्वा न करता पुरुषोत्तम टंडन व काही नेते त्या स्थळी पोहोचले. आझादांची रक्षा कलशांमध्ये भरून त्यांनी शहरात आणली. त्यांची विशाल मिरवणूक निघाली. प्रचंड मोठी श्रद्धांजली सभा झाली.

ज्या झाडाखाली आझादांनी शेवटचा श्वास घेतला त्या झाडालाच लोकांनी समाधिवत् मानून त्या ठिकाणी पूजा करण्यास, दीप उजळण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय मानबिंदूचा उच्छेद हा तर ब्रिटीश राज्यातील परवलीचा शब्द होता. सरकारने ते झाडच मुळासकट तोडून टाकले. मात्र अशाप्रकारे लोकांच्या मनातील दिव्य स्मृती पुसून टाकता येत नाहीत हे सरकार विसरले.

१८. सरदार भगतसिंग

हुतात्मा सरदार भगतसिंग
जन्म - २८ सप्टेंबर १९०७, वंगा
फाशी - २३ मार्च १९३१, लाहोर

सशस्त्र क्रांतिकारकांमध्ये जेवढी प्रसिद्धी आणि लोकप्रियता सरदार भगतसिंग यांना मिळाली तेवढी कोणाच्याही वाट्याला आली नाही. त्यांना फाशी झाली त्यावेळी त्यांची लोकप्रियता म. गांधींनासुद्धा त्याचा हेवा वाटावा इतक्या उत्तुंग पदाला पोहोचली होती. त्यांचे धैर्य, बुद्धी सारे सारे त्यांनी राष्ट्राच्या चरणी वाहिले. त्यांनी एक विलयाला जाऊ पहाणारी संघटना पुन्हा उभी केली. एवढेच नव्हे तर तिला राष्ट्रव्यापी स्वरुप दिले. अनेक क्रांतिकारकाप्रमाणे त्यांचे दैवत होते छत्रपती शिवाजी महाराज व कार्य प्रेरणा होती स्वा. सावरकर. त्यांचा प्रेरक ग्रंथ होता '१८५७ चे स्वातंत्र्य समर.'

सरदार भगतसिंगचा जन्म १९०७ साली आज पाकिस्तानात गेलेल्या लालपूर जवळच्या एका खेड्यात झाला. त्यांचे सारे घराणेच देशभक्त होते.

सर्वस्व राष्ट्राला अर्पण करण्याचा त्यांचा निश्चय असल्याने वडिलांनी ठरवलेल्या लग्नात मोडता घालून ते कानपूरला निघून गेले. हिन्दुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या उभारणीत असलेल्या जोगेशचंद्र चतर्जींच्या संपर्कात ते आले. जोगेशचंद्र बाबूंनी त्यांना गणेश शंकर विद्यार्थींकडे नेले. त्यांनी त्यांना आपल्या 'प्रताप' दैनिकात संपादकीय काम शिकण्यासाठी ठेऊन घेतले. त्यांचा मुक्काम 'प्रताप' त्या कार्यालयातच होता. याच काळात त्यांचा संपर्क पं. रामप्रसाद बिस्मिल इ. थोर क्रांतिकारक नेत्यांशी आला. आझादांची आणि त्यांची तार लगेचच जुळली. त्यांच्या परिसस्पर्शाने या हिऱ्याला पैलू पडले. काकोरी प्रकरणानंतर आझादांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी देशभर तुफानी प्रवास केला आणि संघटना पुन्हा उभी केली.

१७ नोव्हेबर १९२८ ला लालाजींचा अंत झाला. साऱ्या राष्ट्रावर शोककळा पसरली. देशातील तरुणाई खवळून उठली, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग व त्यांचे निवडक साथीदार लालाजींच्या अंत्ययात्रेत वेश पालटून सामील झाले. त्यांना लालाजींच्या जळत्या चितेला साक्षी ठेऊन या हत्येचा सूड घेण्याची मनोमन प्रतिज्ञा केली.

योजना ठरली. जयगोपाळने स्कॉटच्या मागावर रहावे. स्कॉट त्याच्या कार्यालयातून बाहेर पडताच डि. ए. व्ही. कॉलेज समोर दबा धरून बसलेल्या राजगुरु व भगतसिंगांना त्याने खूण करावी. तो टप्प्यात येताच राजगुरुने त्याला गोळी घालून ठार करावे. जर राजगुरुचा नेम चुकला वा त्याची गोळीच उडाली नाही तर भगतसिंगने स्कॉटला खतम करावे. कार्यभाग उरकताच कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या बंगल्याच्या आवारात शिरून मागील फाटकातून कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये व तेथून सुरक्षित ठिकाणी पळून जावे. ते तसे पळत असताना कोणी अडथळा आणल्यास वा पाठलाग केल्यास स्वतः आझाद त्याचा समाचार घेणार होते. दिवस ठरला. १५ डिसेंबर १९२८. पण त्या दिवशी स्कॉट त्याच्या कार्यालयातच न आल्याने साराच बेत वाया गेला. परंतु एवढ्याने निराश न होता पुन्हा १७ डिसेंबरला सापळा रचला गेला.

सायकलीची चेन ठीक करण्याचा बहाणा करीत पोलीस मुख्यालयासमोर रेंगाळणाऱ्या जयगोपाळने एक गोरा अधिकारी कार्यालयातून बाहेर येताना पाहिला. तो सतर्क झाला. तो अधिकारी मोटरसायकलवर बसून निघाला. त्याच्या मागे एक शिपाईसुद्धा बसला होता. उत्तेजित झालेल्या जयगोपाळने तो कोण आहे याची संपूर्ण खात्री न पटवताच सहकाऱ्यांना सांकेतिक खूण केली. वास्तविक तो स्कॉट नसून त्याचा दुय्यम डे. सुप. सॉंढर्स होता. त्याच्या मागे बसलेला होता त्याचा हुजऱ्या हवालदार छननसिंग.

फटफटी डि ए व्ही कॉलेजवळ येताच राजगुरु पिस्तुल सज्ज करून रस्त्याच्या मधोमध आला आणि नेम साधून त्याने गोळी घातली. गोळीने नेमका मस्तकाचा वेध घेतला. फटफटीसह सॉंढर्स खाली कोसळला. फटफटी, त्याच्या व छननसिंगाच्या अंगावर पडली वास्तविक पहिल्याच गोळीने आपले काम बजावले होते. पण भगतसिंग पुन्हा पुढे सरसावले व त्यांनी आपल्या ॲटोमॅटिक पिस्तुलातून दोन गोळ्या सॉंढर्सच्या छातीत मारल्या. काम पूर्ण होताच दोघे वीर ठरल्याप्रमाणे पळत सुटले.

या वेळेपावेतो छननसिंगाने स्वतःला फटफटी खालून मोकळे केले आणि तो दोघांच्या मागे धावला. पिस्तुल सरसावत आझाद त्याला आडवे आले आणि मायभूमीची आठवण देऊन त्याला परत फिरण्यास सांगितले. पण उलट त्यांनाच गलिच्छ शिवी हासडत त्याने पाठलाग जारी ठेवला. आझादांचा नाईलाज झाला. वास्तविक स्वकीयांना होता होई तो कोणतीही इजा करायची नाही असाच सर्वसामान्य संकेत होता आणि अगदीच प्राणावर बेतेपर्यंत तो कसोशीने पाळला जात होता. पळता पळता त्यांनी छननसिंगला पुन्हा एकदा इशारा दिला. पण

देशापेक्षा चाकरीला महत्त्व देणारा तो पाठलाग सोडण्यास तयार नव्हता. आझादांचे माऊजर पिस्तुल कडाडले. गोळ्या छननसिंगाला वर्मी लागल्या. पण ते इमानी जनावर तशाच घायाळ अवस्थेत आपल्या धन्याच्या मारेकऱ्यांच्या मागे रक्त सांडत धावत राहिले आणि प्रिन्सिपॉलच्या बंगल्याच्या आवारात कोसळले. साँढर्स जागीच ठार झाला होता. छननसिंग दवाखान्यात मेला. क्रांतिकारक सुखरुप सुरक्षित ठिकाणावर पोहोचले.

लाहोर शहराची ताबडतोब नाकाबंदी केली गेली. शहराबाहेर पडण्याचे सर्व रस्ते बंद केले गेले. बस अड्डे, गाडी तळ, रेल्वे स्टेशन सर्वत्र चौक्या बसवल्या गेल्या. तपासणी केल्याशिवाय कोणालाच सोडले जात नव्हते. मात्र एवढ्या कडक पहाऱ्यातूनसुद्धा आझाद बैरागी साधूच्या वेशात लाहोर बाहेर सटकले. सैनिकी अधिकाऱ्यांच्या वेशात भगतसिंग रेल्वे स्टेशनवर आले. पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी दुर्गाभाभी त्यांची पत्नी बनून आपला मुलगा राहुलला बरोबर घेऊन त्यांच्या सोबत होत्या. राजगुरु त्यांचा नोकर बनला होता. अशाप्रकारे पोलिसांना हुलकावणी देऊन ते सुखरुप कलकत्त्याला पोहोचले.

सरकारविरुद्ध उठणारा आवाज दडपण्यासाठी 'पब्लिक सेफ्टी बिल' आणि स्थानिक व्यापाराचे खच्चीकरण करणारे 'ट्रेड डिस्प्युट बिल' सरकारने असेंब्लीमध्ये आणले होते. सभापती विठ्ठलभाई पटेल त्यावर ८ एप्रिल १९२९ ला आपला निर्णय देणार होते. दोन्ही बिलांना विरोध प्रगट करण्यासाठी, क्रांतिकारी स्वातंत्र्य लढ्याकडे जगाचे लक्ष वेधण्याची आणि सराकारवर वचक बसवण्यासाठी त्याचदिवशी असेंब्लीमध्ये बॉम्बस्फोट करून भगतसिंगने स्वतःला अटक करवून घ्यावी आणि नंतर कोर्टाचेच व्यासपीठ वापरून संघटनेची मते जगासमोर मांडावीत असा प्रस्ताव मांडला गेला. या प्रस्तावाला सुखदेव आणि आझादांचा प्रखर विरोध होता. परंतु अनेक तर्क लढवून व युक्तीवाद करून त्याने आझादांना तो मान्य करायला लावला. त्यांच्या सोबत बटुकेश्वर दत्त राहणार होते.

८ एप्रिल १९२९ ला भगसिंग व बटुकेश्वर दत्त खाकी सैनिकी वेषात असेंब्लीमध्ये प्रेक्षक सज्ज्ञात येऊन बसले. भगतसिंग व दत्त दोघांनी प्रत्येकी एक एक बॉम्ब आपल्या कपड्यात दडवून आणला होता. भगतसिंगांनी त्याशिवाय दोन भरलेली जर्मन बनावटीची ब्राऊनिंग पिस्तुले आणि काही सुटी काडतुसे कोटाच्या खिशात घेतली होती. दत्त हातात पत्रकांची पिशवी वागवत होते. बरोबर दुपारी १२.३५ वाजता सभापती विठ्ठलभाई पटेल आपला निर्णय ऐकवण्यासाठी उभे राहिले. त्याच क्षणी भगतसिंगांनी सरकारी पक्षाच्या सदस्यांच्या पुढच्या मोकळ्या जागेत बॉम्ब भिरकावला. 'वन्दे मातरम्' 'डाऊन विथ इंपिरिआलिझम' 'इन्कलाब

झिंदाबाद' या घोषणांच्या मागोमाग स्फोटांच्या आवाजाने सभागृह दुमदुमले. काही सेकंदातच दुसरा स्फोट झाला. दोघेही वीर सतत घोषणा देतच होते. दत्त दोनही हातांनी पत्रके सभागृहात भिरकावीत होते. पत्रकावर शीर्षक होते, 'बहिऱ्यांना ऐकू येण्यासाठी मोठा आवाज करावा लागतो.' जॉन्सन व टेरी हे युरोपियन सार्जटस् पुढे धावले. दोघे शांतपणे त्यांच्या हवाली झाले. जगभर खळबळ उडवण्याचा त्यांचा उद्देश सफळ झाला होता. कारण जगभरातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी ही बातमी ठळकपणे पहिल्या पानावर छापली.

७ मे १९२९ ला दिल्ली मध्यवर्ती तुरुंगातच उभारलेल्या मॅजिस्ट्रेट पूल यांच्या कोर्टात असेंब्ली बॉम्बस्फोट खटल्याची प्राथमिक सुनावणी सुरू झाली. बचाव पक्षातर्फे बॅ. असफअली काम पहात होते. दोघांनी मॅजिस्ट्रेटपुढे निवेदन न देता आपले निवेदन सेशन्स कोर्टासमोर देण्यासाठी राखून ठेवले. प्राथमिक सुनावणी पूर्ण होऊन दि. ४ जून १९२९ ला दिल्लीच्या सेशन्स जज्ज मिडिलटन याच्या कोर्टात रीतसर सुनावणी सुरू झाली. भगतसिंगांनी कोर्टासमोर अत्यंत प्रभावी आणि प्रदीर्घ वक्तव्य केले. अपेक्षेप्रमाणे त्याला भरपूर प्रसिद्धी मिळाली. मिडिलटनने १२ जून १९२९ ला दोघांना जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा ठोठावली.

१९. 'रंग दे बसंती चोला'

सुखदेव
जन्म - १५ में १९०७, लुधियाना पंजाब
फाशी - २३ मार्च १९३१, लाहोर

या घटना घडत असताना सॉंढर्स वधाचा तपास सुरूच होता. काही घटनांमुळे पोलिसांना अनपेक्षितपणे तपासात यश मिळू लागले. स्फोटकांच्या कच्च्या रसायनांची मोठी खरेदी झाल्याची कोणीतरी पोलिसांकडे चुगली केली होती. त्यातच बॉम्बच्या खोळी करण्याचे काम ज्या गुलाम रसूल नावाच्या लोहाराला देण्यात आले होते. त्याने बक्षिसाच्या लोभाने डेप्युटी सुपरिटेंडेंट अब्दुल यांच्याकडे तक्रार केली. त्या लोहाराच्या मदतीने डेप्युटी सुपरिटेंडेंट अब्दुल याने सुटे भाग घेऊन जाणाऱ्या कार्यकर्त्यांचा पाठलाग केला, तेव्हा पोलिसांना काश्मिरी बिल्डिंग क्र. ६९ मधील जागेचा शोध लागला.

१६ एप्रिल १९२९ ला सकाळी डेप्युटी सुपरिटेंडेंट अब्दुलने त्या घरावर छापा टाकला. दरवाजा उघडला तोच मुळी सुखदेव यांनी. पोलिसांना पाहून त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन त्यांना घालवण्याचा प्रयत्न केला. तरी पोलिस घरात घुसू पाहताच त्यांनी पिस्तुल काढण्याचा प्रयत्न केला पण पोलिसांनी त्यांना जेरबंद केले. सुखदेव यांच्या बरोबरच जयगोपाळ आणि किशोरीलाल यांना सुद्धा अटक केली गेली. त्या ठिकाणी बराच मोठा शस्त्रसाठा आणि स्फोटक पदार्थ पोलिसांच्या हातात पडले.

या छाप्याचा सॉंढर्स वध तपासाशी काही संबंध असेल असे पोलिसांना वाटले नव्हते पण या संबंधात अटक झालेल्या अन्य काही तरुणांनी छळ आणि मारहाणीमुळे दिलेल्या जबानीमधून भगतसिंग इ. सॉंढर्सचे मारेकरी असल्याचे आणि सुखदेव, जयगोपाळ इ.चा त्यात सहभाग असल्याचे उघड झाले. शारीरिक आणि मानसिक छळापुढे जयगोपाळ टिकू शकला नाही. तो माफीचा साक्षीदार होण्यास तयार झाला. त्याच्या कबुली जबाबावर आधारून पोलिसांनी सारे धागेदोरे जुळवले.

सॉंढर्स वधाच्या खटल्याची प्राथमिक सुनावणी १० जुलै १९२९ पासून लाहोर च्या मध्यवर्ती तुरुंगातच उभारण्यात आलेल्या खास न्यायालयात स्पे. मॅजि. श्रीकृष्ण यांच्यासमोर

सुरू झाली. कोर्टासमोर भगतसिंग, सुखदेव, बटुकेश्वर दत्त, जतिन्द्रनाथ दास यांच्यासह सोळा आरोपी होते.

सर्व आरोपी अतिशय उत्साहात 'वंदे मातरम्' 'इन्किलाब झिंदाबाद' इ. घोषणा देत. देशभक्तीची गाणी म्हणत कोर्टात येत. कोर्टात सुद्धा ते बुलंद आवाजात घोषणा देत. क्रांतिकारकांनी त्यांना राजकीय कैदी घोषित करावे व इतर मागण्यांसाठी १४ जुलै १९२९ पासून अन्न सत्याग्रह सुरू केला. मारहाण करून अन्न घेण्याची जबरदस्ती होऊ लागली. क्रांतिकारक कडवा प्रतिकार करू लागले. एक एका कैद्याला पाच सहा वॉर्डर बेदम मारहाण करून त्याच्या छातीवर बसून घशामध्ये नळी खुपसून दूध पाजले जाऊ लागले. उपासाने क्षीण झालेले बंदी वॉर्डरांच्या हातून सुटका होताच घशात बोटे घालून किंवा एखादी माशी पकडून ती गिळून उलट्या काढीत व सारे दूध ओकून टाकत. हिंसक चळवळ करणाऱ्यांचा हा अहिंसक प्रतिकार पाहून सारा देश प्रभावित झाला. लोक खवळले. क्रांतिकारकांच्या लोकप्रियतेने नवा उच्चांक गाठला.

सतत अडीच महिने क्रांतिकारक उपोषण करीत राहिले. उपोषणामुळे १३ सप्टें. १९२९ ला जतिन्द्रनाथ दास हुतात्मा झाले. सारे राष्ट्र हेलावले. शस्त्राचारी, चळवळी करणारे प्रसंग पडल्यास केवढ्या वज्रनिश्चयाने अहिंसक लढा देऊ शकतात याचा वस्तुपाठच जणू त्यांच्या हौतात्म्याने राष्ट्रापुढे ठेवला. त्यांच्या पार्थिवाचा ताबा नेताजी सुभाषचंद्र बोसांनी घेतला. कलकत्त्यात त्यांची अभूतपूर्व अंत्ययात्रा निघाली. अखेर सरकारला झुकावे लागले. कैद्यांमध्ये अ, ब, क, ड वर्गवारी करून बरेचसे हक्क राजकीय बंदिवानांना देण्यात आले.

शिवराम हरी राजगुरु
जन्म - १९०८, खेड
फाशी - २३ मार्च १९३१

सोमवार ३० सप्टे. १९२९ ला पहाटेच्या अंधारात पुण्यात वेगळेच नाट्य घडले. राजगुरु व सावरगावकर टिळक रोडवर एका भाडेपट्ट्याच्या घरात राहत होते. लाहोरच्या गुप्त पोलिसांनी पुण्याच्या पोलिसांच्या मदतीने छापा घालून दोघांना त्यादिवशी पिस्तुलांसह अटक केली. प्राथमिक चौकशा, जाबाजबाब इ. सोपस्कार आटोपून १७ ऑक्टोबर १९२९ ला त्यांना मॅजिस्ट्रेट समोर उभे करण्यासाठी कोर्टात आणण्यात

आले. जोशपूर्ण घोषणा देत भर कोर्टात भगतसिंग इ. त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

ही सुनावणी सुरू असतानाच असेंब्ली बॉम्बस्फोट खटला हायकोर्टासमोर आला. त्याची सुनावणी केवळ चारच दिवस चालली. भगतसिंगने बचावाचा युक्तीवाद स्वतः केला. युक्तीवाद प्रदीर्घ असला तरी अतिशय मुद्देसूद आणि प्रभावी होता. निर्णय अर्थातच अपेक्षेप्रमाणे झाला. १३ जानेवारी, १९३० ला हायकोर्टाने दोन्ही आरोपींच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले.

२४ एप्रिल, १९३० ला व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विनने आरोपींच्या गैरहजेरीत, ज्यरींशिवाय खटल्याचे कामकाज चालवण्याचा कायदा पास करून घेतला. त्याशिवाय या नवीन कायद्याप्रमाणे खटला मॅजिस्ट्रेट किंवा सेशन्स कोर्टात न चालता हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तींनी निवडलेल्या न्यायमंडळासमोर चालविण्याचा हुकूम जारी करण्यात आला. खटला लवकरात लवकर निकाली काढण्याच्या सूचना सरकारने कोर्टाला दिल्या.

५ मे १९३० पासून न्या. कोल्डस्ट्रीम यांच्या विशेष न्यायमंडळासमोर सुनावणी सुरू झाली. नेहमीप्रमाणे क्रांतिकारक घोषणा देत, गाणी म्हणत कोर्टात आले. ते अधून मधून कामकाज चालू असताना सुद्धा घोषणा देत असत. कोर्टाने वारंवार ताकीद देऊन सुद्धा त्यांच्यावर काही परिणाम होईना. त्यामुळे पोलिसांनी अमानुष मारहाण सुरू केली. हा प्रकार भर कोर्टात न्यायमूर्तींच्या साक्षीने घडत होता. तार स्वरात ओरडून आरोपी कोर्टासमोर तक्रार करीत असताना न्यायाधीश मख्खपणे बसून होते. भगतसिंगने तर आगा हैदर नावाच्या न्यायाधिशास त्याचे नाव घेऊन ह्या प्रकारात हस्तक्षेप करण्याचा आणि ते जमत नसेल तर सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून राजीनामा देण्याचे आव्हान केले.

नवीन न्यायमंडळासमोर २३ जून १९३० पासून सुनावणी पुढे सुरू झाली. १० जुलै, १९३० ला बटुकेश्वर दत्त यांच्यावरील सॉंडर्स वधाचा खटला काढून घेण्यात आला. ८ ऑक्टोबर १९३० ला न्या. टॅप व न्या. अब्दुल कादिर यांच्या न्यायमंडळाने राजद्रोह, बादशहा विरूद्ध सशस्त्र बंड, सॉंडर्स वध इ. आरोपांसाठी शिक्षांची घोषणा केली. चंद्रशेखर आझाद, कैलासपती, यशपाल, भगवतीचरण व्होरा, सदगुरु दयाळ यांना फरारी घोषित करण्यात आले. बटुकेश्वर दत्त यांच्यावरील खटला रद्द. जयगोपाळने माफीच्या शर्ती पूर्ण केल्याने त्याची मुक्तता. आग्याराम पांडे निर्दोष. सुखदेव यांनी वध करण्यात प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी त्यांना कटाचे सूत्रधार ठरवून फाशी ठोठावण्यात आली. तर भगतसिंग व राजगुरु यांनी

सॉँढर्सला गोळ्या घालून त्याचा वध केल्याचे सिद्ध झाल्याने त्यांना मरेपर्यंत फाशी ठोठावली. जयदेव, किशोरीलाल गयाप्रसाद इ. जन्मठेप काळेपाणी व इतर सह आरोपींना दीर्घ मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षा ठोठावल्या गेल्या. विशेष लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे या शिक्षा घोषित केल्या गेल्या तेव्हा एकसुद्धा आरोपी कोर्टासमोर हजर नव्हता.

शिक्षांची घोषणा होताच देशभर प्रचंड प्रक्षोभ उसळला. सरकारवर टीकेचा भडिमार सुरू झाला. अनेक कायदेशीर डावपेच लढवून त्यांची फाशी लांबवण्याचे प्रयत्न कायदेतज्ज्ञ करीत होते. २४ मार्च १९३१ ला कराची येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन भरणार होते. त्याच्या आदल्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ लाच फाशीची कार्यवाही पूर्ण करण्याचा मनोदय सरकारने पूर्वीच जाहीर केला होता.

नेहमीच्या प्रथेच्या विरुद्ध व कोणालाच कानोकान खबर लागू न देता २३ मार्च १९३१ च्या सायंकाळी भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांची फाशीची शिक्षा अमंलात आणण्याची तयारी लाहोरच्या मध्यवर्ती तुरूंगात सुरू झाली. ‘आम्ही चोर दरोडेखोर नाही तर स्वदेशीच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे सैनिक आहोत. आम्हाला युद्धबंद्यांप्रमाणे गोळ्या घालण्यात याव्या.’ अशी या वीरांची सरकारकडे मागणी होती. हा सन्मान सरकार त्यांना देणे शक्यच नव्हते. फाशीच्या तयारीची बातमी वाऱ्यासारखी जेलभर पसरली. भगतसिंगांच्या सहकाऱ्यांनीच नव्हे तर तुरुंगातील प्रत्येक कैद्याने आकांत मांडला. गोळ्या घालण्याचा धाक सुद्धा कैद्यांचा आक्रोश थोपवू शकला नव्हता. कशी कोणास ठाऊक पण ही बातमी लाहोर शहरात फुटलीच. संतप्त आणि शोकविव्हळ लोकांचे लोंढे तुरुंगांच्या दारासमोर लोटले. संगिनींच्या धाकाने पोलिसांनी गर्दीला रोखून धरले. लोकांचा संताप एवढा पराकोटीचा होता की योग्य नेतृत्व मिळते तर कदाचित त्यांनी तुरुंग फोडला असता.

सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर सर्व संकेत धुडकावून, स्वतःच केलेले कायदे व नियम मोडून सायंकाळी सात वाजता तीनही वीरांना त्यांच्या कोठड्यांमधून बाहेर काढून फाशीगेटाकडे चालवले. ‘वंदे मातरम्’ ‘इन्किलाब झिंदाबाद’ च्या घोषणा देत मस्त आनंदात तिघे चालू लागले. जेलभर कैदी दुःखाच्या उन्मादाने गजांवर हातातल्या बेड्या आपटून आणि तीनही वीरांची नावे घेऊन आक्रोश करीत होते. फाशी कक्षात एकाच वेळी तिघांना फाशी देण्याची तयारी पूर्ण झालेली होती. फाशीच्या तख्तावर उभे राहून भगतसिंग तिथे हजर असलेल्या इंग्रज मॅजिस्ट्रेटला म्हणाले, ‘तुमचे भाग्य थोर. स्वातंत्र्य युद्धातील शूर सैनिक मृत्युला किती

धैर्याने सामोरे जातात ते आज तुम्हाला प्रत्यक्ष पहायला मिळत आहे.' घड्याळ्याच्या काटा साडेसात वर पोहोचला. मांगाने खटका ओढला आणि ते तीन शूर तरुण क्रांतिकारक फासावर लटकू लागले. इंग्रजी पाशवी सूड बुद्धीचा इथे शेवट झाला नाही. घाईघाईने तिघांची कलेवरे खाली उतरवली गेली. तुरुंगांच्या आवारातच तीन चिता तयार ठेवल्या होत्या. तिघांवर लगेच अग्निसंस्कार केला गेला. एवढेच नव्हे तर दिवस उजाडण्यापूर्वीच पहाटेच्या अंधारात त्यांच्या अस्थी व रक्षा तुरुंगाच्या मागील दाराने कडक बंदोबस्तात बाहेर काढून रावी नदीत फेकून देण्यात आल्या.



२४ मार्च १९३१ ला काँग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. आजवर कधी न घडलेले आक्रित घडले. काँग्रेसच्या अधिवेशनाची सुरूवात इतिहासात पहिल्यांदाच सरकारच्या धिक्काराचा आणि तिन्ही क्रांतिकारकांच्या श्रद्धांजलीच्या ठरावाने झाली. त्या काळात भगतसिंगांची लोकप्रियता गांधीजींवर मात करून गेली.

२०. सरदार उधमसिंह

पंजाबशार्दूल सरदार उधमसिंग
जन्म - २८ डिसेंबर १८९९, सुनाम
फाशी - ३१ जुलै १९४०, पेन्टेनव्हिला

एप्रिल १९१९. सारा देश सुन्न झाला होता. सभेसाठी जमलेल्या निरपराध नागरिकांवर ब्रिटिश सैनिकांनी म शिनगनमधून गोळ्या चालवून शेकडो बळी घेतले होते. हजारोंना जखमी केले होते. अमृतसरच्या जालियनवाला बागेत घडलेल्या या हत्याकांडाने ब्रिटिशांच्या तथाकथित न्यायप्रियतेची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगली.

९ वर्षाचा, जवळच रामबागेतल्या खालसा अनाथालयात राहणारा उधमसिंह त्या सभेस गेला होता. त्याच्या अंगावर अनेक माणसे मरून पडल्याने तो सहीसमलामत वाचला होता. त्याच्या बालमनाने मात्र या क्रूर हत्याकांडाचा सूड घेण्याचा निश्चय केला होता.

जालियनवाला बागेतील ती दृष्ये त्याच्या डोळ्यासमोरून हलत नसत आणि सतत त्याला त्या हत्याकांडाचा सूड घेण्याची आठवण करून देत असता. हे हत्याकांड घडवणारा जनरल डायर आणि ज्याच्या अधिपत्याखाली हे घडले तो पंजाबचा लेफ्ट. गव्हर्नर सर मायकेल ओडवायर यांचा वध करण्याचा त्याचा निश्चय होता.

अनाथ पोरक्या उधमचे शिक्षण फारसे झाले नव्हते. मोठा झाल्यानंतर त्याने अमृतसर मध्येच एक कलावस्तू विकण्याचे दुकान काढले. दिवस जात होते. जन. डायरवर कोर्ट मार्शल चालवून त्याची ब्रिटिश सेनेतून हकालपट्टी झाली. दुखण्याने जर्जर होऊन अपमानित अवस्थेत तो जुलै १९२६ मध्ये मृत्यू पावला. एक सावज आपोआप नष्ट झाल्याने उधमला वाईट वाटले. त्या काळात देशामध्ये क्रांतिचे वारे वहात होते. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब वगैरे भागात अनेक तरूण क्रांतिकारी मंडळींमध्ये सामील होत होते. उधमसिंह अशाच एखाद्या क्रांति मंडळात सामील होण्यासाठी धडपडत होता. १९२७च्या दरम्यान भगतसिंगच्या गटातील लोकांच्या संपर्कात तो आला आणि त्याला आपले जीवन कर्तव्य पूर्ण करण्याचा मार्ग सापडला. आपले दुकान आणि इतर मालमत्ता विकून टाकून त्याने स्वतःला क्रांतिकार्यात झोकून दिले.

संघटनेच्या आदेशाने तो एका लाकूड व्यापाराबरोबर पूर्व आफ्रिकेत गेला. तेथून अनेक पिस्तुले व भरपूर दोरूगोळा घेऊन तो परत आला. त्याच दरम्यान सॉंढर्स वधाच्या निमित्ताने पंजाबभर अटक आणि झडत्यांचे सत्र सुरू होते. उधमच्या घरावर छापा पडला. सारी शस्त्रसामुग्री पकडली गेली. स्वाभाविकच उधमसिंहला अटक केली गेली. त्याला पाच वर्षांची शिक्षा झाली. यथावकाश त्याची सुटका झाली. पण गुप्त पोलिसांचा ससेमिरा सतत त्याच्या मागे होता. त्या वेळेपर्यंत हिंदुस्थानात 'सोशलिस्ट रिपब्लिकन आर्मी' उद्ध्वस्त झाली होती. तिचे सर्व प्रमुख नेते फासावर गेले होते किंवा मृत्युमुखी तरी पडले होते. अथवा शिक्षा भोगत बंदिवान होते. उधमसिंह आता एकाकी होता. त्याला स्वबळावर, स्वतःच्याच अक्कल हुशारीने सर ओडवायरला टिपायचे होते.

मोठ्या हिकमतीने गुप्त पोलिसांचा पाठलाग चुकवून तो भारतातून निसटला. खोट्या पासपोर्टावर प्रवास करीत इजिप्त, ॲबेसिनिया, रशिया, फ्रान्स, जर्मनी असे भटकत भटकत तो १९३३ मध्ये लंडनला पोहोचला.

लंडनच्या मुक्कामात त्याला सर ओडवायर हा आणि एवढा एकच ध्यास होता. तो कधी भीक मागून तर कधी लंगरमध्ये (गुरुद्वारांमधील अन्नछत्र) जेवून पोट भरीत असे. उदार आणि दयाळू शीख व्यक्ती त्याचा खर्च भागवीत. उद्योगी आणि कष्टाळू शिखांना त्याचे रिकामे उद्योग पसंत पडणे शक्यच नव्हते. त्याने त्याचे उद्दिष्ट गुप्त राखल्याने त्याचे बरेच जातभाई शीख त्याला हिणवत-'तू काही कामधंदा करीत नाहीस, तू ऐदी, फुकटखाऊ आहेस.' तो शांतपणाने त्यांना उत्तर देई, 'मी काय करीन ते लवकरच तुम्हाला कळेल.'

दरम्यान त्याने सर ओडवायरशी ओळख करून घेण्यात यश मिळवले. हळूहळू त्याने ओळख वाढवीत नेली. लवकरच त्याला कळले की १३ मार्च १९४० ला हिंदुस्थानशी संबंधित काही संस्थांच्या वतीने लंडनच्या कॅक्स्टन हॉलमध्ये एक सभा होणार होती. भारत मंत्री लॉर्ड झेटलंड त्या सभेचे अध्यक्ष असणार होता आणि सर मायकेल ओडवायर प्रमुख वक्ता म्हणून भाषण करणार होता. गेल्या अनेक वर्षांपासून ज्या क्षणाची तो वाट पहात होता तो क्षण जवळ आला होता. त्याच दिवशी दोघांना उडवण्याचा त्याने निश्चय केला.

त्याच्या ओळखीच्या लोकांकडून त्याने एक उत्तम प्रतीचे सहाबारी स्वयंचलित रिव्हॉल्व्हर मिळविले. ते उडवण्याचा पुरेसा सराव केला. कॅक्स्टन हॉलवर अनेक चकरा मारून त्याने त्याची नीट पाहणी केली आणि सारा बेत मनाशी पक्का केला. या कामी कोणावर विसंबावे, कोणाचे सहाय्य घ्यावे, मदत घ्यावी, सल्ला किंवा मार्गदर्शन घ्यावे असे कोणीच त्या दिवसात लंडनमध्ये नव्हते. १३ मार्चला त्याने इंग्रज सभ्य गृहस्थाचा ऐटबाज आणि भपकेदार पोशाख

केला. खिशात ते सहाबारी रिव्हॉल्व्हर आणि काही सुटी काडतुसे टाकली. एक तीक्ष्ण शिकारी सुरा कमरेला पोशाखाच्या आत दडवून खोचला. तो हॉलवर काहीशा उशीरानेच पोहोचला. सभा सुरू झाली होती. हॉल खचाखच भरला होता. त्याचे सावज स्पष्ट दिसत होते. भारत मंत्री लॉर्ड झेटलंड अध्यक्षाच्या खुर्चीवर मंचावर बसला होता. सर मायकेल ओडवायर खाली प्रेक्षकांत पहिल्या रांगेत बसला होता. काही किरकोळ वक्त्यांची भाषणे सुरू होती. पाचव्या रांगेजवळ भिंतीला टेकून तो एकाग्रतेने भाषण ऐकण्याचा देखावा करीत उभा राहिला. मात्र त्याचे संपूर्ण लक्ष सर ओडवायरवर केंद्रित झाले होते. त्याच्याजवळ झपाट्याने पोहोचण्यासाठी जागा सुद्धा त्याने हेरून ठेवली होती.

सर ओडवायर भाषण देण्यासाठी मंचावर जाण्यासाठी उभा रहाताच उधमसिंहाने विद्युतवेगाने खिशातून पिस्तुल बाहेर काढले आणि चित्याच्या चपळाईने तो पुढे झेपावला. केवळ आठ फुटांवरून त्याने ओडवायरच्या पाठीवर सटासट ६ गोळ्या झाडल्या. पहिल्याच दोन्ही गोळ्या त्याच्या पाठीतून हृदयाचा वेध घेत आरपार गेल्या. तो जागीच कोसळला आणि गतप्राण झाला. दोन गोळ्यांनी लॉर्ड झेटलंडला घायाळ केले. तो खाली कोसळला. बाकी दोन गोळ्या अन्य दोन गोऱ्यांना जखमी करून गेल्या. समाधानाने तो हॉलच्या मागच्या बाजूला जाण्यास झपाट्याने निघाला पण तेथे उपस्थित काही सैनिकांनी त्याला जमिनीवर पाडून ताब्यात घेतले.

लंडनच्या न्यायालयात त्याच्यावर खटला उभा राहिला. तो अत्यंत स्थिर भावनेने खटल्याला सामोरा गेला. सोबतच्या पोलिसांबरोबर तो सतत हास्य विनोद करीत असे. साक्षी पुरावे संपले. खटल्याच्या कारवाईत त्याने विशेष भाग घेतला नाही. पण,'शिक्षा सुनावण्यापूर्वी काही सांगायचे आहे का?' असे न्यायाधीशांनी विचारताच त्याने तडफदार भाषण केले-

''ब्रिटिश साम्राज्याच्या टाचेखाली लोकांना उपाशी मरताना मी भारतात पाहिले आहे. जनरल डायरने अमृतसरच्या जालियनवाला बागेत केलेले अमानुष हत्याकांड मी स्वतः पाहिले आहे. त्यामुळेच मी ब्रिटीश साम्राज्यशाहीचा कट्टर वैरी बनलो आहे. याच ओडवायरच्या अधिपत्याखाली डायरने कत्तल केली. त्या कत्तलीचा सूड घेतला गेला नसता तर हिंदुस्थानच्या इभ्रतीला लागलेला कलंक तसाच राहिला असता. मी माझे कर्तव्य केले. मी मायभूमीसाठी बलिदान करीत आहे.''

अपेक्षेप्रमाणे उधमसिंहला फाशी सुनावण्यात आली. लंडनच्या पेटनव्हील तुरुंगात ३१ जुलै १९४० ला तो धीरोदात्तपणे 'वंदे मातरम्' चा उद्‌घोष करीत फासावर गेला.

२१. नेताजी सुभाषचंद्र बोस

नेताजी सुभाषचंद्र बोस
जन्म - २३ जानेवारी १८९७, कटक
अपघाती निधन - १८ ऑगस्ट १९४५, फोर्मोसा

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अत्यंत गूढ रम्य पान आहे. त्यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ ला एका अत्यंत सधन बंगाली कायस्थ कुटुंबात कटक येथे झाला. त्यांचे पिता जानकीनाथ बोस हे प्रख्यात आणि यशस्वी वकील होते. त्यांच्या आईच्या धार्मिक श्रद्धेचा पगडा लहानपणापासून सुभाषच्या मनावर होता. तरुण वयातच त्यांनी परमेश्वराच्या शोधासाठी घरातून पलायन करून हिमालयात भटकंती केली. परंतु अखेर ते घरी परत आले. हे अनमोल रत्न हिमालयातील गुहांमध्ये हरवून जावे अशी साक्षात परमेश्वराचीच इच्छा नव्हती.

त्यांच्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे ते आय.सी.अेस.ची परीक्षा देण्यासाठी लंडनला गेले. वास्तविक त्यांना खूपच उशीर झाला होता. आय.सी.एस. च्या परीक्षेसाठी केवळ आठ महिनेच उरले होते. परंतु त्यांनी दिवसरात्र एक करून तयारी केली व चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. आय.सी.अेस.च्या भारतीय विद्यार्थ्यांना मिळणारी दुय्यम वागणूक, सैनिकी शिक्षणापासून त्यांना दूर ठेवण्याचे धोरण याची त्यांच्या मनात चीड होती. इंग्रजी साम्राज्यशाहीकडून होणारी भारतीयांची छळवणूक व पिळवणूक पाहून ते अस्वस्थ असत. सनदी नोकर होऊन त्याच यंत्रणेचा भाग होण्याची त्यांची तयारी नव्हती. भारत मंत्री मॉंटेग्यू याची त्यांनी भेट घेतली. पण समाधान न झाल्याने आय.सी.अेस. झाल्यावर वर्षभराच्या आत त्यांनी २२ जानेवारी १९२१ ला आय.सी.अेस.चा राजीनामा दिला.

ते स्वदेशी परत आले. कलकत्त्याला जाण्यापूर्वी त्यांनी मुंबईत १६ जुलै १९२१ ला गांधीजींची भेट घेतली.

कलकत्त्याला आल्यावर देशबंधू चित्तरंजन दास यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राजकीय व सामाजिक कार्यास सुरूवात केली. त्यांच्या आग्रहावरून ते नॅशनल कॉलेजचे प्राचार्य झाले. प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत आगमनाच्या वेळी त्यांनी बहिष्काराची व्यापक चळवळ यशस्वीपणे चालवली. त्यावेळी त्यांना प्रथम अटक झाली. न्यायालयाने त्यांना सहा महिन्यांची कैदेची शिक्षा सुनावताच ते न्यायालयातच कडाडले, ''काय फक्त सहा महिने? मी काय

एखादी कोंबडी चोरलीय की काय?'' त्यानंतर सुद्धा त्यांच्या अनेक चळवळी चालूच राहिल्या. त्यांच्यातील नेतृत्व गुण व जनतेला आकृष्ट करणारे व्यक्तिमत्त्व यामधील धोका चाणाक्ष इंग्रज सरकारने ताबडतोब ओळखला.

२५ जानेवारी १९२६ मध्ये त्यांना विनाचौकशी अटक करून मंडालेच्या तुरुंगात डांबण्यात आले. परंतु न्युमोनियाने आजारी झाल्याने २६ मे १९२७ ला त्यांची मुक्तता करण्यात आली. दरम्यानच्या काळात देशबंधूंचे निधन झाल्याने त्यांचा 'स्वराज्य' पक्ष पोरका झाला होता. ते काँग्रेसच्या चळवळींमध्ये सक्रीय भाग घेत परंतु त्यांचे काँग्रेसच्या नेत्यांशी सतत खटके उडत. मात्र ते सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये व जनतेत अत्यंत प्रिय होते. त्यामुळे १९३८च्या हरिपुरा काँग्रेसमध्ये पट्टाभिसितारामय्या यांचा पराभव करून ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. 'हा पराभव पट्टाभिंचा नसून माझा आहे.' अशा शब्दांत गांधीजींनी त्यांचा राग व्यक्त केला.

काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांची पदोपदी अडवणूक करण्यास सुरूवात केली. त्रिपुरी येथे काँग्रेस कार्यकारिणी (काँग्रेस वर्किंग कमिटीची) सभा भरली असता कमिटीच्या सर्व बारा सदस्यांनी राजीनामे दिले. याच वेळी त्यांचा स्वराज्य प्राप्तीसाठी प्रखर आंदोलन ताबडतोब सुरू करण्याच्या मुद्यावर वाद झाला. शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना काँगेसमधून हाकलून देण्यात आले. त्यांनी 'फॉर्वर्ड ब्लॉक' नावाचा नवा पक्ष स्थापन केला. त्या पक्षाच्या माध्यमातून त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य चालू होते. अटक व सुटकेचे सत्र सुरूच होते. मध्यंतरी ते बराच काळ युरोपात, विशेषतः जर्मनीला, राहिले होते. आपला काँग्रेसच्या कार्यपद्धतीला असलेला विरोध व काँगेसी नेत्यांशी असलेले मदभेद उघडपणे नोंदवण्यास ते मागेपुढे पहात नसत.

२२ जून १९४० या दिवशी सावरकर सदनात त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची घेतलेली भेट त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली. त्यांच्या कार्याची आणि स्वातंत्र्य चळवळींची चर्चा करताना स्वातंत्र्यवीर त्यांना म्हणाले,''हॉलवेल सारखी आवश्यक पण तुलनेने कमी महत्त्वाची चळवळ दुसरा कुणीही चालवू शकेल, परंतु या महायुद्धाच्या काळात परदेशात राहून परराष्ट्राच्या मदतीने स्वातंत्र्य युद्ध लढण्याची संधी चालून आलेली आहे. ती तुमच्या सारख्या पराक्रमी पुरुषाने साधली पाहिजे. सैन्य हेच शेवटी महत्त्वाचे शक्ती केंद्र असते, ज्याच्या बळावर सशस्त्र संघर्ष, युद्ध शक्य असते. देशाबाहेरून सशस्त्र सहाय्य मिळेल. पण त्याचे नेतृत्व आपल्याच हाती राहिले पाहिजे.''

दोघांची सखोल चर्चा झाली. स्वातंत्र्यवीरांनी त्यांना पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मनी, अमेरिका, तुर्कस्तान इत्यादी देशांत झालेल्या अशा यशस्वी प्रयत्नांची तसेच 'गदर' उठावाची, त्यामध्ये असणाऱ्या विष्णू गणेश पिंगळे, खानखोजे इत्यादींचा सहभाग तसेच रासबिहारी

बोसांनी जपानमध्ये राहून उभा केलेल्या सेनेची वगैरे तपशीलवार माहिती दिली. शिवाजी महाराजांच्या चरित्राने ते अतिशय प्रभावित झाले होते.

कलकत्त्यात पोहोचताच त्यांनी हॉलवेल स्मारक उखडण्यासाठी जोरदार आंदोलन सुरू केले. त्यांना अटक झाली. कैदेत उपोषण करून त्यांनी आपली सुटका करण्यास सरकारला भाग पाडले. ते आपल्या घरी परत आले. येताच त्यांनी आपण आजारी असल्याचे घोषित केले. ठराविक व्यक्ती वगळता कोणालाही त्यांच्या खोलीत प्रवेश नव्हता. ते कोणालाही भेटत नसत.

आणि १७ जानेवारी १९४१ च्या रात्री पिंजऱ्यातून पक्षी उडाला. मुसलमान पठाणाच्या वेशात ते गुप्तपणे बाहेर पडले. मोटारीने एका आडबाजूच्या रेल्वे स्टेशनवर ते पोहोचले. मोटार त्यांचा पुतण्या शिशिर बोस चालवीत होता. त्या स्टेशनवरून रातोरात गाडी पकडून ते पेशावर येथे पोहोचले. तेथील एक व्यापारी भगतराम ललवार यांच्या घरात मुक्या बहिऱ्याचे सोंग घेऊन झियाउद्दीन नावाने राहिले. भगतराम यांनी विश्वासू कार्यकर्ते सोबत देऊन त्यांची अफगाणिस्तानात पाठवणी केली. अनेक संकटांना तोंड देत व धोके पार करीत, अखेर ते काबूल येथे पोहचले.

तोपर्यंत त्यांचे नाहीसे होणे सर्वत्र प्रसिद्ध झाले होते. त्यांचा शोध सुरू झाला असल्याने त्यांना प्रगटपणे हालचाली करणे शक्य नव्हते. त्यांच्या सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून त्यांनी प्रथम जर्मन राजदूतांशी संपर्क साधला. परंतु सुभाषबाबू काबूलमध्ये आहेत यावर त्यांचा विश्वास बसला नाही. त्याने त्या कार्यकर्त्यांना हाकलून लावले. सुदैवाने रशियन राजदूताने प्रतिसाद दिला व सुभाषबाबूंची त्याने भेट घेतली. वाटाघाटी होऊन त्याने त्यांना गुप्तपणे रशियात पोचवण्याचे मान्य केले. सुभाषबाबू रशियन दूतावासात राहण्यास गेले. कलकत्ता ते रशियन दूतावास हा प्रवास केवळ योगायोगाने यशस्वी झाला नाही, तर त्या मागे सुव्यवस्थित संपर्काचे मजबूत जाळे असलेल्या एखाद्या राष्ट्रव्यापी संघटनेचा सहभाग असल्याशिवाय हे दिव्य शक्यही नव्हते, हे उघड आहे. पण इतिहास त्याबाबत गप्प आहे.

रशियन दूतावासाच्या मोटारीतून गुप्तपणे अफगाण, रशिया सीमा ओलांडून त्यांनी रशियात प्रवेश केला. तेथून पुढे त्यांना मास्कोला नेण्यात आले. त्यांची स्टालिनशी भेट झाली. त्याने त्यांच्या युद्ध प्रयत्नांना सहानुभूती दाखवली व संपूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. अखेर १८ जून १९४१ ला ते अर्लांडो माझोता या नावाने जर्मनीला, बर्लिनला पोहोचले. त्यांची हिटलरशी झालेली भेट फारच यशस्वी ठरली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने हिटलर प्रभावित झाला. त्याने त्यांना सर्व मदत करण्याचे वचन दिले. इतकेच नव्हे तर जर्मन नभोवाणीचा (रेडिओ) उपयोग करण्यास संपूर्ण सूट दिली. जर्मनीत सुभाषबाबूंना स्वतंत्र राष्ट्राच्या राजप्रमुखाच्या इतमामात वागवले जात असे. जर्मन रेडिओवरून सुभाषबाबूंचा आवाज जगभर घुमू लागला. आपल्या भाषणांमध्ये ते स्वा. सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या धोरणाचा पुरस्कार करू लागले. देशबांधवांना स्वातंत्र्य लढ्याचे आवाहन करू लागले. ब्रिटिश सेनेतील भारतीय सैनिकांच्या राष्ट्रभक्तिला फुंकर घालून चेतवू लागले. स्वातंत्र्य लढ्यासाठी बंड करण्याचे आवाहन करू लागले. त्यांनी युद्ध कैद्यांच्या अनेक छावण्यांना भेटी देऊन शेकडो सैनिक आपल्या बाजूने वळवून घेतले.

एप्रिल १९४३ मध्ये प्रथम जर्मन व नंतर जपानी पाणबुडीतून अत्यंत कष्टकर व धोकादायक प्रवास करून ते जपानला आले. रासबिहारी बोस बाबूंनी आपली आझाद हिंद फौज त्यांच्या हवाली केली. सैनिकांमध्ये जागृती घडवण्यासाठी त्यांनी सावरकरांचे '१८५७चे स्वातंत्र्य समर' हे पुस्तक छापवून घेतले व गीतेप्रमाणे त्याची पारायणे करवली. जर्मनी व जपानच्या ताब्यातील ५०,००० युद्धबंदी सैनिक त्यांनी आझाद हिंद सेनेत वळवून घेतले होते. त्यांचे अनुयायी आता त्यांना 'नेताजी' म्हणू लागले. जपान्यांच्या खांद्याला खांदा भिडवून आझाद हिंद फौज लढू लागली. मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेशच्या लढायात त्यांनी संधी मिळताच

चांगलाच पराक्रम गाजवला.

२१ ऑक्टोबर १९४३. ला त्यांनी आझाद हिंद सरकारची स्थापना झाल्याची घोषणा केली. झेप घेणाऱ्या वाघाचे चित्र असणारा ध्वज फडकावला आणि त्यांनी 'जय हिंद'च्या नाऱ्यात त्याला सलामी दिली. फौजेपुढे त्यांनी ध्येय ठेवले 'चलो दिल्ली' सर्व भारतीयांना त्यांनी आवाहन केले, 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा।'' २३ आक्टोबरला जपानने त्यांच्या या सरकारला मान्यता दिली.

३० ऑक्टोबर, १९४३ त्यांच्या सेनेने अंदमान बेट स्वतंत्र केले. साऱ्या देशात चैतन्याची लहर उमटली. विजिगिषु राष्ट्रवादाचा देशभर उद्रेक झाला. जपानी सैन्याच्या बरोबरीने आझाद हिंद सेना ब्रह्मदेशातून भारताच्या सीमेवर धडका देऊ लागली. आझाद हिंद सेना इंफाळपर्यंत पोहोचली. साऱ्या देशात त्यांची लोकप्रियता सर्वोच्च शिखरावर पोहोचली.

अमेरिका सर्व शक्तिनिशी युद्धात उतरली. युद्धाचे पारडे फिरले. युरोपात जर्मनी पराभूत झाली. जपानची पीछेहाट सुरू झाली. आझाद हिंद सेना भारताच्या सीमेवरून माघारी फिरवली गेली. जपान्यांच्या चिवट प्रतिकाराच्या धास्तीने अमेरिकेने ८ ऑगस्ट १९४५ या दिवशी हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकला. पाठोपाठ दोन दिवसात दुसरा अणुबॉम्ब नागासाकी शहरावर कोसळला. प्रचंड विध्वंस झाला हे पाहून १० ऑगस्ट १९४५ला रशियाने जपान विरूद्ध युद्ध घोषित केले. जपानला शरणागती शिवाय पर्याय उरला नाही.

यावेळी नेताजी मलायामध्ये छावणीत होते. ते तेथून जपानच्या पंतप्रधानास भेटण्यासाठी जपानी बॉम्बर विमानाने टोकियास जाण्यास १७ ऑगस्टला निघाले. रात्री त्यांनी फ्रेंच टुटेन येथे मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी ते पुढे निघाले. फार्मोसा (आताचा तैवान) मधील तै होकु विमानतळावरून इंधन भरून त्यांचे विमान पुढे निघाले.

इथून पुढे नेताजींचे काय झाले कोणालाच माहीत नाही. तै होकू विमानतळावर अपघात होऊन त्यांचा जळून मृत्यू झाला अशी सरकारी नोंद असली तरी त्यावर कुणाचाच विश्वास बसला नाही.

कुणी म्हणतात, ते गुप्त वेशात भारतातच संन्यासी जीवन जगत राहिले. कुणी काही तर कुणी काही म्हणत राहिले. असे सुद्धा बोलले जात आहे की त्यांनी पुन्हा रशियाचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पण बदललेल्या परिस्थितीत रशियाने त्यांना सैबेरिया येथे अटकेत टाकून छळ केला व अखेर फाशी दिली. सत्य आज ना उद्या बाहेर येईलच पण एक गोष्ट मात्र निर्विवादपणे सत्य आहे की नेताजींच्या आधुनिक सैन्य उभारून केलेल्या या प्रयत्नांमुळेच स्वातंत्र्य दृष्टिपथात आले व १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्याचा सूर्य उगवला.

२२. समारोप

स्वातंत्र्यवीर सावरकर
जन्म - २८ मे १८८३, भगूर, नाशिक
आत्मार्पण - २६ फेब्रुवारी १९६६, मुंबई

१८५७ चे स्वातंत्र्य समर आपण गमावले. पण त्या समरात झालेले बलिदान वाया गेले नाही. युद्ध जिंकलेल्या ब्रिटनने धसका घेतला होता. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता इंग्लडच्या राणीच्या हातात गेली. राणीला जाहीरनामा काढून अनेक आश्वासने देणे भाग पडले. भारतातील असंतोषाला वाट मोकळी करून देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना इंग्रजानीच केली.

त्या युद्धातील हुतात्म्यांपासून स्फूर्ती घेऊन क्रांती लढा पुढे नव्वद वर्षे सुरू राहिला. अनेक क्रांतिकारकांनी इंग्रजी साम्राज्याच्या सत्ते विरुद्ध रणशिंग फुंकले. १९०८ मध्येच स्वा. सावरकरांनी प्रबंध मांडला. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले!' जेव्हा हिन्दी सैन्य देश भावनेने पेटून उठेल तेव्हाच देश स्वतंत्र होईल.'

पहिल्या महायुद्धाच्या काळात आखलेला 'गदर' उठाव तसेच दुसऱ्या महायुद्धात रासबिहारी बोस व सुभाषबाबूंनी उभारलेली ''आझाद हिन्द सेना'' आणि महायुद्ध संपल्यावर मुंबईच्या नौदल गोदीत झालेले खलाशांचे बंड या घटना स्वा. सावरकरांच्या प्रबंधाच्या सत्यतेची, त्यांच्या द्रष्टेपणाची ग्वाही देतात.

महायुद्धादरम्यान अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी एकदा तेव्हाचे ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांच्याकडे भारतातील राजकीय व भारताचे स्वातंत्र्य बाबत चर्चा करण्याचा प्रयत्न केला असता चर्चिल यांनी ''मी ब्रिटिश साम्राज्याचे विसर्जन करण्यासाठी पंतप्रधान पद स्वीकारलेले नाही.'' अशी दर्पोक्ती केली होती. इंग्लंडने महायुद्ध जिंकले, पण तो देश संपूर्ण खिळखिळा झाला होता. १५ मार्च १९४६ या दिवशी ब्रिटनचे नवे पंतप्रधान, मजूर पक्षाचे, पुढारी ॲटली यांनी ब्रिटिश पार्लमेंटला भारतीय स्वातंत्र्याचा ठराव मांडला.

आता पंतप्रधानपद गमावलेल्या चर्चिल यांनी पार्लमेंटात पृच्छा केली ''हे बिल आपण का मांडत आहात?''

ॲटलीनी उत्तर दिले- ''अत्यंत दुःखाने व नाईलाज झाला म्हणून... स्वातंत्र्य भावना भारतीय जनतेच्या सर्व थरात पसरली आहे. इतकेच नव्हे तर ज्यांनी या महायुद्धात उत्कृष्ट शौर्य गाजवले, त्या (भारतीय) सैनिकांमध्ये सुद्धा तिचे लोण पसरले आहे.''

मजूर पक्षाचे राजकीय कार्यवाह फ्रेनर ब्रॉकवे यांनी त्याला पुस्ती जोडली-''स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचा भारतीय जनतेचा ठाम निर्णय झाला आहे, हे पहिले कारण. हिन्दी सैन्याने बंड उभारले आणि ब्रिटनचे हेतू साधण्यासाठी भारतीय सेनाबळावर भरवसा टाकण्याची सोय राहिली नाही, हे दुसरे कारण. भारत ही ब्रिटनची बाजारपेठ व अन्नधान्य पुरवठ्याचे कोठार असल्याने त्याचे (भारतीय सैन्याचे) वैर वाढवून घेणे ब्रिटनला इष्ट वाटत नाही, हे तिसरे कारण.''

अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. पण देश खंडित झाला. फाळणीच्या संधिकाळात पाकिस्तानी गुडांनी लाखो निरपराध स्त्री-पुरुषांची कत्तल केली. स्वातंत्र्य प्राप्तीच्या आनंदात आम्ही तिकडे कानाडोळा केला. पण म्हणून काही आम्ही या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे मोल देणाऱ्यांना विसरलो असा याचा अर्थ नाही.

इंग्रज देशातून चालते झाले. भारतीयांचे सरकार देशावर राज्य करीत आहे. पण आपण खरोखरच स्वतंत्र झालो आहोत का? हुतात्म्यांचे स्वप्न खरोखरच साकार झाले का?

ते स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आता तुमच्यावर आहे. या पुस्तकात तोंडओळख झालेल्या आणि ह्यात समाविष्ट होऊ न शकलेल्या वीरांच्या समग्र चरित्रांची माहिती करून घेऊन, त्यांच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी आपण कटिबद्ध व्हायचे आहे. हीच या वीरांना श्रद्धांजली. हीच मातृभूमीची सेवा. हे दैवी राष्ट्र जेव्हा परम वैभवाला जाईल, तेव्हाच ते हुतात्मे स्वर्गात समाधान पावतील. कृतकृत्य होतील.

।। भारतमाता की जय ।।